आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

१२ एप्रिल २०११ | वर्ष २८ | अंक २

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक ₹ १०


## शेतकरी संघटक वर्धापन दिन उत्साहात साजरा!



शेतकरी संघटकच्या वर्धापन दिनी २८ व्यावर्षातील पहिल्या अंकाचे प्रकाशन करताना डावीकडून ज्येष्ठ नेते मा. भास्करभाऊ बोरावके, पत्रकार राम जगताप, प्रमुख पाहुणे निशीकांत भालेराव, माजी आमदार वामनराव चटप, संपादक सुरेशचंद्र म्हात्रे, कार्यकारी संपादक श्रीकांत उमरीकर



निशीकांत भालेराव



सुरेशचंद्र म्हात्रे



राम जगताप



ॲड. दिनेश शर्मा

### अण्णा हजारे : आँसू असली, रूमाल नकली

क्या अण्णा ने भ्रष्टाचार के स्रोत को पकडने की वास्तव में कोई कोशीश की है? क्या अण्णा के पास समस्या का ईलाज है या वे भी हमें भविष्य में उतना ही निराश करेंगे जितना कभी जयप्रकाश नारायण के आंदोलन ने किया था? क्या अण्णा भ्रष्टाचार के इस फोडे को काटकर फेंकने का माद्दा रखते हैं, या बस देश की चेतना को हर स्तर पर ग्रस चुके इस नासूर की उपर उपर से मरहम पट्टी ही करना चाहते हैं और आने वाली नस्लों को जिंदा रखना चाहते हैं? और सबसे महत्वपूर्ण बात, क्या अण्णा दूसरे गांधी हो सकते है?

दोस्तो! मैं अपनी पूरी इमानदारी और विवेकबुद्धी के साथ, ईश्वर की शपथ लेकर यह कहना चाहता हूं की उपरोक्त चारों प्रश्नों में से किसी का भी उत्तर अण्णा के पक्ष में नहीं जाता. सबसे महान निराशा तो यह है, की उनके द्वारा बताये गये बिमारी के इलाज, बिमारी से ज्यादा खतरनाक हैं.

शेतकरी
# संघटक
स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

वर्ष २८ । अंक २ । २१ एप्रिल २०११

**मूल्य : ₹ १०**

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

मुखपृष्ठावरील व्यंगचित्र
**अनिल डांगे**

अंक मांडणी
**श्रीकांत झाडे, जनशक्ती वाचक चळवळ**

**वार्षिक वर्गणी : रु. २००/– फक्त.**
(द्वैवार्षिक, त्रैवार्षिक, आजीव आदी प्रकार नसल्यामुळे फक्त वार्षिक वर्गणीच स्वीकारली जाईल.)
वर्गणी **'शेतकरी संघटक'** या नावाने खालील पत्त्यावर पाठवावी.

**(टीप : वर्गणीदारांनी अंकांसंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**


**संपर्क :**
कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक,
जनशक्ती वाचक चळवळ,
२४४–समर्थनगर, औरंगाबाद–४३१००१–३१,
फोन : ०२४०–२३४१००४.
ईमेल : shetkarisanghatak@gmail.com


● हा अंक मालक मोहन बिहारीलाल परदेशी, संपादक, मुद्रक, प्रकाशक सुरेशचंद्र म्हात्रे यांनी उदय एंटरप्राईजेस, सिडको–औरंगाबाद येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, पिनाक, २४४–समर्थनगर, औरंगाबाद–४३१००१–३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.


# अंतरंग


शरदऋतू
**खुले पत्र**
शरद जोशी । ३

वर्धापनदिन वृत्तांत । ५

भाषण
**मराठी पाक्षिके आणि साप्ताहिकांची सद्यस्थिती**
राम जगताप । ८

आजकाल
**जनलोकपाल विधेयक**
ज्ञानेश्वर शेलार । १३

मधोमध
**काळ्याकुट्ट इतिहासाची आयपीएल**
दत्ता जोशी । १६

मुद्दा
**जैतापूर प्रकल्प : एक विचारमंथन**
विश्वास प्र. पिटके । २०

'भारत' की जुबानी
**अण्णा हजारे – आँसू असली रूमाल नकली**
ॲड. दिनेश शर्मा । २४

वाङ्मय शेती
**अण्णा सेवाग्रामला या दारूने आंघोळ करू...**
गंगाधर मुटे । २८

(उ)संतवाणी
**सोडा लोकपाल करा प्रतिपाल**
'थंडा' महाराज देगलूरकर । २९

**शेतकरी संघटना वृत्त । ३१**

# हा उन्माद कशासाठी !

खरे तर अग्रलेखाचे हे शीर्षक अण्णा आणि उन्माद असे लिहायचे होते; पण अण्णा हजारेंवर आणि त्यांच्या उपोषणांवर इतके प्रचंड लिहिल्या गेलं, की अण्णा हे नाव वाचलं तरी वाचक तो मजकूर न वाचण्याचीच भीती जास्त आहे. अण्णा हजारेंचे उपोषण संपल्यानंतर टीव्हीवर प्रतिक्रिया देताना एक तरुण मुलगा असं म्हणाला, 'पिछले हफ्ते हमने वर्ल्डकप जीत लिया, इस हफ्ते युनिव्हर्स जीत लिया.' काय म्हणावे या प्रतिक्रियेला? विश्व जिंकण्याची प्रक्रिया इतकी सोपी असते हे यांना कोणी सांगितलं? नेमकं याच काळात केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल आणि आसाम आणि पाँडेचेरी येथे विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूका होत होत्या. आसामात तर उल्फा बंडखोरांचं आव्हान मोडून सामान्य जनतेने मोठ्या प्रमाणात मतदान केलं. ज्या लोकशाहीची सगळेच चर्चा करत राहतात तिला वाचवण्याचं मोठं काम आसामातल्या सामान्य माणसाने केलं; पण चर्चा होते आहे, ती दिल्ली, मुंबईच्या रस्त्यावरून अण्णा हजारेंना पाठिंबा म्हणून मेणबत्त्या घेऊन निघणाऱ्यांची. लोकशाही नेमकी कशाने बळकट होणार आहे? का ती बळकट करण्याचं काम फेसबूक आणि ट्वीटरवरती प्रतिक्रिया देण्याइतकं सोपं आहे? आंबेडकर जयंतीचा मुहूर्त साधून महाराष्ट्राच्या विधानसभेत मध्यरात्री पाणी वाटपाच्या संदर्भातलं विधेयक घाईघाईनं मंजूर करण्यात आलं. शेतीसाठी राखीव असलेलं पाणी उद्योगाकडे वळविण्याची मुभा त्यात देण्यात आली. हा विषय अर्थातच अण्णा हजारेंच्या आंदोलनात वाहून गेला. स्थानिक स्वराज्य संस्थांमधून महिलांना ५०% आरक्षण देण्याची महत्त्वाची दुरुस्ती करण्यात आली. याही विषयाचं गांभीर्य कुणाच्या फारसं लक्षात आलं नाही. विधानसभेच्या निवडणूका, पाणी वाटप वधेयक, महिला आरक्षण विधेयक अशा गोष्टींना लोकशाही प्रक्रियेत अतिशय महत्त्वाचं स्थान असताना ते बाजूला पडून भ्रष्टाचार आणि त्या निमित्ताने उठवलेला आवाज यालाच महत्त्व येत राहील. नेमकं याच काळात १४ एप्रिल रोजी घटनेच्या ९व्या परिशिष्टाविरुद्ध शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रवि देवांग यांनी आंदोलन केलं. नवव्या परिशिष्टाची प्रतिकात्मक प्रत दहन केली. त्यांच्या कृतीवर साधकबाधक चर्चा घडविण्याऐवजी समाजविघातक तत्त्वांनी अफवा पसरवून दलित कार्यकर्त्यांना पेटवलं, मग या दलित कार्यकर्त्यांनी रवि देवांग यांना मारहाण केली. सुरक्षेच्या कारणास्तव पोलिसांनी त्यांना न्यायालयीन कोठडी दाखल केले. खरे तर लोकशाही बळकट करण्यासाठी घटनेच्या नवव्या परिशिष्टावर चर्चा घडून आणावी अशी मागणी रवि देवांग यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात केली होती; पण ती वाचण्याची कोणी तसदी घेतली नाही. ज्या आंबेडकरांची दलित जनता देवतेसमान पूजा करते त्यांच्या मूळ घटनेमध्ये घटनेचे नववे परिशिष्ट नाही. पंडित जवाहरलाल नेहरूंनी १८ जून १९५१ ला पहिली घटना दुरुस्ती करून ते जोडले. या परिशिष्टात टाकलेल्या कायद्यांना कोणत्याही न्यायालयात आव्हान देता येत नाही. आजपर्यंत केंद्र व वेगवेगळ्या राज्य सरकारांनी २८४ कायदे नवव्या परिशिष्टात टाकलेले आहेत आणि अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या, सामान्य नागरिकांच्या मालमत्तेच्या मूलभूत अधिकारावर गदा आणली आहे. ही घटना उघडउघड लोकशाहीविरोधी आहे. म्हणून त्याचा निषेध रवि देवांग यांनी केला. ही कृती लोकशाहीला बळकट करणारी होती; पण याकडे पुरेसं लक्ष दिल्या गेलं नाही आणि अफवा पसरवून त्याचा विपर्यास केला गेला. म्हणजे एकीकडे अण्णा हजारेंच्या निमित्ताने लोकशाहीच्या नावाने गळे काढणारे; पण प्रत्यक्षात लोकशाहीचे पोषण करण्यासाठी काहीच न करणारे लोक जमा होत आहेत, तर दुसरीकडे लोकशाहीच्या रक्षणासाठी काम करणाऱ्यांकडे माध्यमं आणि सामान्य जनताही दुर्लक्ष करत आहे. असं एक विचित्र दृश्य गेल्या काही दिवसांत आपल्या देशात पाहायला मिळत आहे. ज्या तरुणाने अण्णा हजारेंच्या उपोषणावर प्रतिक्रिया दिली. त्याला टीव्ही चॅनेल्सनी का नाही विचारले, की तू मतदान प्रक्रियेत भाग घेतोस का? सर्वसामान्य जनतेला जी भ्रष्टाचाराच्या विरोधात सजगता दाखवत आहे त्यांना हे विचारावं वाटतं आहे, मतदानाच्या प्रक्रियेत तुम्ही किती नियमितपणे भाग घेता. तुमच्या घरातील सर्व मतदारांची नावं नोंदवली आहेत का? मयत मतदारांची नावे गाळल्या गेली आहेत का? तुमच्या आजूबाजूच्या मतदारांनी मतदान करावं म्हणून तुम्ही काय प्रयत्न केले आहेत. दुर्दैवाने बहुतांश प्रश्नांची उत्तरे नकारार्थी येतात. ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका, यांच्या सर्वसाधारण सभेसाठी किती नागरिक उपस्थित राहतात? लोकशाहीचा नेमका अर्थ सामान्य माणसाने काय काढला आहे? अण्णा हजारेंच्या निमित्ताने या प्रश्नावर खूप मोठ्या प्रमाणात चर्चा माध्यमांमधून होताना दिसते आहे, ही एक चांगली गोष्ट आहे. पण चर्चा करून थांबता येणार नाही. त्यासाठी प्रत्यक्ष कृती करावी लागेल. अगदी भ्रष्टाचाराचाच विषय घेतला तर सामान्य माणसांना असं विचारावं लागेल, कुठल्या कुठल्या क्षेत्रात भ्रष्टाचार सगळ्यात पहिल्यांदा कमी व्हावा असं तुम्हाला वाटतं? आणि याची उत्तरं उदा. नगरपालिका, पंचायत समिती, तलाठी कार्यालय, वाहतूक नियंत्रण कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, वीज कार्यालय इथला भ्रष्टाचार सामान्य माणसांना त्रासदायक वाटत असेल, तर पहिले तो कमी कसा करता येईल यासाठी प्रत्यक्ष प्रयत्न व्हायला हवेत.

शेतकरी संघटनेने मुळातच अशी घोषणा दिली होती की, सरकार समस्या क्या सुलझाए, सरकार खुद समस्या है.' सरकारचा हस्तक्षेप कमीत कमी राहिला तर भ्रष्टाचार कमी होतो हे आता जगभर मान्य झाले आहे; पण अण्णा हजारे मात्र सरकारी हस्तक्षेपाबाबत काहीच बोलत नाहीत, ही चिंताजनक गोष्ट आहे. सरकारी यंत्रणा हीच मुळात भ्रष्टाचाराची गंगोत्री आहे. तिची कितीही साफसफाई करा... मुळातच ही यंत्रणा भ्रष्टाचाराला पोषक असल्यामुळे परिणाम फारसा होणार नाही. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सरकारी हस्तक्षेप कमीत कमी करणे, सरकारी यंत्रणा सुटसुटीत करणे, करांची रचना सोपी करणे या बाबींवर आधी विचार करावा लागेल, तसेच न्यायालयीन यंत्रणा निर्दोष पद्धतीने राबवून दोषींवर तात्काळ कारवाईचा बडगा उगारावा लागेल. इतका सखोल अभ्यास करत बसण्याची कुणाला गरज वाटत नाही, कुणाची इच्छा नाही. सर्वसामान्य लोकांपर्यंत एक रुपया पोहोचविण्यासाठी राजरोसपणे सरकारी यंत्रणा ७० पैसे खाऊन टाकणार असेल (यातला भ्रष्टाचार परत वेगळाच), तर भ्रष्टाचाराविरुद्ध आंदोलन म्हणजे मोरीत बोळा कोंबायचा आणि दरवाजा उघडा ठेवायचा असा प्रकार ठरेल.

**कार्यकारी संपादक**

# खुले पत्र

## शेतकरी संघटकच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त श्री. शरद जोशी यांनी लिहिलेले पत्र



**शरद जोशी**

शेतकरी संघटक गेली २७ वर्षे अव्याहतपणे सुरू आहे. या प्रकाशनाच्या काळात कित्येक महत्त्वाच्या घटना घडल्या आहेत, अनेक आंदोलने झाली आहेत. काही काळ अंक निघू शकले नाहीत पण सर्वसाधारणपणे बोलायचे झाले तर अंक नियमितपणे प्रकाशित होत राहिले.

शेतकरी संघटकच्या आयुष्यातील एक महत्त्वाची घटना म्हणजे एप्रिल २०१० मध्ये शेतकरी संघटकच्या स्वरूपात झालेला बदल. ६ एप्रिल २०१० पासून शेतकरी संघटक 'स्टॉल सेलेबल' स्वरूपात निघू लागला. त्याबरोबरच, 'जनशक्ती वाचक चळवळ' या प्रकाशनसंस्थेने शेतकरी प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या तसेच शेतकरी संघटक व इतर नियतकालिकांतून प्रकाशित झालेल्या शेतकरी संघटनेच्या सर्व साहित्याचे पुनर्मुद्रण करण्याची मोहीम हाती घेतली. त्यामुळे, शेतकरी संघटनेचे सर्व साहित्य नव्या मोहक व गोजिरवाण्या रूपात लोकांसमोर आले एवढेच नव्हे तर या पुनर्मुद्रित पुस्तकांची मोठ्या प्रमाणात विक्री सुरू झाली आणि ती शेतकरी संघटनेच्या परिघाबाहेरील, विशेषत: बिगरशेतकरी लोकांपर्यंत पोहोचू लागली.

आज नव्या स्वरूपातील शेतकरी संघटकच्या दुसऱ्या वर्षाचा आणि शेतकरी संघटकच्या २८व्या वर्षाचा पहिला अंक प्रकाशित होत आहे. आज संध्याकाळी होणाऱ्या २८व्या वर्षाच्या पहिल्या अंकाच्या प्रकाशनाच्या कार्यक्रमास मी येण्याचे कबूल केले होते पण ही साधी जबाबदारीही मी पार पाडू शकत नाही. याची अनेक कारणे आहेत. पण याचे प्रामुख्याने कारण हे की माझे हातपाय सध्या चालत नाहीत. मनात इच्छा पुष्कळ असली तरी हातपाय चालत नसले तर प्रवास करणे काही शक्य होणार नाही. हे जर लक्षात घेतले तर, मला असे वाटते की, यापुढे सर्वच कार्यक्रमांतून काही काळ तरी विराम घेणे आवश्यक आहे. आवश्यक ती विश्रांती आणि उपचार घेतले की मी पुन्हा हिंडूफिरू लागेन. पण, त्यासाठी काही काळ जावाच लागेल.

त्यापलीकडे जाऊन या प्रसंगी काही आत्मचिंतन करण्याची गरज आहे.

९ फेब्रुवारी २०११ रोजी मी एअर इंडियाच्या विमानाने पुण्याहून दिल्लीला 'जागतिक अन्नसुरक्षे'च्या विषयी एका आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी जाण्यास निघालो ते एक अंगात भरपूर शक्ती असलेला पण वयाने म्हातारा वय पंचाहत्तर वर्षे चार महिने असा इसम. दिनांक १० फेब्रुवारी २०११ रोजी सकाळी उठल्याचे आणि सर्व आह्निके उरकल्याचेही आठवते. टी मेकरवर चहा करून घेतल्याचेही आठवते. चांगला भरपूर तीन कप चहा करून प्यायलो. त्यानंतर 'आता नाश्ता कोठे करावा' याचा विचार करू लागलो. हॉटेलातच खाली तळमजल्यावर नाश्त्याची व्यवस्था होती तेथे जावे की परिषदेच्या आयोजकांनी परिषदेच्या ठिकाणी व्यवस्था केलेल्या नाश्त्याच्या सोयीचा लाभ घ्यावा याचा विचार मी करीत होतो एवढे मला आठवते. त्यानंतर त्या विचारातच, मी जेथे रात्रीचा मुक्काम केला होता त्या रॅडिसन हॉटेलचा जिना उतरू लागलो एवढेही मला अंधूक आठवते. त्यानंतर काय घडले याबद्दल माझ्या आठवणीत सगळा अंध:कारच आहे. बहुतेकांचा तर्क असा आहे की माझा जुना, मेंदूचा आजार पुन्हा बळावला आणि त्याचाच एक क्षणिक झटका बसून मी तात्पुरता का होई ना, बेशुद्ध झालो. काही काळतरी माझी शुद्ध हरपली होती ही गोष्ट खरी. त्यानंतरचे मला जे आठवते ते आजूबाजूला दोनचार डॉक्टर जमा झाले आहेत व ते माझ्या प्रकृतीविषयी चर्चा करीत आहेत ही गोष्ट. त्यांच्या बोलण्यावरून मी जिन्यावरून पडलो आहे असे मला समजले. त्या नंतर मला लाजपतनगर येथील मूलचंद इस्पितळात हलवत असल्याचीही अंधूक जाणीव आहे.

त्यानंतर जे काही स्मरण आहे ते मी माझ्या नव्या रूपात म्हणजे 'अंगं गलितं पलितं मुंडं, दशनविहीनं जातं तुंडं' तरीही 'त्यजति न चेत: आशाबंधं' अवस्थेत असल्याचे. मला, म्हटले तर काही आशापाश बांधणारे नव्हतेच. जन्मभर शेतकरी या एका प्रश्नाखेरीज मी कोणतीही निष्ठा ठेवली नाही. मुळात शेतकरी संघटनेत मी आलो तेच अपघातांच्या अनपेक्षित मालिकांचा परिपाक म्हणून. एवढे मी निश्चित सांगू शकतो की, मागे मी एका लेखात म्हटल्याप्रमाणे डोंगरचढाई करताना दोन हात आणि दोन पाय यांतील तीन गोष्टी घट्ट रोवून चवथ्या अवयवाने चाचपडून पुढचा आधार शोधायचा असतो त्याप्रमाणे जगाचा अंदाज घेणे हे करण्यात मी प्रामुख्याने आयुष्य घालवले. हा काही फार मोठा डोळस शोध होता असे नव्हे, पण हत्ती शोधायला गेलेल्या चार आंधळ्यांना केवळ स्पर्शाने हत्तीचे सम्यक ज्ञान होणे शक्य नाही हे कळल्यानंतर त्यांना आहे त्या ठिकाणावरून हत्तीबद्दल जेवढे ज्ञान मिळणे शक्य आहे तेवढे घ्यावे व संतुष्ट रहावे ही बुद्धी झाली या गोष्टीप्रमाणे आपली जी कुवत आहे त्यापेक्षा अधिक काही करणे कोणाही प्राणिमात्राला शक्यच नसते. तेवढेच मी माझ्या कुवतीनुसार पार पाडीत आलो. यापलीकडे मला बांधणारा असा आशाबंध नाही.

आजही मी जिवंत आहे याचा अर्थ असा की मला बांधून ठेवणारा काहीतरी दोर आहे. तो काय आहे याचा शोध घेणे हे माझे आता उर्वरित आयुष्याचे जीवितकार्य आहे. मी मघा सांगितल्याप्रमाणे शेतकरी संघटनेच्या कामात मी अपघातांच्या मालिकेमुळे आलो. पण प्रत्येक ठिकाणी मी काही ना काही पदरात साठवूनही ठेवले.

शेतकरी संघटनेचे काम करीत असताना माझ्या समोर एक नवा आविष्कार घडला. तो म्हणजे जैविक तंत्रज्ञानाच्या अमर्याद व्यापाचा, क्षमतेचा व शक्यतांचा. यापूर्वी, फ्रान्सिस फुकुयामा याने त्याच्या 'द एंड ऑफ हिस्ट्री ॲंड द लास्ट मॅन' या पुस्तकात 'स्वतंत्रतावादी लोकशाही हा इतिहासाचा शेवट आहे' ही मांडणी मोठी घासूनपुसून केल्याचा उल्लेख मी केला आहे. परंतु, तो प्रश्न सोडविण्याचा मार्ग मला अकस्मातपणे

शेतकरी संघटनेच्या कामातूनच दिसला; एरव्ही तो दिसला नसता.

जैविक शास्त्राने माझ्या मनात पहिल्यांदा 'सर्व मनुष्यप्राणी समान आहेत' या प्रमेयाबद्दल शंका निर्माण केली आणि मनुष्याची सर्वच कामे आणि भविष्य हे त्याच्या जनुकांच्या आधाराने ठरत असावे एवढेच नव्हे तर ही जनुकेच प्रचंड स्पर्धात्मक परिस्थितीत निर्णायक ठरत असावीत अशी जाणीव होऊ लागली. याची अनेक उदाहरणे देता येतील, ती देण्याचा मोह मी विस्ताराच्या भयाने टाळतो आहे.

पण, फुले आंबेडकरवादातील समानतेचे गृहीततत्त्व तुटले की त्यानंतर सहजच स्वतंत्रतावादी लोकशाहीला आह्वान देण्याची ताकदी संपुष्टात येतात हे लक्षात आले. त्यातून मग जनुकांचा उगम काय आणि त्यांचा काही पूर्वजन्मीच्या पुण्यकर्म वगैरेंशी संबंध असावा काय हाही विचार करीत मी सरळ अध्यात्मवादाच्या गूढ गाभ्यातच शिरलो.

शेतकरी संघटनेच्या कामात यापुढे पूर्वीप्रमाणे काही लक्ष घालता येईल असे मला वाटत नाही. याचा अर्थ मी सर्वतः संघटनेच्या कामापासून अलिप्त आणि अनुपलब्ध रहाणार आहे असेही नव्हे. आवश्यकतेनुसार मी कार्यकारिणी सदस्यांच्या सल्लामसलतीसाठी सवडीप्रमाणे उपलब्ध राहीनच. पण, त्याची वेळापत्रके मर्यादित रहातील. पूर्वीच्या नियमितपणाने बैठकीमेळाव्यांना हजर रहाणे हे मला यापुढे शक्य होणार नाही. याचा अर्थ शेतकरी संघटनेच्या विचाराचा वारसा मी सोडला आहे असे नाही. आजही 'स्वातंत्र्याच्या चार कक्षा' ही संकल्पना मला अत्यंत प्रिय आहे. परंतु, जनुकशास्त्राच्या प्रचंड भांडारात शोधाशोध करण्यास ही मिणमिणती पणती फारशी उपयोगाची नाही. तरीपण शेतकरी संघटनेच्या कामात मला मिळालेला वारसा म्हणून मला ती जीवापाड जतन करून ठेवावीच लागेल. 'स्वातंत्र्याच्या चार कक्षा' हा विचार केंद्राशी ठेवून मला जैविक शास्त्रातील प्रमेयांचा कसोशीने अभ्यास करावा लागेल. त्यातून खरोखरच जर फ्रान्सिस फुकुयामाचे कोडे सुटणार असेल आणि इतिहासाची मर्यादा स्वतंत्रतावादी लोकशाहीशी संपत नाही हे स्पष्ट होणार असेल तर मग अध्यात्मवाद आणि जडवाद यांचा एक अनोखा मनोहारी संगम माझ्या यापुढील चिंतनात मिळणार आहे.

आतापर्यंत मी अनेक वेळा मूलग्राही चिंतन केले आहे. या चिंतनाने शेतकरी संघटनेच्या साऱ्या कार्यकर्त्यांना भारून टाकलेले होते. आजही ती शक्ती माझ्या चिंतनात आहे असे मला वाटते. शेतकरी संघटनेच्या विचाराचे, विशेषतः स्वातंत्र्याच्या चार कक्षा या संकल्पनेचे ऋण मान्य करूनही संघटनेच्या कामापासून मला काहीसा काडीमोड घेणे हे आवश्यक आहे. नाही तर, संघटनेच्या विचारांच्या मोहक जालातून सुटणे मला कठीण होईल आणि माझ्या यापुढील चिंतनासाठी मला हवा असलेले निवांतपण दुर्लभ होईल. या कारणास्तव, ज्या तऱ्हेने विश्वविद्यालयात वर्षानुवर्षे एकच अभ्यासक्रम शिकवून आपली बौद्धिक क्षमता कुंठित होत चालल्याची जाणीव झालेला एखादा प्राध्यापक 'सबॅटिकल' रजा घेतो तसे मी संघटनेच्या कामापासून 'सबॅटिकल' रजा घेण्याचे ठरवले आहे.

या माझ्या वनवासातून मी काहीतरी दिव्य हिरेमाणके घेऊन बाहेर पडेन, नच पडल्यास कालाच्या उदरात इतर अनेकांप्रमाणेच मीही लुप्त होऊन जाईन एवढेच. पण, शेतकरी संघटनेच्या आणि शरद जोशींच्या विचारात 'विचार देणारा कोणी थोर महात्मा असत नाही; लाखो माणसे धडपडत प्रयत्न करीत असताना अनेक चुका करतात, आणि त्या चुका सुधारण्याची ताकदही दाखवतात. यातूनच हळू हळू उत्क्रांती होत जाते आणि सुधारणा होत जाते' असे मानले आहे. माझ्या यापुढील विचारमंथनातून काही हिरेमाणके मिळवण्यात मला यश मिळाले नाही तर आणखी एक प्राणी धडपडत प्रयत्न करीत गेला पण तो शेवटपर्यंत, असेल त्या प्राप्त परिस्थितीमध्ये, विश्वाचा शोध घेणे आणि त्याच्या कारणपरंपरेविषयी अंदाज बांधणे हे पवित्र कार्य करता करता गेला एवढेतरी समाधान मी माझ्या कार्यकर्त्यांना देऊ शकतो.

सारांश, या परिस्थितीत मी मनात आणले तरी शेतकरी संघटना आणि शेतकरी संघटक यांचे काम कितपत सक्षमपणे चालवू शकेन याबद्दल माझ्या मनात शंका आहे. आणि त्यामुळे मी असा निर्णय घेत आहे की मी शेतकरी संघटक आणि शेतकरी संघटना यांची जबाबदारी किमान एक वर्ष बाजूला ठेवत आहे. एक वर्षानंतर काय होईल ते सांगणे मोठे कठीण आहे पण या एक वर्षानंतर जी परिस्थिती असेल तिच्या अनुषंगाने व तिचे पुनरावलोकन करून या निर्णयाचा फेरविचार करता येईल. सुदैवाने, शेतकरी संघटक आता 'स्टॉल सेलेबल' स्वरूपात उपलब्ध आहे एवढेच नव्हे तर शेतकरी संघटनेचे सर्व साहित्य, विचारधन नव्या मोहक रूपात लोकांच्या हाती आले आहे. याचे सर्व श्रेय शेतकरी संघटकचे कार्यकारी संपादक श्री. श्रीकांत उमरीकर यांच्या अथक प्रयत्नांना द्यायला हवे. केवळ या बदलामुळे मला माझा एक वर्षाच्या विरामाचा निर्णय घेणे शक्य होत आहे याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला पाहिजे.

शेतकरी संघटनेच्या या प्रवासातच जैविक तंत्रज्ञानाचे महत्त्व माझ्या लक्षात आले आणि त्यातून एका वेगळ्या दिशेने अध्यात्माचा विकास करण्याची आवश्यकता वाटू लागली. शेतकरी संघटनेची स्थापना करताना मी जितक्या उत्साहाने मार्क्सवादाच्या विपरीत जडवादाची मांडणी केली तितक्याच उत्साहाने अध्यात्मवादाची मांडणी करण्याची माझी इच्छा आहे. जैविक तंत्रज्ञानाच्या कक्षा आणि अध्यात्माच्या सीमारेषा या कोठेतरी जुळतात असे मला वाटते आहे. त्या दृष्टीने शेतकरी संघटनेपासून घेतलेल्या या विरामाच्या काळात मी काही अध्ययन, मनन व चिंतन करू इच्छितो. त्यामुळे शेतकरी संघटनेच्या विचारातील एकांगीपणा जाऊन त्याला अधिक प्रगल्भता येईल असा मला विश्वास वाटतो. उत्साहात काही कमी नाही, ताकदीत काही थोडीफार असेल तर कमी असेल परंतु एका वेगळ्या रस्त्याने जाण्याचे स्वातंत्र्य शेतकरी संघटनेने मला द्यावे.

आपल्या आतापर्यंतच्या सर्व सहकार्याबद्दल अत्यंत ऋणी आहे.

(४ मार्च २०११)

**शरद जोशी**

'अंगारमळा', अंबेठाण, ता. खेड, जि. पुणे.

sharadjoshi.mah@gmail.com

■■

शेतकरी संघटक
स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

# २७ वा वर्धापन दिनाचा समारंभ उत्साहात

## शेतकरी संघटनेचं काम थांबतं तिथून कृषी पत्रकारिता सुरू होते- निशिकांत भालेराव

**औरंगाबाद दि.६ एप्रिल** - शेतकरी संघटक पाक्षिकाचा २७ वा वर्धापन दिन औरंगाबाद येथे उत्साहात साजरा झाला. ज्येष्ठ पत्रकार निशिकांत भालेराव यांच्या हस्ते वर्धापन दिनाच्या अंकाचं प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचं प्रास्ताविक संपादक सुरेशचंद्र म्हात्रे यांनी केले. शरद जोशी यांनी या कार्यक्रमाला येण्याचं मान्य केलं होतं; पण प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना येता आलं नाही. त्यांनी आपल्या भावना पत्राद्वारे व्यक्त केल्या. आपल्या प्रास्ताविकात हे पत्र सुरेशचंद्र म्हात्रे यांनी वाचून दाखवले (ते संपूर्ण पत्र अंकाच्या सुरुवातीला देण्यात आले आहे.) दैनिक प्रहारचे उपसंपादक राम जगताप यांना प्रमुख वक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. मराठी पाक्षिकं आणि साप्ताहिकांची सद्यस्थिती या विषयावरील त्यांचं संपूर्ण भाषण याच अंकात देण्यात आले आहे.

पाहुण्यांचं स्वागत स्वतंत्र भारत पक्षाचे अध्यक्ष वामनराव चटप यांनी ग्रंथभेट देऊन केले. मंचावरती शेतकरी संघटनेचे माजी अध्यक्ष, राष्ट्र सेवा दलाचे ज्येष्ठ कार्यकर्ते मा. भाऊसाहेब बोरावके, माजी आमदार वामनराव चटप, संपादक सुरेशचंद्र म्हात्रे, कार्यकारी संपादक श्रीकांत उमरीकर हे पाहुण्यांसोबत विराजमान होते. कार्यक्रमाच्या समारोपात ज्येष्ठ पत्रकार निशिकांत भालेराव यांनी स्पष्टपणे आपल्या सडेतोड शैलीत पत्रकारिता, कृषी पत्रकारिता यांच्यावरती मत प्रदर्शन केले.

### निशिकांत भालेराव



'वाचकांची मर्जी जाणून घ्यायला येणाऱ्या वृत्तपत्रांनी हे समजून हे ठरवून टाकलेलं आहे, सचिन तेंडूलकरला भारतरत्न द्या! वृत्तपत्रांना हे माहिती नाही, की यावर्षीचं बीटी बियाणं शिल्लक नाही इतकं ॲडव्हान्स बुकिंग झालेलं आहे. कित्येक हजार कोटी रुपयांचा धंदा सगळ्या सीड कंपन्यांनी केलेला आहे. मला काही सीड पाहिजे होतं. पाठवायचं होतं माझ्या एका नातेवाईकाला. माझ्या इतक्या ओळखी असताना कुठेच सीड उपलब्ध नाही. त्याची कारणं काय आहेत? तर यावेळेस त्याला बंपर भाव मिळाला आहे, म्हणून शॉर्टेज आहे आणि पुढच्या वर्षभरामध्ये हे पुन्हा दुप्पट होतं का काय? सोन्यासारखा भाव त्याला येतो का काय? असं पण वाटतंय. याची साधी दखलही घ्यावी वाटत नाही मुख्य प्रवाहातल्या वृत्तपत्रांना... त्यांना महत्त्व सचिन तेंडूलकरला भारतरत्न द्या असं कोणी तरी म्हणतं आणि त्याच्या बातम्या होतात. अशा प्रत्येक गोष्टीमध्ये सांगता येऊ शकतं आणि याचं कारण असं की एक फार पद्धतशीर डाव इथल्या जबाबदार वृत्तपत्रांनी रचलेला आहे, की सतत सतत एका सूरम्य अशा गोष्टीमध्ये वाचकांना गुंतवून ठेवायचं म्हणजे इलिजन्स निर्माण करायची. आता काय वर्ल्ड कप संपला, आता आयपीएल आलेलं आहे. मग आयपीएल संपलं, की अजून काही तरी निघतंच त्याच्या मागे.'

कृषी पत्रकारितेसंदर्भात बोलताना निशिकांत भालेराव यांनी जालना येथील २००४च्या शेतकरी संघटनेच्या अधिवेशनाचा उल्लेख केला. 'मला मुद्दा मांडायचाय कृषी पत्रकारितेच्या संदर्भात... मुख्य प्रवाहातल्या पत्रकारितेची जर का होपलेस केस असेल! तर याला काहीतरी एक पर्यायपण पाहिजे. असं म्हणून मला चालणार नाही... मला काहीतरी एक पर्याय पण द्यावा लागेल तो आहे विकासात्मक पत्रकारितेचा. कृषी पत्रकारिता म्हणून जेव्हा २००४ च्या जालन्यामध्ये झालेल्या शेतकरी संघटनेच्या अधिवेशनामध्ये माझा सोळा जणांचा स्टाफ जेव्हा पेपरचं नावही निश्चित झालेलं नव्हतं. आम्ही जेव्हा तिथे गेलो दोन दिवस राहिलो आणि माझ्या पुण्या-मुंबईमधल्या स्टाफला शरद जोशी कोण? काय करतात? कोण कोण लोक आहेत त्यांच्याबरोबर? कशा पद्धतीने शेतकरी संघटना आहे? कोणते विषय मांडले जातात? शेतीचं अर्थशास्त्र हे कशा पद्धतीने एखादी संघटना तोलून धरते? याच्याविषयी ट्रेनिंगचा पहिला दिवस हा आमचा जालन्याच्या २००४ मधलं शिबीर होतं. तिथे काही गोष्टी आमच्या लक्षात यायला लागल्यात की यामध्ये आपण अजून खूप मागे आहोत. समजतंच नाहीत गोष्टी! म्हणजे स्केल ऑफ फायनान्स हा जो विषय आहे जो शेतीमधला महत्त्वाचा गाभा आहे तो जर का माझ्यासारख्या संपादकाला समजत नसेल तर तो मी कसं काय मी उपसंपादकांकडून आणि वार्ताहरांकडून अपेक्षा करणार? याच्यावर एक आठ महिने घासावं लागलं आधी आणि आठ महिन्यांनंतर पेपरचं नाव आणि पेपर प्रकाशित झालं. त्याच्या आठ महिने आधी त्याचं प्रॅक्टीकल ट्रेनिंग वेगवेगळ्या ठिकाणांहून झालं. मुख्य म्हणजे कृषी पत्रकारिता. जिथे शेतकरी संघटनेचं काम थांबतं तिथून कृषी पत्रकारितेचं किंवा 'ॲग्रोवन'चं या दैनिकाचं नाव घ्यायला हरकत नाही त्याची पत्रकारिता सुरू झाली. कारण शेतकरी संघटनेने एक्सटेन्शनचं काम केलेलं नाही. त्यांनी जागृतीचं काम केलं. त्यांनी ज्योत पेटवली आणि कृषी पत्रकारिता ही विस्तार सेवेचं काम करण्यासाठी सुरू झालेली आहे.

२००४ मध्ये महाराष्ट्रातलं जेव्हा सर्वेक्षण केलं गेलं एका खासगी चांगल्या संस्थेकडनं की खरंच शेतकरी काय वाचत असतात



महाराष्ट्रातले? की खरंच काय रिडेबल टॉपिक्स आहेत शेतीमधले; अण्णा हजारेंच्या उपोषणाच्या मागे संघवालेच आहेत या अशा गृहितकावर जगतात सगळे संपादक. शेतकऱ्यांसाठीचं जर का एखादं माध्यम चालवायचं असेल तर गृहितकावर जगता येणार नाही. बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर असं म्हणावं लागेल. उदा. जर का पुढच्या ७२ तासांचं तापमान ढगाळ आहे आणि आर्द्र असेल तर नाशिकच्या शेतकऱ्यांच्या पोटात धडकीच असेल की पावडरी की डावनींग इम्ल्यू येणार म्हणून. तसं इथे जर काही अंदाज केले जातात की अण्णा हजारेंच्या मागे अमूक असतील, तमूक असतील. असं इथे करता येणार नाही. त्यामागे शास्त्रशुद्ध पाया असला पाहिजे आणि त्याच्यामुळे शेतकरी नेमकं काय वाचतात हे जाणून घेण्यासाठी जेव्हा एक १३ हजार शेतकऱ्यांचा सॅम्पल सर्व्हे केला गेला तेव्हा सगळ्यांचा भ्रमाचा भोपळा फुटला. सकाळ मध्ये जे होते त्यांचेही फुटले होते त्यावेळेस, कारण शेतकरी दोनच गोष्टी वाचताता असं लक्षात आलं - एक म्हणजे राजकारणाच्या बातम्या आणि ते का वाचतात असा जेव्हा प्रश्न विचारला गेला तेव्हा, 'तुमच्या पेपरमध्ये दुसरं काय असतं?' असा त्याला उपप्रश्न होता? आणि मग जर तुम्हाला दुसरं चॉईस दिलं काय तर वाचाल? मग त्यांनी लिस्टच दिली, की आम्हाला पेस्टीसाईड्सविषयी वाचायला पाहिजे. आम्हाला पुढच्या एक महिन्याचा हवामानाचा अंदाज पाहिजे... आम्हाला बाजारात नवीन आलेल्या वाणांची माहिती पाहिजे... आम्हाला परदेशातल्या विविध बाजारपेठांमधल्या भावांचे चढउतार कसे होतात ते माहीत पाहिजे. रिझर्व्ह बँकेचं धोरणाविषयी सहा महिने आधीच आम्हाला समजू शकेल काय याच्याविषयीची माहिती पाहिजे. ट्रॅक्टर दुरुस्त कसा करावा याच्याविषयीची ग्राफिकल प्रेझेंटेशन तुमच्या पेपरमध्ये देता येतील काय? याच्याविषयीची माहिती पाहिजे.

आता शेतकऱ्यांसाठी असं करत असताना मला याची नम्र जाणीव होती, की शेतकरी जरी असला, बहुजन समाजातला शेतकरी वाचक आहे सगळा... जो कार्यकर्ता आहे वेगवेगळ्या पातळ्यांवरचा याला राजकारणामध्येही रस असेल... पण माझं जे राजकारण मी सांगणार आहे त्यांना... ते काहीतरी रघुनाथदादा पाटलांनी बारामतीत जाऊन धरणं धरलं आणि तिथलं राजकारण वगैरे यामध्ये मला इंटरेस्ट नाही... मला जिओपॉलिटीकल इंटरेस्ट आहे... की फायबर, फ्युअल आणि फूड हे पुढच्या दशकातले सगळ्यांत महत्त्वाचे आणि कळीचे मुद्दे आहेत. त्याच्यावरती मला माझ्या वाचकाला सक्षम करावं लागेल.

कृषी पत्रकारिता मला करायची असल्यामुळे मला जर शेतकरी वाचकाला जो एन्ड युझर आहे माझा वाचक त्याला सक्षम करायचं असेल, तर माझ्या प्रत्येक शब्दामध्ये तेवढं उपयुक्तता मूल्य निर्माण करणं गरजेचं आहे आणि त्याच्यासाठी मला एक खूप मोठी यंत्रणा शेतकऱ्यांची आणि कृषी शास्त्रज्ञांची पाहिजे. मी तर पत्रकार आहे... मी हातात कधीच नांगर धरलेला नाही आणि तरीही मी कृषी पत्रकारिता करत असेल. तर माझी अशी काही स्वतःची जबाबदारी असेल ना, की मी प्रत्येक गोष्ट तपासून बघणार आणि मग त्यामध्ये कितीही वेळ गेला तरी हरकत नाही. मला इकडे शेतीमधले विषय घेताना गरज वाटली पाहिजे की मला नाही घाई करायची. कारण मी जर का असं करायला लागलो तर त्याची विश्वासार्हता राहणार नाही... पेपरची! कारण शेतकरी म्हणणार, की इथे तुम्ही लिहिलंय की सेव्हर फवारा म्हणून आणि मी ते फवारलं, त्याची मात्रा अमूकअमूक होती आणि माझं तर पीक गेलं - द्राक्षाची बाग सगळी करपून- मग आता तुम्हीच जबाबदार! असे आलेले आहेत शेतकरी माझ्याकडे! असे शेतकरी सकाळ, लोकमत किंवा महाराष्ट्र टाइम्सकडे जाणार नाहीत. त्यामुळे माझ्या म्हणण्याचा मुद्दाच एवढाच, की कृषी पत्रकारिता ही पर्याय आहे मुख्य प्रवाहातील पत्रकारितेला.

म्हणजे मला करिअरचं छापायचं असेल, तर मला अशा पद्धतीचं छापावं लागेल, की शेतकऱ्यांच्या काही मुलांनी नाही केलेलं शिक्षण... तो स्थानिक शेतीशाळेमध्येच जातोय... शेतकी विद्यालयात जातोय... त्याच्यामुळे त्याच्या बुद्धिचा आवाका वेगळाय- त्याच्यासाठीचं रोजगार निर्मिती करायची असेल तर मला पर्याय शोधावे लागतील.

उदा. हार्वेस्टरसारखं एखादं मशीन त्या भागात आल्यानंतर चार मुलांनी हार्वेस्टर घेऊन त्याच्यावरती काही पैसे त्यांना कामावता येतात का? मला अंदाज बांधावा लागेल... अशा पद्धतीने करिअरची आखणी त्या दैनिकातून देता येईल का? याचे कृषी पत्रकारितेला काही नमूने तयार केले गेले. त्यांना जर का रुचिरासारखं काही द्यायचं असेल तर गावाकडची चव काय असते? ती जे आधी करतात त्यांना एकदम जर का मी आपल्या तो जो आहे शेफ मोठा त्याच्यासारख्या रेसिपी करायला सांगायला गेलो तर त्याला नाही जमणार... त्याच्यामुळे त्यांना हळूहळू सवयच लावायची होती... आणि एक गोष्ट ठाम होती की सगळ्याच गोष्टी शेतीमधल्या, गावाकडल्या असं सागायचं ठरलेलंच नव्हतं, हे पहिल्यापासनं कृषी पत्रकारितेतलं तत्त्व होतं... की माझा जो एन्ड युझर आहे, त्याने लॅन्ड क्रूझरमधनंच हिंडायला पाहिजे... त्याच्यासमोरचं उद्दीष्ट... म्हणजे काहीही लपून नव्हतं त्यामध्ये... की कशाचा डेमो... कारण मग समाजवाद्यांमधल्या काही जणांना जसं वाटतं, की संपत्तीचा कसा काय एवढा हव्यास? तुम्ही पंचतारांकित हॉटेलमध्ये तसं कसं काय नेणार? आम्ही सगळ्या गोष्टी अशाच केल्या होत्या की, पंचतारांकित हॉटेलमध्येच सेमिनार होतील शेतकऱ्यांचे. कारण त्यांनी आलंच पाहिजे त्याच्यामध्ये... कारण तुमच्यासुद्धा मूळ मुख्य प्रवाहातले वृत्तपत्रं जे आहेत, त्यांच्या अर्ध्याच्या वरती वाचक हा शेतकरीच आहे... आता तुम्ही औरंगाबादमधनं आवृत्त्या काढत असाल, तर मर्जी राखायची असेल तर तुम्हाला जाऊन ते शेतकऱ्यांनाच विचारावं लागेल की काय आजच्या मराठवाड्यामधले महत्त्वाचे प्रश्न? कोणतं मराठवाड्यातलं दैनिक ते मग सकाळ असो, लोकमत असो किंवा अजून मग लोकपत्र असो... की काय मांडतायत गेल्या सहा महिन्यांपासनं मराठवाड्यातल्या सगळ्या प्रश्नांची जी कोंडी झालीय. त्याच्यावरती ना आमदार कोणी आवाज उठवतोय ना कोणी वृत्तपत्र!

मला असं वाटतं की येणारा काळ हा शेतीचा काळ आहे. पुढचे दहा-पंधरा वर्षे तरी शेतीच्याच दृष्टीने भरभराटीची आहेत. खूप अडचणी

आहेत आणि खूप अडचणी असल्यामुळेच पत्रकारितेला तिथे वाव आहे. शेतीचा प्रश्नपण अजून ऐरणीवर आलेला नाही... येतोय हळूहळू त्याच्यामध्ये. या अडचणीच्या काळामध्ये शेती तारू शकणारी माध्यमंच नवीन होतायत. माध्यमांचं स्वरूप पूर्णपणे बदललंय.

पहिल्यांदी मला असं सांगायचं की येणारा काळ हा शेतीचा आहे आणि बिगर शेतीमधले शेकडो नाही लाखो नाही कोट्यवधी लोक शेतीमध्ये इंटरेस्ट घेतायत... पण हे समजून सांगण्याचं माझं माध्यम जे मी निवडलंय ते फार्म व्हिले नावाचं खेळ निवडलाय... जगभर १८ कोटी लोक रोज फार्म व्हिले नावाचा खेळ खेळतायत. ज्याच्यामध्ये शेती कशी करायची याच्या वेगवेगळ्या गोष्टी आहेत, ही व्हर्च्युअल शेती आहे आणि यांचा एकूण मित्र परिवार जर पाहिला तर हा कोट्यवधी पसरलेला आहे. माझ्या दृष्टीने जेव्हा असा एखादा नेटवरती ट्रेन्ड असतो तर हा ट्रेन्डच पुढचं काहीतरी सांगत असतो. म्हणजे क्रिकेटचा खेळ असा असतो, तर आपण असं लगेच म्हणणार की पुढचं क्रिकेटचंच येणार. मग मी असं म्हणणार की जर का एवढे कोट्यवधी लोक शेती कसं करायचं खेळतायत नेटवर, तर मग शेतीचा ट्रेन्ड का नाही येणार? मला म्हणायला जागा आहे ना!

लंडनमध्ये फार्मर्स विकली नावाचं एक साप्ताहिक निघतंय. २४ लाख त्या साप्ताहिकाचा खप आहे आणि त्याचं जे पोर्टल आहे म्हणजे वेबसाईट त्यांनी जी केलीय ती इतकी अद्ययावत आहे, की त्याचा हेवा वाटावा, की असं आपल्या देशातल्या शेतकऱ्यांसाठी कोणती तरी कंपनी कधी काढणार आहे? एवढे प्रोग्रेसिव्ह सगळे विचार, आधुनिक माध्यमं घेऊन त्यामध्ये सगळ्या गोष्टी केल्या जातायत; पण पत्रकारितेमधल्या अनेकांना माहीत नाहीये याचं मला स्वतःला खूप वाईट वाटतय. मी तरी तसा छोटा प्रयत्न करतोय आणि मला अगदी स्वतःला अगदी संपूर्ण खात्री आहे की शेतीच्या विषयीचं वाचायला, शेतीमधल्या नवनवीन प्रयोगांविषयीचं करायला! आता माझं जे पुस्तक पुढच्या मे महिन्यात निघणार आहे- महाराष्ट्रातल्या वीस निवडक शेतकऱ्यांच्या ज्या यशोगाथा आहेत, त्या वेगळ्या पद्धतीने त्यात मांडल्या आहेत... शेतकऱ्याची एक शेतकरी म्हणून पर्सनॅलिटी नाही, तर एक माणूस त्याचं व्यक्तीमत्त्व काय? कसा आहे शेतकरी? म्हणजे सांगितलं पाहिजे तुम्हाला, की ज्ञानेश्वर बोडके नावाचा इंजेवाडीला एक शेतकरी मी पाहिलाय, जो इन्फोसिस आणि टाटा या दोघांच्या मोठ्या इमारतींच्या मध्ये त्याचं तीन एकराचं शेत आहे इंजेवाडीला... इंजेवाडीच्या बाजारभावातल्या जमिनीचं मुळात चार कोटी एक एकराचा रेट आहे त्याचा! पण त्याने न विकता... सत्तावीस कोटी रुपये गेल्या वर्षीची त्याची उलाढाल आहे... दोनशे तेरा स्टेक होल्डर्स शेतकरी त्याने निर्माण केले त्याने त्यामध्ये.... दोनशे तेरा शेतकऱ्यांचा गट आणि २७ कोटी रुपयांची त्याची अभिनव फार्मस नावाचं त्याचं क्लब टर्नओव्हर करतातय... पण दुर्दैवाने पहिल्या पानावर प्रहारवर, लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्सवर याच्या बातम्या येत नाहीत... एखाद्या क्रिकेटपटूला चार कोटी रुपये दिले तर मग लगेच याचं पहिल्या पानावर कौतुक सुरू होत. दुर्दैवाने होतं... हे व्हायला नको... असं शेकडो शेतकऱ्यांची यादी माझ्या खिशात नेहमी असते आणि मला म्हणूनच प्रश्न पडतो, की फार नकारात्मक पातळ्यांवरतीच सगळ्या मुख्य प्रवाहातल्या वृत्तपत्रांचा पाया रचला गेलेला आहे... सकारात्मक अनेक गोष्टी होताहेत त्यामध्ये... अनेक गोष्टी होताहेत... शेतकरी संघटनेचासुद्धा एक मोठा प्रवाह आहे जो सकारात्मक दृष्टीने पाहिला जातोय त्यामध्ये.

**पहिल्यांदी मला असं सांगायचं की येणारा काळ हा शेतीचा आहे आणि बिगर शेतीमधले शेकडो नाही लाखो नाही कोट्यवधी लोक शेतीमध्ये इंटरेस्ट घेतायत... पण हे समजून सांगण्याचं माझं माध्यम जे मी निवडलंय ते फार्म व्हिले नावाचं खेळ निवडलाय... जगभर १८ कोटी लोक रोज फार्म व्हिले नावाचा खेळ खेळतायत. ज्याच्यामध्ये शेती कशी करायची याच्या वेगवेगळ्या गोष्टी आहेत, ही व्हर्च्युअल शेती आहे आणि यांचा एकूण मित्र परिवार जर पाहिला तर हा कोट्यवधी पसरलेला आहे. माझ्या दृष्टीने जेव्हा असा एखादा नेटवरती ट्रेन्ड असतो तर हा ट्रेन्डच पुढचं काहीतरी सांगत असतो. म्हणजे क्रिकेटचा खेळ असा असतो, तर आपण असं लगेच म्हणणार की पुढचं क्रिकेटचंच येणार. मग मी असं म्हणणार की जर का एवढे कोट्यवधी लोक शेती कसं करायचं खेळतायत नेटवर, तर मग शेतीचा ट्रेन्ड का नाही येणार? मला म्हणायला जागा आहे ना!**

बराच वेळ बोललोय मी; पण तुमच्याशी बोलताना मला मनापासून आनंद वाटला, की चांगल्या लोकांच्या पुढे मला काही गोष्टी आज मांडत्या आल्या आणि शेतकरी संघटकची उत्तरोत्तर अशीच प्रगती होत राहावी.

इथले सगळे जे पत्रकार आहेत मुख्यप्रवाहातले त्यांना हात जोडून विनंती करतो शेवटी, की जेव्हा काही पर्याय आणि तंत्रज्ञान येईल, ज्याच्याने खरी क्रांती होणार आहे त्याला निदान पहिल्या पानावर एक सिंगल कॉलममध्ये तरी बसवता आलं तरी मला खूप आनंद होईल. धन्यवाद!

कार्यक्रमाचं सूत्रसंचालन कार्यकारी संपादक श्रीकांत उमरीकर यांनी केलं. साहित्य संस्कृती मंडळाचे माजी अध्यक्ष प्राचार्य रा. रं. बोराडे, साहित्य महामंडळाचे माजी अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील, ज्येष्ठ पत्रकार प्रा. जयदेव डोळे, ज्येष्ठ पत्रकार अरविंद गं. वैद्य, क्षेत्रिय प्रचार अधिकारी शाहू पाटोळे, साहित्यिक धनंजय चिंचोलीकर, श्याम देशपांडे, सरदार जाधव, मीडिया केअरचे दत्ता जोशी, प्रकाश भेरजे, वीज पारेषण कंपनीचे अधिक्षक अभियंता शशांक जेवळीकर, वितरण कंपनीचे उपअभियंता गणेश चाकूरकर, अल्केमी प्रोसेसर्सचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद सेवलीकर, तसेच शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रवि देवांग, माजी आमदार सौ. सरोजताई काशीकर, सौ. शैलाताई देशपांडे, महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. जयश्रीताई पाटील, ॲड. अनंत उमरीकर, गोविंद जोशी, डॉ. आप्पासाहेब कदम, कैलास तवार, ॲड. प्रकाशसिंह पाटील, गंगाधर मुटे, ज्ञानेश्वर शेलार, ॲड. सा. मा. पंडित आदी अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शेतकरी संघटक ब्युरो**

■■

# मराठी साप्ताहिके आणि पाक्षिकांची सद्य:स्थिती

-राम जगताप

मराठी साप्ताहिकं आणि पाक्षिकांची सद्यस्थिती असा माझा विषय आहे. सध्याच्या परिस्थितीत मराठी साप्ताहिकांची अवस्था फारशी समाधानकारक नाही ही वस्तुस्थिती आहे. आपल्याकडे साप्ताहिकांचा असा इतिहास आहे की, पंचवीस-तीस वर्षांपेक्षा ती जास्त काळ चालत नाहीत. तेवढा काळही ती कशीबशी चालतात 'साधना'च तो काय मला या सगळ्याला एकमेव सणसणीत अपवाद दिसतो.

**असं का होतं?**

काळ बदलला तशी वाचकांची अभिरूची बदलते. त्यानुसार आपल्याकडची नियतकालिकं बदलत नाहीत, ही एक मोठी समस्या आहे. त्यसामुळे त्यांचा परिघ आक्रसत जातो. मराठीतल्या सगळ्याच साप्तहिकांचा परिघ सध्या आक्रसलेला आहे. आणि मला वाटतं त्याला वृत्तवाहिन्या, टीव्ही चॅनेल्स, लोकांची बदलती अभिरूची, त्यांची वाचनाची आवड या सर्वांपेक्षा ती स्वत:च मोठ्या प्रमाणावर जाबाबदार आहेत. लोक वाचत नाहीत, या गोष्टीवर निदान माझा तरी विश्वास नाही.

आणखी एक गोष्ट अशी आहे की, आपल्याकडे साप्ताहिकं, पाक्षिकं आणि मासिकं आणि अलीकडच्या काळात वर्तमानपत्रंही काही सामाजिक संस्था-संघटनांशी निगडीत असतात. चळवळीचं दुय्यम माध्यम म्हणूनच त्याकडे पाहिलं जातं. त्यामुळे त्यांना सर्वसमावेशक स्वरूप येत नाही. तसा प्रयत्नही केला जात नाही.

त्यातही सामाजिक आशयाची साप्ताहिकं, पाक्षिकं आणि मासिकं म्हटलं की, बलस्थानांआधी त्यांच्या मर्यादा उघड्या होतात. आक्रस्ताळेपणा, ऊरबडवेपणा, पूर्वग्रहदूषित दृष्टी आणि एकसूरीपणा या चार शब्दांनी त्यांचं भवितव्य अधोरेखित कलं जातं. कारण ही नियतकालिकं रुढार्थानं वाचकांचं मनोरंजन करण्याचं, त्यांचा अनुनय करण्याचं आळतात. स्वत:ची विचारसरणी वाचकांवर लादायचा प्रयत्न करतात, हे गृहीतक त्यामागं असतं. ते काही अंशी खरंही आहे.

पण ही नियतकालिकं राजकीय व सामाजिक परिस्थितीचं विश्लेषण करून वाचकांच्या विचारांन दिशा देण्याचं ıकम करतात. किर्लोस्कर, मनोहर, माणूस या नियतकालिकांनी हे काम एकेकाळी केलं. आजघडीला साप्ताहिक साधना, परिवर्तनाचा वाटसरू, समाज प्रबोधन पत्रिका, मिळून साऱ्याजणी, आजचा सुधारक, सत्याग्रही विचारधारा, शेतकरी संघटक यासारखी काही नियतकालिकं ही भूमिका अदा करत आहेत.

नियतकालिकांची भूमिका ठरवण्याचं काम त्याचा संपादक करत असतो. त्यामुळे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन प्रश्नांबाबत तो जेवढा सजग असेल, त्याची मतं जेवढी नि:पक्ष आणि उदारमतवादाची कासपकडणारी असतील, सामाजिक चलनवलन आणि व्यवहाराविषयी त्याचं आकलन जेवढं निर्दोष असेल, आपल्याला काय करायचं आहे आणि काय करायचं नाही याबाबत त्याचा दृष्टीकोन जेवढा सुस्पष्ट आणि स्वच्छ असेल, तेवढा तो त्याच्या नियतकालिकाचं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व घडवण्यात यशस्वी होतो.

वेगवेगळ्या विचारसरणीच्या आणि प्रसंगी ज्यांची विचारधारा मान्य नाही अशांनाही आपल्या नियतकालिकात जो जागा देतो, त्यांच्याशी प्रतिवाद कायम ठेवूनही त्यांच्या मतांचा आदर करतो, तो संपादक मग तो वर्तमानपत्राचा असो, साप्ताहिक-पाक्षिकांचा असो वा मासिकाचा असो- 'करेक्टिव्ह फॅक्टर' म्हणून रोल करण्याची भूमिका निभावत असतो. किंबहूना त्याच्याकडून हीच अपेक्षा असते. राजकीय-सामाजिक परिस्थितीच्या विश्लेषणाबाबत त्याचा हा 'करेक्टिव्ह फॅक्टर' त्याच्या वाचकांसाठी हमखास प्रमाण ठरू शकतो किंवा त्या शक्यतेच्या जवळपास असतो.

आजघडीला मराठीमध्ये प्रकाशित होणाऱ्या किती साप्ताहिकांचे आणि पाक्षिकांचे संपादक स्वत:ला या भूमिकेत पाहतात? तशी भूमिका करण्याचा प्रयत्न करतात? मी स्वतः एका दैनिकात काम करत असलो तरी दैनिकांबद्दल मी बोलणार नाही, तसं आयोजकांना अपेक्षित नाही. ते मलाही गैरसोयीचं आहे. शिवाय निशिकांत भालेराव त्याविषयी बोलतील, ते जास्त उचितही आहे.

**साप्ताहिके**

सध्या मराठीत शंभरच्या आसपास साप्ताहिकं प्रकाशित होतात. पण त्यातली बहुतांशी साप्ताहिकं ही कुठल्या तरी संस्था-संघटनांची मुखपत्रं तरी आहेत, किंवा तालुका-जिल्हा पातळीवरच्यसा वर्तमानपत्रासारखी एका तालुका-जिल्ह्यापुरतीच मर्यादित आहेत. काही विशिष्ट गटापुरती मर्यादित आहेत. त्यामुळे न्यूज मॅगझिन या प्रकारात मोडणाऱ्या फक्त चारच साप्ताहिकांबद्दल मी बोलणार आहे ती म्हणजे चित्रलेखा, लोकप्रभा, साप्ताहिक सकाळ आणि साप्ताहिक साधना. खरं तर 'साधना' ही पूर्णपणे न्यूज मॅगझिन नाही. पण मी

**शेतकरी संघटक पाक्षिकाच्या २७ व्या वर्धापन दिनी प्रमुख वक्ते म्हणून दैनिक प्रहारचे उपसंपादक श्री. राम जगताप यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्या प्रसंगी त्यांनी मराठी पाक्षिके आणि साप्ताहिके यांची सद्यस्थिती या विषयावर केलेल भाषण...**



त्याविषयी थोडं बोलणार आहे.

चित्रलेखा हे साप्ताहिक ८९ ला सरू झालं. काही दिवसांत त्याचा खप लाखाच्या घरात गेला होता. आता तो निम्म्यापेक्षाही कमी असावा. लोकप्रभाचीही स्थिती अशीच अहो. साधना हे सध्याचे एकमेव उत्तम म्हणावे असे साप्ताहिक आहे. पण त्याचा खप मात्र या तिन्हीपेक्षा फारच कमी म्हणजे ७-८ हजारच आहे. ही चार साप्ताहिकंही चार तऱ्हांची आहेत.

इथंच एक निरिक्षण नोंदवून ठेवतो. १९६० नंतर मराठीत 'विवेक', 'मार्मिक', 'सोबत' आणि 'माणूस' ही चार साप्ताहिकं सुरू झाली होती. 'विवेक' हे सरळ सरळ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचं मुखपत्र होतं. 'मार्मिक' व्यंगचित्रसाप्ताहिक म्हणून सुरू झालं असलं तरी मराठी अस्मिता आणि शिवसेनेचा पुरस्कार हेच त्याचं मुख्य ध्येय होतं. ते अजूनही आहे. 'सोबत' हे त्याकाळी गाजलेलं साप्ताहिक बेहरे यांनी सावरकरवादाच्या प्रसारासाठी सुरू केलं होतं. तशी कबुलीही त्यांनीच दिलेली आहे. 'माणूस' चा जन्मही हिंदुत्ववादी प्रेरणेतून झाला असला तरी 'माणूस'चा चेहरा उदारमतवादी होता. मुख्य म्हणजे 'विकास पत्रकारिता' आणि 'शोध पत्रकारिता' हे 'माणूस'चं बलस्थान होतं. साप्ताहिकांची पत्रकारिता कशी असावी याचं 'माणूस' हे चांगलं उदाहरण होतं.

आता सध्याची चार साप्ताहिकं पाहू. एकेकाळी लाखभर खप असलेल्या 'चित्रलेखा'चं तारू सध्या फारच भरकटलेलं आहे. अलीकडच्या काळळात ते रिडोलासचं मुखपत्र आहे की, काय असं वाटत होतं. संभाजी ब्रिगेडनं भांडारकर संस्थेवर हल्ला केला, तेव्हा 'चित्रलेखा' त्या काळात छावा, संभाजी ब्रिगेड आणि मराठा सेवा संघ यांचं मुखपत्र झालं होतं. आणखी काही दिवसांनी ते आणखी कुणाचं तरी मुखपत्र होईल. एकेकाळी मात्र अतिशय माहितीपूर्ण लेख हे 'चित्रलेखा'चं सर्वात मोठं वैशिष्ट्यं होतं. प्रत्यक्ष घटनास्थळी आपल्या पत्रकारांना पाठवून ते त्याचे सविस्तर वृत्तांत देत. त्यामुळे वाचकांची त्यानं चांगलीच पकड घेतली होती. आता ज्ञानेश महाराव यांना काय झालं तेच कळत नाही.

'लोकप्रभा'ची सध्याची अवस्थाही 'चित्रलेखा'सारखीच आहे. वसुंधरा पेंडसे नाईक यांच्या काळात एक कौटुंबिक असणारं हे साप्ताहिक ह.मो.मराठे यांच्या काळात पूर्णपणे राजकीय झालं. त्यानंतर प्रदीप वर्मा आणि सध्या प्रवीण टोकेकर यांच्या काळात मात्र त्याची अवस्था न सांगितलेलीच बरी. शिवसेना आणि मनसेची तळी उचलून धरणं एवढा एकच कार्यक्रम राबवणं हाच टोकेकरांनी आपला संपादक म्हणून ध्यास बाळगला असल्यानं, त्यात काही नवं वाचायला मिळण्याची शक्यता दुरापास्त होत चालली आहे. शिरीष कणेकर, इब्राहिम अफगाण, द्वारकानाथ संझगिरी, राजु परूळेकर अशा लोकांची सदरं कशासाठी चालवली जातात? टोकेकर 'सकाळ'मध्ये असताना 'ढिंगटांग' हे सदर ब्रिटिश नंदी या नावानं लिहीत. ते अतिशय लोकप्रिय झालं होतं. तसं एखादं सदर त्यांना 'लोकप्रभा'मध्ये चालवता आलं असतं, पण तसं न करता ते 'तथ्यांश' हे अजिबात तथ्य नसलेलं रटाळ एकपानी सदर लिहितात.

'साप्ताहिक सकाळ' माझ्या अंदाजानुसार फक्त पुण्यातच मोठ्या प्रमाणावर वाचलं जात असावं. कारण गेली तीन-चार वर्षे मी मुंबईत राहतोय. तो मला रेल्वे स्टॉलवरही फारसा दिसत नाही. (मराठवाड्यात साप्ताहिकं-पाक्षिकं-मासिकं वाचण्याची प्रथा कितपत सवयीची झाली आहे, हे मला तरी नीटपणे माहीत नाही, मी मराठवाड्याचा असलो तरी. पण ते असो.) 'साप्ताहिक सकाळ' चे सलग पंधरा-सोळा वर्षे सदा डुंबरे हे संपादक असल्यामुळे त्याला त्यांनी एक ओळख निर्माण करून देण्याचा प्रयत्न केला होता. तरीही त्यांचा मुख्य टार्गेट ऑडियन्स महिला हाच असल्यानं चटण्या, कोशिंबिरी, पाककृती, मेंदी विशेषांक, क ि विशेषांक, पर्यटन, आरोग्य हे त्यांचे मुख्य विषय असत. त्यातली सदरं केवळ रूचीपालट म्हणून आणि गंभीर लेखनही रूचीपालट म्हणूनच असत. पण डॉ. सदानंद मोरे यांची 'तुकारामदर्शन', 'लोकमान्य ते महात्मा' आणि सध्या चालू असलेली 'गर्जा महाराष्ट्र माझा' या लेखमाला 'सकाळ'मध्येच प्रसिद्ध झाल्या, होत आहेत. गो.पु. देशपांडे, शांता गोखले यांची सदरं, शास्त्रीय गायक-गायिका-वादक यांच्या मुलाखतीही 'सकाळ'मध्ये प्रकाशित झाल्या आहेत. पण अशा गोष्टींच्या वाट्याला दुर्दैवानं फारच कमी पानं येतात. आणि कळीच्या प्रश्नांवर त्यात बहुतेक वेळा काहीच नसतं. त्यामुळे ते सर्वसमावेशक होऊ शकत नाही.

एकेकाळी समाजवादी परिवाराचा गोतावळा 'साधना' भावेती मोठ्या प्रमाणावर गोळा झालेला होता. पण ते काही समाजवादी परिवाराचं मुखपत्र नव्हतं आणि नाही. पण समाजवादी परिवाराच्या संपर्कामुळे त्याची ओळख तशी झाली होती. त्यामुळे ते न्यूज मॅगझिन या प्रकारात पूर्णपणे मोडत नव्हतं. अलीकडच्या काळात विशेषतः विनोद शिरसाठ आधी युवा संपादक आणि नंतर कार्यकारी संपादक झाल्यापासून मात्र परिस्थितीत बराच फरक पडला आहे. आता 'साधना' बऱ्यापैकी व्यापक होत चालले आहे. एका साप्ताहिकानं ज्या पद्धतीनं काम करणं आवश्यक असतं, तसं सध्या 'साधना' करत आहे. अतिशय संतुलित, गंभीर प्रकरचं, निःपक्षपाती आणि उदारमतवादी दिशेने 'साधना'ची वाटचाल चालू आहे, पण एकांगी आणि नकारात्मक लेखही अजून काही प्रमाणात येतातच. त्यामुळे ज्याला खऱ्या अर्थानं साप्ताहिक म्हणावं आणि साप्ताहिक म्हणून वाचावं असं हे निदान सध्यातरी एकमेव साप्ताहिक आहे.

**पाक्षिके**

मराठीमध्ये कुठल्याही काळात पाक्षिक हा प्रकार चाललेला नाही. पाक्षिक हे मराठी माणसांना रुचत नाही. याची तीन-चार कारणं आहेत. पहिलं, मराठीतील पाक्षिकं ही साप्ताहिकासारखीच चालवली जातात. केवळ घटना-घडामोडींची माहिती देण्याचंच ती काम करतात. त्यामुळे ते नावालाच पाक्षिक असतं. त्याचा दर्जा वर्तमानपत्राच्या रविवार पुरवण्या आणि साप्ताहिकांच्या पलीकडे जात नाही. याचं कारण पाक्षिक म्हणजे नेमकं काय आणि त्याची प्रकृती व प्रवृत्ती कशी असावी हे या पाक्षिकांचे संपादकच नीट समजून घेत नाहीत. मला नेहमी असं वाटतं की, साप्ताहिकं आणि पाक्षिकांचे संपादक हे वर्तमानपत्रांच्या संपादकांपेक्षा जास्त कार्यक्षम, अभ्यासू आणि सामाजिक प्रश्नांबाबत सजग असले पाहिजेत.

वर्तमानपत्रं आणि साप्ताहिकं यांच्यापेक्षा पाक्षिकांमध्ये अधिक सखोल विश्लेषण, गंभीर स्वरूपाची चर्चा व्हायला हवी. मतमतांतरापेक्षा एखाद्या घटनेची चहूबाजूंनी सखोल चर्चा व्हायला हवी थोडक्यात पाक्षिकाचा भर माहितीपेक्षा दृष्टीकोन देण्यावर असला पाहिजे. घटना, वास्तव आणि सत्य या तिन्हींची अतिशय नेमकेपणानं उकल करण्याचं काम पाक्षिकाचं असतं. पण मराठीतलं एकही पाक्षिक हे काम करत नाही. वर्तमानपत्रं आणि साप्ताहिकांसारखीच ती सामान्य स्वरूपाच्या चर्चेवर भर देतात.

बाळशास्त्री जांभेकर यांनी १८३२ साली पहिलं मराठी वर्तमानपत्रं सुरू केलं. पण ते आठवड्याला प्रकाशित होई, म्हणजे साप्ताहिक

वर्तमानपत्रच होतं ते. त्याला त्यांनी अतिशय समर्पक नाव दिलं होतं, 'दर्पण'. जांभेकरांनीच पुढे १८४० साली मराठीतीलं पहिलं मासिक सुरू केलं, त्याला त्यांनी नाव दिलं होतं, 'दिग्दर्शन'. पाक्षिकाचं काम हे दिग्दर्शनाचं असतं, तर वर्तमानपत्राचं समाजातल्या घडामोडींचं प्रतिबिंब दाखवण्याचं.

मराठीमध्ये पाक्षिकांची संख्याही पंचवीस-तीसच्या घरात आहे. पण नाव घ्यावं अशी दोनच पाक्षिकां आहेत. ती म्हणजे 'परिवर्तनाचा वाटसरू' आणि 'शेतकरी संघटक'. त्यातही शेतकरी संघटक हे शेतकरी संघटनेचं मुखपत्र आहे. 'संघटक'च्या अंकावर लिहिलेलं असतं की, 'आर्थिकख राजकीय आणि सामाजिक घडामोडींचा धांडोळा.' तर 'स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक' अशी टॅगलाईन अंकावर छापलेली असते.

श्रीकांत उमरीकर यांनी आम्हाला जे पत्र पाठवलं आहे. त्यात त्यांनी लिहिलं होतं, 'शेतकरी संघटक' हे पाक्षिक गली २७ वर्षे सातत्याने प्रकाशित होत आहे. ग्रामीण महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात हे पाक्षिक वाचले जाते. शेतकरी संघटनेच्या चौकटीबाहेर जाऊन स्वातंत्र्यताप्रेमी सर्वांसाठीच हे पाक्षिक व्हावं असा आमचा प्रयत्न राहिला आहे. अर्थात त्याला मर्यादा आहे हे मला माहीत आहे. आज अंकाचा खप ५००० पर्यंत गेला आहे. वेगवेगळ्या विचारसरणीच्या लोकांनी यात लिहावं हाही आमच प्रयत्न राहिला आहे.'

आपल्या मर्यादांची जाणीव असं ही चांगली गोष्ट आहे, पण या मर्यादेत राहूनही पुष्कळ काही करता येण्यासारखं आहे असं मला वाटतं. शेतकरी संघटना आता पूर्वीसारख्य जोमानं चालू नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे तिच्या पाक्षिकाला थोडं व्यापक व्हायला हवं, त्यांना यापुढच्या काळातही हे पाक्षिक चालवायचं असेल तर. कारण कुठलीही संघटना बहराच्या काळात असते तेव्हा तिच्याबद्दल लोकांना उत्सूकता असते, आत्मीयता असते आणि कुतूहलही असतं. चळवळ थंडावत चालली की तिच्या मुखपत्रांनाही ओहोटी लागते, हा आपल्याकडचा आजवरचा इतिहास आहे. 'युक्रांद'चे संस्थापक कुमार सप्तर्षी ऐंशीच्या दशकात महाराष्ट्रातल्या तमाम तरुणांचे हिरो होते. आता तो केवळ इतिहासाचा भाग झाला आहे. पण त्यामुळे नंतर त्यांचं 'सत्याग्रही विचारधारा' हे मासिकही 'युक्रांद'शी संबंधित लोकांपुरतंच मर्यादित झालं. ही गोष्ट ओळखून सप्तर्षींनी 'सत्याग्रही विचारधारा'ला थोडं व्यापक करण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून ते अजूनही चालू आहे. पण त्याचा खप काही २०००-२५०० च्या पुढे जाऊ शकलेला नाही. 'शेतकरी संघटक' चा खप ५००० आहे. एखाद्या पाक्षिकाचा खप एवढा असणं ही खरोखरच चांगली गोष्ट आहे.

'शेतकरी संघटक' हे एका संस्थेचं मुखपत्र असल्यामुळे त्याला फार धारेवर धरता येत नाही. पण 'परिवर्तनाचा वाटसरू' कडून या अपेक्षा करणं काही अनाठायी नाही. पण प्रत्यक्षात काय परिस्थिती आहे? उघडपणे कुठल्याही संस्थेचं 'परिवर्तनाचा वाटसरू' हे मुखपत्र नाही हे खरं आहे, पण काही डावीकडे झुकलेल्या समविचारी लोकांनी एकत्र येऊन ते सुरू केलेलं पाक्षिक आहे. त्यामुळे त्याला सर्वसमावेशक चेहरा त्यांना देता आलेला नाही.

सगळ्या प्रस्थापित गोष्टींना विरोध करणं हा एकमेव अजेंडा 'पवा'चा आहे की काय असं कधीकधी वाटतं. दुसरं असं की, अतिशय एकांगी आणि पूर्वग्रहदूषित लेखन त्यात सातत्यानं का छापलं जातं हे कळत नाही. आणि इतकं एकांडं लेखन करणारे लोक यांना सातत्यानं मिळतात तरी कसे? छत्तीसगडमधील विनायक सेन यांना रायपूरच्या सत्र न्यायालयानं जन्मठेपेची शिक्षा सुनावल्यानंतर 'पवा'मध्ये जे लेख आले ते अतिशय एकांगी होते. अर्थात मराठी वर्तमानपत्रांनीही 'पवा'चाच कित्ता गिरवला. 'पवा' हे पाक्षिक असल्यानं त्यात कविता, कथा, ललित अशा प्रकारचं लेखन अपेक्षित नाही. पण हे लेखन छापायचंच असेल तर त्याच्या दर्जाबाबत तुम्ही काटेकोर असायला हवं की नको? 'पवा'मध्ये कविता, कथा, ललित आणि पुस्तक परिक्षणे ही अतिशय सामान्य दर्जाची असतात. लोक पाठवतात आणि संपादक ते छापतात.

'पवा'मध्ये नव्या लेखकांना संधी दिली जाते, ही चांगली गोष्ट आहे. पण अशा एकांड्या, अभ्यास नसलेल्या लोकांना संधी देणं हे जरा घातकपणाचं वाटतं. कारण हे अति उत्साही लोक समाज-साहित्य-संस्कृतीचं पर्यावरण दूषित करणारे हे लोक आहेत. सध्या असा एक समज 'पवा'बाबत निर्माण झाला आहे की, प्रस्थापित नियतकालिकांमध्ये, वर्तमानपत्रांमध्ये जे छापून येत नाही ते 'पवा'मध्ये छापून येतं. असा समज बळावू देणं हे संपादकांच्या क्षमतेविषयी शंका उत्पन्न करणारं आहे. त्याची दखल 'पवा'च्या संपादकांनी घ्यायला हवी.

साप्ताहिकं-पाक्षिकं यांच्यामध्ये समाजातल्या कळीच्या प्रश्नांविषयी हल्ली चर्चाच होत नाही. बऱ्याचदा तर त्यांची दखलही ते घेत नाहीत. कारण सध्या महाराष्ट्रात राजकारण, समाजकारण आणि साहित्य-संस्कृती या दोन गोष्टींची ताटातूट झाली आहे. कुठल्याही राजकीय-सामाजिक प्रश्नावर मराठी साहित्यिक आणि संपादकही मूग गिळून गप्प बसतात. मग ते जेम्स लेन प्रकरण असो, बाबरी मशिदीबाबतचा निकाल असो, जैतापूर प्रकल्प असो किंवा लवासा प्रकरण असो. किंवा अलीकडचे अरूणा शानभाग, विनायक सेन, विकीलिक्स असो. अशा प्रश्नांवर सामान्य लोक भांबावून जातात, गोंधळून जातात. अशा वेळी जनमानसाची भूमिका घडवण्याची जबाबदारी वृत्तपत्रं, साप्ताहिकं-पाक्षिकं यांच्या संपादकांची असते. कारण संपादकाला समाजकारणापासून राजकारणापर्यंत आणि साहित्यापासून अर्थकारणापर्यंत अनेक विषयांच्या आंतरसंबंधांची चांगली जाण असते. काय हितावह आहे आणि काय नाही याबबातची व्हिजन असते. त्यामुळे त्यानं या प्रश्नांवर रोखठोक आणि सडेतोड भूमिका घेतली तर जनसामान्यांच्या मनातला गोंधळ दूर होऊ शकतो. विरोधासाठी विरोध करणाऱ्यांची धार बोथट होऊ शकते आणि आमजनांना आपली मतं बनवता येतात. कारण सामान्य माणसांना स्वत:ची स्वतंत्र मतं नसतात, तसा त्यांचा अभ्यास नसतो. त्यांची मतं बनवण्याचं आणि भूमिका घडवण्याचं काम पत्राकारांचं आणि संपादकांचंच असतं.

पण गेल्या काही महिन्यातल्या घडामोडी तुम्ही पाहिल्या तर तुमच्या असं लक्षात येईल की, महाराष्ट्रातल्या सर्व नियतकालिकांच्या संपादकांना ही भूमिका निभावता आलेली नाही. आपण काही उदाहरणंच पाहू म्हणजे माझं म्हणणं स्पष्ट होईल.

अरूणा शानभाग ही महिला मुंबईच्या केईएममध्ये गेली ३७ वर्षे अंथरुणाला खिळून आहे. तिच्यावर याच हॉस्पिटलमधल्या शिपायानं पाशीव बलात्कार केल्यापासून ती कोमात आहे. तिला अन्नही द्रवरूपात पाईपद्वारे भरावं लागतं. गेल्या महिन्यात पिंकी विराणी या पत्रकार महिलेनं अरुणा शानभागला इच्छामरण देण्यात यावं यासाठी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. तेव्हा महाराष्ट्र आणि भारतभरातल्या वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावर ही बातमी छापली गेली. इच्छामरणावर त्यानिमित्तानं चर्चा सुरू झाली. पण सर्वोच्च

न्यायालयानं अरुणाला इच्छामरण देता येणार नाही, ते न्याय्य नाही असा निकाल दिला. तेव्हा अशा प्रतिक्रिया उमटल्या की, सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालाबद्दल कडवटपणानं बोललं गेलं. त्याला जनसामान्यांचा फारसा प्रतिसाद मिळाला नाही, त्यामुळे हे प्रकरण थांबलं.

इथं दोन प्रश्न निर्माण होतात. एक, अरुणाच्या निमित्तानं इच्छामरणावर चर्चा सुरू झाली होती, ही चांगली गोष्ट होती. पण वर्तमानपत्रं, साप्ताहिकं-पाक्षिकांची ही चर्चा नीटप्रकारे केलीच नाही. त्यांनी फक्त एकारलेल्या लोकांच्या म्हणजे इच्छामरणाच्या बाजूच्या लोकांच्या प्रतिक्रिया छापण्यापलीकडे या प्रश्नाबाबत फार आस्था दाखवली नाही. पण हे काम साप्ताहिकं आणि पाक्षिकांचं होतं. मात्र त्यांनीही ते केलं नाही.

अरुणा शानभागच्या प्रश्नाकडे कसं पाहावं याचं दिग्दर्शन कुठल्याच साप्ताहिक-पाक्षिकानं केलं नाही. का बरं हा प्रश्न महत्त्वाचा वाटला नाही? की हा प्रश्न यांना कळलाच नाही? मला वाटतं या प्रश्नाचं गांभिर्य यांना कळलंच नाही. त्यामुळं काय झालं की, वर्तमानपत्रात आलेल्या एकांगी प्रतिक्रियांमधून न्यायव्यवस्थेबाबत जनसामान्यांच्या मनात नाहक प्रश्नचिन्ह निर्माण झालं.

दुसरा प्रश्न विनायक सेन यांच्याबाबतचा. रायपूरच्या सेशन कोर्टानं त्यांना नक्षलवादी ठरवून जन्मठेपेची शिक्षा सुनावली. त्यावर भारतभरात मोठा गदारोळ झाला. जगभरच्या मानवाधिकार कार्यकर्त्यांनी त्याविरोधात मोठा आवाज उठवण्याचा प्रयत्न केला. अगदी नोबल पुरस्कार विजेत्या अमर्त्य सेन यांच्यापासून इतरही वीस-तीस नोबेल लॉरिएट्सनी विनायक सेन यांना पाठिंबा दिला. सरकार आणि न्यायालय विनायक सेन यांना विनाकारण नक्षलवादी ठरवून त्यांच्यावर अन्याय करत आहे, अशी बोंब या मानवाधिकार कार्यकर्त्यांनी केली. हा प्रश्नही प्रसारमाध्यमं आणि नियतकालिकांनी गलथानपणे हाताळला. या प्रश्नाकडेही कसं पाहावं हे त्यांना वाचकांना सांगता आलं नाही.

अरुणा शानभाग आणि विनायक सेन या दोन्ही प्रकरणामागे मानवाधिकार कार्यकर्ते होते. या लोकांनी या दोन्ही वेळेस भारतीय न्यायव्यवस्थेवर गंभीर आक्षेप घेतले. या आततायीपणाबद्दल आणि खरं तर माध्यमांनी त्यांना धारेवर धरायला हवं होतं. पण त्यांनी उलट याच लोकांचं म्हणणं ग्राह्य धरलं. लोकसत्ताचे त्यावेळचे संपादक कुमार केतकर यांनी तर २७ डिसेंबर रोजी 'न्यायालयाचा अतिरेक' असे संपादकीय लिहून विनायक सेन यांची पाठराखण केली. तर 'परिवर्तनाचा वाटसरू' या पाक्षिकानं 'लोकशाहीला काळिमा फासणारी जन्मठेप' हा ॲड. असीम सरोदे यांचा लेख आणि आणखी एक असाच एकांगी लेख छापला.

काही वर्तमानपत्रांनीही असेच एकांगी लेख छापण्यात धन्यता मानली. (इथं मला एक कबुली द्यायला पाहिजे की, आम्हीही परिवर्तनाचा वाटसरूमधला असीम सरोदे यांचा लेख 'प्रहार'मध्ये रिप्रिंट केला होता. पण नंतर त्याचा प्रतिवाद करणारा अमिताव ठाकूर यांचा पानभर लेखही छापला.)

विनायक सेन प्रकरणात एक प्रश्न माध्यमांनी स्वतःला विचारला नाही की, भारतभरातून आणि जगभरातून एवढा दबाव येऊनही सरकार आपल्या निर्णयावर ठाम का आहे? रायपूरच्या कोर्टाचं तब्बल ९० पानी निकालपत्र आठवडाभरानं त्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध होतं. ते कुणीही पाहण्याची तसदी घेतली नाही. त्या निकालपत्रात विनायक सेन यांच्याविषयी सरकारकडे सबळ पुरावे आहेत असं दिसतं. ९० साक्षीदारांची न्यायालयात साक्ष झाली. त्यातल्या ८० साक्षीदारांनी विनायक सेन यांच्या विरोधात साक्ष दिली, तर केवळ दहा साक्षीदारांनी सेन यांच्या बाजूनं साक्ष दिली. गंमत म्हणजे हे सर्व छत्तीसगडमधल्या वर्तमानपत्रांचे पत्रकार, स्थानिक वार्ताहर होते. म्हणजे आता पत्रकारच नक्षलवाद्यांना पाठीशी घालत आहेत. मला वाटतं ही फार गंभीर बाब आहे. लोकशाहीचा पाया उखडण्याचं काम तिचाच चौथा स्तंभ करतो आहे, याच्याएवढी दुर्दैवाची दुसरी कोणती गोष्ट असू शकेल?

असाच प्रकार विकिलीक्सच्या गौप्यस्फोटाबाबत झाला आहे. 'गौप्यापेक्षा स्फोटच मोठा' (८ जानेवारी) हा ज्येष्ठ पत्रकार गोविंद तळवळकर यांचा लेख आणि 'विकिलीक्स-बिट्वीन द लाईन्स' हे २ एप्रिलच्या अंकात विनोद शिरसाठनं लिहिलेलं संपादकीय सोडलं तर याबाबतही प्रसारमाध्यमांनी फक्त बघ्याचीच भूमिका घेतली. कुणालाही या गौप्यस्फोटांमधला फोलपणा कळला नाही. त्यामुळे विकिलीक्सकडे कसं पाहावं हे त्यांना सांगाता आलेलं नाही.

मला वाटतं अरुणा शानभाग, विनायक सेन आणि विकिलीक्स या तीन्हींबाबत घटना, वास्तव आणि सत्य सांगण्याचं काम साप्ताहिकं आणि पाक्षिकांचं होतं. पण त्यांनी या बाबतीत केवळ बघ्याचीच भूमिका घेतली. त्यामुळे झालं काय की, या तिन्हींबाबतचं सत्य लोकांना कळलंच नाही. ज्यांना आंतरराष्ट्रीय राजकारण, परराष्ट्र धोरण, प्रत्येक देशांच्या गुप्तचर यंत्रणा, त्यांच्या परदेशातील वकिलाती कसं काम करतात याचा किमान अंदाज आहे, त्यांना विकिलीक्सच्या स्फोटांमध्ये 'सेन्सेशनल पत्रकारितेच'च्या पलीकडे काही नाही, हे सहज समजू शकतं.

आता शेवटी माझ्या आवडत्या साप्ताहिकाबद्दल आणि एका पाक्षिकाबद्दल सांगून थांबतो. दुर्दैवानं ही दोन्हीही इंग्रजीमध्ये आहेत. (मराठीतल्या साप्ताहिकांपैकी माझं आवडतं साप्ताहिक 'साधना' आहे हे वेगळं सांगायला नको.)

'आउटलुक' हे साप्ताहिक इंग्रजीमधले एक आघाडीचे साप्ताहिक आहे. गेली पंधरा वर्षे विनोद मेहता प्रकाशित करत आहे. विविधता, लेखांचा आवाका, मजकुराची अचूकता, बोलकी छायाचित्रं-ग्राफिक्स, सुबक व उत्तम मांडणी, चांगलं मुद्रण आणि विनोद मेहतांचा प्रत्येक अंकावरील खास ठसा ही 'आउटलुक'ची प्रमुख वैशिष्ट्यं आहेत.

एखाद-दुसरा चांगला अंक काढणं ही तुलनेनं सोपी गोष्ट असते, पण सातत्यानं चांगलं अंक काढणं, आपल्या वाचकांच्या विश्वासाला तडा जाऊ न देणं हे शिवधनुष्य पेलणं सोपं नसतं. 'आउटलुक' त्याबाबतीत द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण होतो. (पण इतर इंग्रजी साप्ताहिकं तृतीय श्रेणीत उत्तीर्ण होतात, म्हणजेच प्रथम श्रेणीत कुणीही उत्तीर्ण होत नाही.)

'आउटलुक'ची भाषा अतिशय सुबोध असते. ललित-वैचारिक असं त्यातल्या लेखांचं स्वरूप असतं. एकच विषय घेऊन त्याच्या वेगवेगळ्या बाजू समोर आणणं आणि एकाच विषयाचा पुरेसा पाठपुरावा करण्याचं काम 'आउटलुक' सातत्यानं करत असतं. अलीकडचं उदाहरण द्यायचं झालं तर २-जी स्पेक्ट्रम घोटाळ्यातील ए. राजा आणि नीरा राडीया यांच्यातील ध्वनिफिती 'आउटलुक'नंच बाहेर काढल्या. त्यात वीर संघवी, बरखा दत्त या इंग्रजीतल्या जान्यामान्या पत्रकारांच्या नावांचा भांडाफोडही 'आउटलुक'नंच केला.

मी नंतर ज्याच्याबद्दल सांगणार आहे ते 'फ्रंटलाइन' हे इंग्रजीतलं पाक्षिक इंटेलेक्च्युअल लोकांचं आहे, 'इंडिया टुडे' हे साप्ताहिक

इंग्रजी नवसाक्षर लोकांचं आहे तर 'आउटलुक' या दोन्हींच्या मधल्या वाचकांचं आहे. जसा वैचारिक लेखन वाचणाऱ्यांचा एक वर्ग असतो, चरित्र-आत्मचरित्र वाचणाऱ्यांचा एक वर्ग असतो आणि कथा-कादंबऱ्या वाचणाऱ्यांचा एक वर्ग असतो. तसंच हे आहे. आणखी नेमक्या भाषेत सांगायचं तर 'फ्रंटलाइन' हे आयडियॉलॉजिस्ट आहे, 'इंडिया टुडे' हे लोकानुनय करणारं आहे तर 'आउटलुक'मध्ये दोन्हींचं योग्य मिश्रण दिसतं.

थोडक्यात 'आउटलुक' मध्यममार्गी आहे. प्रसारमाध्यमं लोकशाही आणि स्वातंत्र्याचे राखणदार असतात. असं मानलं जातं. म्हणजे लोकशाही प्रक्रिया, लोकशाही मूल्ये, सामाजिक व आर्थिक नैतिकता आणि नैतिक सामाजिक व्यवहार यांची राखणदारी करणं म्हणजे पत्रकारिता करणं असं विश्लेषण जुने जाणते पत्रकार करतात. अशी पत्रकारिता कधी शक्य होते तर जेव्हा तुम्ही मध्यममार्गी असता. दुसरी गोष्ट म्हणजे जगात कुठेही मध्यममार्गी सरकारच सत्तेवर येऊ शकतं, मध्यममार्गी भूमिकाच मोठ्याप्रमाणातवर ग्राह्य मानल्या जातात आणि त्यांचाच प्रभाव जास्त असतो. 'आउटलुक' आणि 'फ्रंटलाइन' यांच्याकडे असा मध्यममार्गीपणा आहे.

'फ्रंटलाइन' हे इंग्रजीमध्ये गेली २६ वर्षे प्रकाशित होणारं पाक्षिक युनिक म्हणावं असं आहे. गंभीर आणि जबाबदार पत्रकारिता करणाऱ्या हिंदू वृत्तपत्रसमूहाच्या मालकीचं हे पाक्षिक आहे, त्यामुळे 'हिंदू'ला जी प्रतिष्ठा आहे तशीच 'फ्रंटलाइन'लाही आहे. 'फ्रंटलाइन' निर्विवादपणे एलिट क्लासचं पाक्षिक आहे. त्यातले सर्वच लेख गंभीर आणि सविस्तर असतात. हॉलिवुड-बॉलीवुड यांना त्यात थारा नसतो, क्रिकेट तर गेल्या २५ वर्षांत कधीही 'फ्रंटलाइन'च्या कव्हर पेजवर झळकलेलं नाही. एरवी ते आतही नसतं. पॉप्युलर, चीप आणि पीत पत्रकारिता यापासून 'फ्रंटलाइन'ला सदैव लांब ठेवण्याची दक्षता त्याचे मुख्य संपादक एन्.राम. यांनी घेतली आहे. त्यामुळे वाचकांचा अनुनय करण्याची गरज पडत नाही.

शोधवृत्तांत, चर्चा आणि भाष्य हे 'फ्रंटलाइन'चं बलस्थान आहे. 'फ्रंटलाइन'च्या यशस्वीपणाची चार कारणं आहेत. एक, ते पत्रकारिता गांभीर्यानं घेतात. दोन, 'फ्रंटलाइन'चा भर मुख्य विषयावर असतो. 'बिहाइंड एव्हरी इश्यू, देअर्स अ डिपर इश्यू' हा त्यांचा बाणा आहे. तीन, अमूक विषयाकडे कसं पाहावं हा दृष्टीकोन देणाऱ्यावर भर असतो. त्यामुळे त्यात सर्व प्रकरच्या विचारांच्या लेखांना स्थान दिलं जातं, भलेही मग ते संपादकीय धोरणाच्या विरोधात असेल तरीही. आणि चौथं कारण आहे, आपली स्वतःची स्वतंत्र आणि वेगळी ओळख सातत्यानं जपणं.

बौद्धिक, सामाजिक आणि नैतिक पाठराखण, विचारांचा आदर, सामाजिक बांधीलकी मानणारी पत्रकारिता आणि राजकारण-अर्थकारण-सांस्कृकि-बौद्धिक प्रश्नांविषयी सजगता ही 'फ्रंटलाइन'ची चार प्रमुख वैशिष्ट्यं आहेत. पण यामुळं 'फ्रंटलाइन' व्यावसायिक मूल्यांना कमी लेखतं असंही नाही. उत्तम निर्मिती, चांगली छपाई, कागद आणि मांडणी याबाबत कसलीही तडजोड 'फ्रंटलाइन' करत नाही.

लोकप्रियता आणि ग्लॅमर नसतानाही एखाद्या नियतकालिकाच्या वाट्याला कशा प्रकारची प्रतिष्ठा येऊ शकते याचे उत्तम उदाहरण म्हणून 'इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकली', 'आऊटलुक', 'फ्रंटलाइन', 'सेमिनार' या इंग्रजीतल्या पहिल्या दोन साप्ताहिकांचा, एका पाक्षिकाचा आणि सेमिनार या मासिकाचा मी आवर्जून उल्लेख करेन. आणि ही नितकालिकं तुम्ही आवर्जून पहावीत अशी शिफारसही करेन.

'आउटलुक' आणि 'इंडिया टुडे' ही इंग्रजी साप्ताहिकं इंग्रजी वर्तमानपत्राच्या दोन पावलं पुढे असतात. अनेकदा या साप्ताहिकांच्या कव्हर स्टोरीज इंग्रजी वर्तमानपत्राच्या हेडलाइन्स होतात. तर 'फ्रंटलाइन' हे पाक्षिक 'आउटलुक-इंडिया टुडे' यांच्या चार पावलं पुढे असतं. त्यामुळे मला असं वाटतं की, मराठी साप्ताहिकांनी 'आउटलुक-इंडिय टुडे' यांचा आणि पाक्षिकांनी 'फ्रंटलाइन' ला प्रमाण मानायला हरकत नाही. त्यात त्यांचं नुकसान काहीच नाही. फायदा मात्र खूपच आहे.

मराठी साप्ताहिकं आणि पाक्षिकांना काय करता येण्यासारखं आहे? काही मुद्दे पाहू.

हल्ली वर्तमानपत्रांमध्ये ८०० ते १००० शब्दांपेक्षा जास्त मोठे लेख सहसा येत नाहीत. त्यामुळे चिकित्सक-विश्लेषणात्मक आणि सम्यक दृष्टीकोन देणारे लेखन वर्तमानपत्रांमधून येत नाही. कारणांमुळे बरेचसे अभ्यासक हल्ली वर्तमानपत्रांमध्ये लिहायला नाखूश असतात. साप्ताहिकं-पाक्षिकांना वर्तमानपत्रांची मर्यादा आपलं बलस्थान करता येण्यासारखं आहे. कारण त्यांच्याकडून चिकित्सक-विश्लेषणात्मक आणि सम्यक दृष्टीकोन देणाऱ्या लेखनाचीच अपेक्षा आहे.

दुसरी आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे साप्ताहिकं-पाक्षिकांनी मानधन देण्याची 'सवय' लावून घेतली पाहिजे. दुर्दैवाने ती मराठीतल्या साप्ताहिकं-पाक्षिकांनी अजून लावून घेतलेली नाही. वेगवेगळ्य क्षेत्रातल्या तरुण अभ्यासकांना शिष्यवृत्त्या देऊन, वेगवेगळ्या ठिकाणी लेखकांना पाठवून त्यांच्याकडून सविस्तर आणि दीर्घ लेख-वृत्तांत लिहून घेतले पाहिजेत. 'माणूस'ने एकेकाळी हे खूप चांगल्या पद्धतीने केले होते. किंबहुना ते 'माणूस'चे बलस्थान होते.

जे लोक वर्तमानपत्रांमध्ये लिहिताता, त्यांच्यावरच साप्ताहिकं-पाक्षिकांनी पूर्णपणे अवलंबून राहू नये. त्यांनी नवनवे लेखक शोधले पाहिजेत. जे लोक लेखक नाहीत, पण आपापल्या क्षेत्रात चांगली कामगिरी करत आहेत, त्यांच्याकडून मुद्दामहून लिहून घेतले पाहिजे. थोडक्यात वेगवेगळ्या क्षेत्रातल्य लोकांना पुढे आणण्याचं काम केलं पाहिजे. हे काम वर्तमानपत्रं करू शकत नाहीत, तेवढा वेळ त्यांच्याकडे नाही. तेव्हा हे काम साप्ताहिकं-पाक्षिकं यांचंच आहे.

वर्तमानपत्रासारखे, म्हणजे ते जे छापतात त्याच दर्जाचं-सामान्य, इंटरनेटवरून माहिती गोळा करून आंतरराष्ट्रीय राजकारणाविषयी पाडलेले लेख वर्तमानपत्रांमध्ये हल्ली फार मोठ्या प्रमाणावर येतात. हे लखेन अतिशय उथळ स्वरूपाचं असतं. तोच प्रकार साप्ताहिकं-पाक्षिकांनी करता कामा नये. त्यांनी विषयाच्या गाभ्याला हात घातला पाहिजे.

शेवटचा मुद्दा. कुठल्याही साप्ताहिक-पाक्षिकानं कुठल्याही विचारसरणीचा पुरस्कार करता कामा नये. त्यांनी निःपक्षपाती आणि उदारमतवादी राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शिवाय आपल्याभोवती मोजक्या लेखकांचंच कोंडाळं करून घेऊ नये. त्यामुळे काही दिवसांनी तुमचं साप्ताहिक-पाक्षिक हे विशिष्ट गटाचं-लोकांचं होतं. तर आपल्या केबिनच्या बाहेर पडून नवनव्या लेखकांचा, विषयांचा शोध घेतला पाहिजे. 'माणूस'चे संपादक श्री.ग.माजगावकर यांना आदर्श मानू नका हवं तर पण त्यांच्याकडून प्रेरणा घ्यायला काय हरकत आहे?

**राम जगताप**
फिचर्स डेस्क, दैनिक प्रहार, मुंबई.
मो. ८१०८४१३७२०

■■

# जनलोकपाल विधेयक

**अण्णा हजारे यांनी केलेल्या उपोषणानंतर या विधेयकावर मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे. मूळात हे विधेयक काय आहे, हे सर्वसामान्य व्यक्तींनाही सारांशरूपाने कळावे व त्यात कोणत्या सुधारणा आवश्यक आहेत, कोणत्या कमतरता आहेत, अशी साधकबाधक चर्चा व्हावी, अशी अपेक्षा आहे. भारताच्या नागरिकांना जनलोकपाल विधेयकाच्या निमित्ताने भ्रष्टाचाराविरुद्ध लढण्याची मोठी ताकद मिळणार आहे की, एक वेगळे सत्ताकेंद्र तयार होणार आहे? एकूण या विधेयकाबाबत जनसामान्यांना माहिती व्हावी म्हणून विधेयक संक्षिप्त करून अनुवादरूपाने सादर केले आहे.**




इंटरनेटवरून साभार



**ज्ञानेश्वर शेलार**

लोकपाल विधेयक संसदेमध्ये आठ वेळा मांडण्यात आले; परंतु राष्ट्रपतींपासून तर अगदी निम्नस्तरावरील सर्वच पदाधिकारी व कर्मचारी यांचा लोकपालांच्या चौकशीच्या अधिकारात समावेश होत असल्याने हे विधेयक मंजूर होऊ शकले नाही. भ्रष्टाचाराची डोळे विस्फारणारी प्रकरणे दररोज घडत आहेत. लोकांच्या मनातही आता भ्रष्टाचार कुठेतरी थांबला पाहिजे, निदान कमी झाला पाहिजे आणि आपल्या खिशातून कराच्या रूपाने जमा झालेल्या पैशांची योग्य विल्हेवाट लागली पाहिजे अशी भावना निर्माण झाली आहे. अण्णा हजारे यांनी केलेल्या उपोषणानंतर या विधेयकावर मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे. मूळात हे विधेयक काय आहे, हे सर्व सामान्य व्यक्तींनाही सारांशरूपाने कळावे व त्यात कोणत्या सुधारणा आवश्यक आहेत, कोणत्या कमतरता आहेत, अशी साधकबाधक चर्चा व्हावी, अशी अपेक्षा आहे.

सामान्य नागरिकांना जनलोकपाल विधेयकाच्या निमित्ताने भ्रष्टाचाराविरुद्ध लढण्याची मोठी ताकद मिळणार आहे. एकूण या विधेयकाबाबत जनसामान्यांना माहिती व्हावी म्हणून थोडक्यात विधेयक सादर केले आहे.

### जनलोकपाल विधेयकातील महत्त्वाच्या तरतुदी सारांशरूपाने :

**काही महत्त्वाच्या व्याख्या :**

**कृती** - असे कृत्य की ज्यामुळे कर्तव्यात कसूर करणे, दुर्लक्ष करणे, चुकीचे किंवा हानिकारक निर्णय घेणे. हेतुपुरस्सर अशा निर्णयांची अंमलबजावणी करणे, नियमांना व कायद्याला मुरड घालणे.

**भ्रष्टाचार** - १९८८ च्या भ्रष्टाचारविरोधी कायद्यान्वये केलेली व्याख्या. अशी व्यक्ती जी स्वतःच्या फायद्यासाठी नियमाचे व कायद्यांचे उल्लंघन करील प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या गैरमार्गाने स्वत:साठी किंवा इतरांना आर्थिक फायदा पोहोचेल असे कृत्य करील किंवा अनाठायी नफा मिळविण्याचा प्रयत्न करील, पदाचा गैरवापर करील.

**सरकार** - भारताचे केंद्र सरकार.

**सरकारी सेवक** - म्हणजे अशी व्यक्ती जी सध्या किंवा पूर्वी सरकारी नोकरीत किंवा अन्य कुठल्याही सरकारी सोईसवलती घेऊन सरकारसाठी काम करीत असेन. यामध्ये पंतप्रधान, मंत्री, आमदार, खासदार, सर्व न्यायालयांचे न्यायमूर्ती आणि सरकारी कर्मचारी. कुठल्याही सरकारी कमिटीचे/आयोगाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सहकारी सोसायट्यांचे सर्व कार्यकारी मंडळ, सरकारी कंपन्यांचे कार्यकारी मंडळ, इतर मंडळे वा महामंडळे यांचे कार्यकारी मंडळ व कर्मचारी.

**तक्रारदार** - 'जी व्यक्ती कुठल्याही भ्रष्टाचाराबाबत आवाज उठवील किंवा दाद मागेल.'

**लोकपाल** - म्हणजे लोकपाल व त्यांच्या समितीतील दहा सदस्य व कर्मचारी.

**लोकापालाची नियुक्ती संबंधी महत्त्वाच्या तरतूदी**

केंद्र सरकार लोकपालाची नियुक्ती विधेयक मंजूर झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत करील. अध्यक्ष आणि सदस्य यांनी पुढील काही अटी पाळणे आवश्यक आहे.

उमेदवार कुठल्याही ट्रस्ट किंवा इतर कार्यालयात कार्यरत असू नये. त्यांना कुठलाही व्यवसाय त्यांना करता येणार नाही. लोकपालाच्या स्थानाला धक्का पोहोचेल असे कोणतेही कृत्य करता कामा नये. लोकापालांची नियुक्ती राष्ट्रपतींनी नियुक्त केलेल्या निवड समितीमार्फत केली जाईल. लोकपाल होण्यास लायक नसलेल्या व्यक्तींमध्ये अ) भारताचे नागरिक नसलेले. ब) ज्यांच्यावर कुठल्याही प्रकारच्या गुन्ह्याची नोंद झाली आहे किंवा गुन्हा न्यायप्रविष्ट आहे. क) ४० वर्षे वयाच्या आतील व्यक्तींचा समावेश आहे.

निवड समितीमध्ये उपराष्ट्रपती, लोकसभेचे सभापती, सर्वोच्च न्यायालयाचे दोन ज्येष्ठ न्यायाधीश किंवा उच्च न्यायालयातील दोन ज्येष्ठ न्यायमूर्ती, किमान पाच पदके असलेला सैन्य दलातील अधिकारी, भारताचे महालेखापाल, मुख्य निवडणूक आयुक्त, प्रथम निवड समितीत पूर्वी कार्य केलेल्या व्यक्ती आदींचा समावेश असेल. लोकपालांच्या एकूण सदस्यांमध्ये किमान दोन सदस्य हे कायदेतज्ज्ञ असणे आवश्यक आहे. उपराष्ट्रपती निवड समितीचे अध्यक्ष असतील.

**लोकपालांची नियुक्तीची पद्धत**

विशिष्ट मायन्यात जाहिरातीद्वारे अर्ज मागवले जातील. इच्छूक व्यक्तीला आपली पात्रता सिद्ध करावी लागेल. सर्व लायक व्यक्तींची यादी वेबसाईटवर टाकावी लागेल. निवड समितीत प्रत्येक सदस्य शिफारस करू शकेल. ही शिफारस केलेली यादी वेबसाईटवर टाकण्यात येईल. जनमताच्या आधारे या यादीतील सदस्यांची निवड करून तीही वेबसाईटवर टाकण्यात येईल. निवड समिती या यादीतील व्यक्तींविषयी वेगवेगळ्या प्रकारे स्वत:ही माहिती जमा करेन. ही जमा केलेली माहिती त्या व्यक्तींना कळविली जाईल आणि ते स्वत:ही आपापले परीक्षण करतील. निवड समिती या यादीतील लोकांशी चर्चा करून एक अंतिम यादी तयार करील. या यादीतील आवश्यकतेपेक्षा जास्त संख्या असेल तर, पुन्हा त्यांची चाळणी पद्धतीने निवड केली जाईल. निवड समितीच्या सर्व बैठकांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग केले जाईल व ते जनतेसाठी खुले केले जाईल. अशाप्रकारे निवड केलेल्या सदस्यांची अंतिम यादी राष्ट्रपतींकडे सादर केली जाईल. ही यादी मिळाल्यानंतर राष्ट्रपती एक महिन्याच्या आत लोकपाल व त्यांच्या सदस्यांची नियुक्ती जाहीर करतील. ही सर्व प्रक्रिया चालू असताना निवड समितीतील एखादा सदस्य निवृत्त झाला अथवा मृत झाल्यास प्रक्रिया सुरूच राहील.

**निवड समितीतील सदस्यांना काढून टाकण्याबाबतची कार्यवाही**

निवड समितीचे अध्यक्ष व इतर सदस्यांना काढून टाकण्याबाबतची तरतूदही विधेयकात आहे. त्यात गैरवर्तन, व्यावसायिक हितसंबंध, मानसिक किंवा शारीरिक असमर्थता, दिवाळखोरी (इनसॉल्व्हन्सी), नैतिक अध:पतन, कुठल्याही इतर ठिकाणी वेतनावर काम करणे, पूर्वग्रहदुषित असणे, निवड करताना एखाद्याला झुकते माप देणे, आपल्या पदाचा किंवा पैशाचा निकालावर परिणाम होईल असा प्रभाव टाकणे, भ्रष्टाचारविरोधी कायद्यात बसेल असे एखादे कृत्य करणे, आपल्या पदाचा नफ्यासाठी किंवा पैसे मिळविण्यासाठी गैरवापर करणे, एखाद्या सदस्यास पदावरून काढून टाकणे इत्यादी बाबींचा समावेश असेल.

एखाद्या व्यक्तीने सर्वोच्च न्यायालयात निवड समितीतील अध्यक्ष किंवा सदस्याविरुद्ध याचिका दाखल केली असेल तर सर्वोच्च न्यायालय चौकशीचे आदेश देऊ शकते, यासाठी खास चौकशी समितीची नियुक्ती करण्यात येईल. चौकशीअंती पुरावे आढळल्यास कारवाई करण्यात येईल किंवा पुरावे न आढळल्यास चौकशी संपवण्यात येईल; परंतु पुरावे आढळल्यास त्याबाबत राष्ट्रपतींकडे शिफारस केली जाईल आणि खास चौकशी समितीत सर्वोच्च न्यायालयातील पाच न्यायाधिशांची नियुक्ती केलेली असेल.

जर तक्रारकर्त्याने तक्रार ही खोडसाळपणे केली असेल तर तक्रारकर्त्याला शासन करण्याचे अधिकार सर्वोच्च न्यायालयाला असतील. इत:पर राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाच्या शिफारसीनंतर अशा सदस्याला काढून टाकण्याबाबत पंतप्रधानांना आदेश देतील.

**लोकपालांच्या कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी यांची नियुक्ती**

लोकपाल मुख्य दक्षता आयुक्तांची नियुक्ती करतील व मुख्य दक्षता आयुक्त विविध स्तरांवर दक्षता आयुक्तांची नियुक्ती करतील. मुख्य दक्षता आयुक्त हे भ्रष्टाचार होऊ नये यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यास सक्षम असतील. वेगवेगळ्या स्तरावर सरकारी कार्यालयांमध्ये होणाऱ्या भ्रष्टाचारावर नजर ठेवण्याचे काम ते करतील व भ्रष्टाचार घडू नये असे प्रयत्न करतील. लोकपालांच्या कार्यालयात लोकपाल स्वत: अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करतील किंवा इतर विभागांतून प्रतिनियुक्तीवर कर्मचारी व अधिकारी मागवतील. अशा कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते व सोयी सवलती ते ज्या जागी पूर्वी काम करत होते त्याचप्रमाणे राहतील व त्यांची श्रेणीही अबाधित ठेवली जाईल. गरजेनुसार आपल्या कर्मचाऱ्यांची भरती करणे, त्यांना काढून टाकणे, कायम करणे किंवा अस्थायी कर्मचारी ठेवणे इत्यादी लोकपालांचे अधिकार असतील.

**लोकापालाचा कार्यकाल आणि वेतन**

पाच वर्षांसाठी नियुक्ती करण्यात येईल. वयाच्या ७० वर्षांपर्यंत कार्य करता येईल. ७०व्या वर्षानंतर निवृत्ती. लोकापालांची नियुक्ती/कार्यकाल/राजीनामा इत्यादी सर्व भारताच्या राष्ट्रपतींना सादर करणे आवश्यक. लोकपालांना सर्वोच्च न्यायालयाच्या मूख्य न्यायमूर्तींना मिळणारे वेतन व सोयी सवलती देय असतील.

**लोकपाल फंड**

लोकपालांचा खर्च त्यांच्यासाठी तयार केलेल्या वेगळ्या फंडातून केला जाईल. या फंडात सरकार व भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांवर झालेल्या कारवाईमुळे त्यांच्याकडून वसूल केलेली रक्कम राहील. भ्रष्टाचारी व्यक्तींकडून वसूल केलेली रक्कम लोकपाल फंडात जमा करण्यात येईल.

**लोकपालांचे अधिकार आणि कर्तव्ये**

लोकपाल स्वीकारणाऱ्या तक्रारी पुढील प्रकारच्या असतील: भ्रष्टाचार विरोधी कायद्यात येऊ शकतील अशी भ्रष्टाचाराची प्रकरणे,

सरकारी सेवकांनी केलेल्या भ्रष्टाचारासंबंधी तक्रारी, भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठविणाऱ्या एखाद्या व्यक्तीने केलेली तक्रार, लोकपालांच्या कार्यालयातील शासकीय कर्मचारी इत्यादी.

लोकपाल या तक्रारींची चौकशी करून सकृतदर्शनी पुरावे नसल्यास तक्रार अमान्य करतील. पुरावे आढळल्यास तक्रार स्वीकारली जाईल. नियमाप्रमाणे सरकारी सेवकास जर तो भ्रष्टाचारविरोधी कायद्यानुसार दोषी आढळला तर त्याला निलंबीत केले जाईल. जर या तक्रारीत खासगी व्यक्ती/संस्था किंवा कंपनी दोषी आढळली तर त्यांची करार/परवाना अथवा मान्यता रद्द केली जाईल. अशी संस्था / व्यक्ती किंवा कंपनी यांना काळ्या यादीत टाकलीजाईल. तक्रारकर्त्याला योग्य ते संरक्षण दिले जाईल. अशा तक्रारीमुळे ज्यांच्यावर भ्रष्टाचारविरोधी कायद्यानुसार कारवाई करण्याचे आदेश लोकपाल सरकारला देईल. प्रत्येक सरकारी सेवकाने आपल्या संपत्तीचा अहवाल दरवर्षी देणे आवश्यक आहे. अशा वेळी जर सेवकाकडे उत्पन्नाच्या स्रोतापेक्षा अधिक संपत्ती आढळून आली व त्याचे योग्य ते कारण तो देऊ शकला नाही तर ती संपत्ती अधिग्रहीत करण्याचा अधिकार लोकपालांना राहील. संसदेच्या निवडणुकांच्या वेळी दिलेल्या उत्पन्नाच्या विवरणाची त्यानंतर तीन महिन्याने पुन्हा पडताळणी करण्यात येईल.

**सर्च वॉरंट काढण्याबाबत**

लोकपालांकडे आलेल्या तक्रारीच्या छाननीनंतर सकृतदर्शनी तथ्य आढळल्यास लोकपाल कोणत्याही व्यक्ती/संस्था/कार्यालय/कंपनी यांच्यावर सर्च वॉरंट बजावू शकते. सर्च वॉरंटनुसार मालमत्ता, कागदपत्रे, पैसे, जड-जवाहीर, शेअर्स, व्यावसायिक हितसंबंध या सर्वांची चौकशी केली जाऊ शकते.

**ग्राह्य पुरावा**

प्राथमिक चौकशीनंतर लोकपाल सर्च वॉरंट काढून व्यक्तीला चौकशीसाठी बोलावणे, तसेच कागदपत्रे हजर करण्यास सांगू शकतात. आवश्यक ते साक्षीपुरावे बोलावू शकतात. अशा व्यक्तीला त्याची बाजू मांडण्यास योग्य ती संधी दिली जाईल.

**लोकपालांचा अहवाल**

लोकपाल संपूर्ण चौकशीअंती आपला अहवाल राष्ट्रपतींकडे पाठवून त्यांच्या परवानगीने लोकसभेकडे सादर करतील. आपल्या कार्याचा अहवाल लोकपाल दर महिन्याला वेबसाईटवर प्रकाशित करतील.

**लोकपालांच्या आदेशाचे उल्लंघन**

लोकपालांच्या आदेशाचे उल्लंघन झाल्यास अशा अधिकाऱ्यांना दंड करण्यात येईल. असा दंड त्यांच्या वेतनातून कपात करण्यात येईल. यासाठी उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या समकक्ष अधिकार लोकपाल वापरतील. लोकपालांच्या आदेशान्वये कार्यवाहीत दिरंगाई झाल्यास याबद्दल लोकपाल संबंधितांना नाराजी कळवू शकतात.

**लोकपालांची कार्यप्रणाली**

लोकपालांच्या संपूर्ण कार्यवाहीस व त्यांच्या कार्यालयातील कारभारास लोकपाल अध्यक्ष जबाबदार असतील.

अध्यक्ष वर्षातून एकदा पंतप्रधानांबरोबर बैठक घेऊन कार्याचा आढावा घेतील व योग्य त्या सूचना देऊन विचारविनिमय करतील, तसेच लोकपालांच्या कार्यालयासाठी आवश्यक असलेल्या बाबींची आणि मनुष्यबळाची मागणी करतील.

लोकपालांचा संपूर्ण खर्च लोकपाल फंडातून केला जाईल. लोकपाल आपली कार्यवाही आपल्या सदस्यांमधून तीन-तीन सदस्यांच्या समितीद्वारे करतील. अशी समिती लोकपालांच्या कर्मचाऱ्यांविरुद्धच्या तक्रारी तसेच इतर सर्व तक्रारींच्याबद्दल निर्णय घेतील.

कर्मचारी जर चौकशीमध्ये किंवा त्याच्यावर होणाऱ्या कार्यवाहीमध्ये अडथळे आणू शकेल, पुरावे नष्ट करील किंवा आपल्या स्थानाचा गैरवापर करील अशी शक्यता झाल्यास अशावेळी त्याची बदली करणे किंवा निलंबीत करण्याचे आदेश लोकपाल देतील.

**सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींविरुद्धच्या तक्रारींवर करावयाची कार्यवाही**

उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयातील भ्रष्ट न्यायधिशांच्या चौकशीचे अधिकार फक्त अध्यक्षांनाच असतील. तक्रारीत तथ्य आढळल्यास संपूर्ण समिती त्यांची चौकशी करील. निर्णय बहुमताच्या आधारे घेतला जाईल. अशा वेळी कार्यवाही करताना विशेष पोलिस आयुक्तांकडूनच चौकशी केली जाईल. त्या खालील अधिकारी चौकशी करू शकणार नाहीत. बहुमताने निर्णय घेताना त्यातील कायदेविषयक तज्ज्ञांचे मत बहुमतात असले पाहिजे.

**तक्रारकर्त्याचे संरक्षण**

तक्रार करणाऱ्या व्यक्तीला संरक्षण देण्यासाठी तक्रारकर्त्याला शारीरिक इजा होऊ शकेल असे दिसून आल्यास पोलिस यंत्रणेमार्फत संरक्षण देतील आणि तक्रारकर्त्याने मागणी केल्यास चौकशीनंतर सरकारी कर्मचाऱ्यास दंड केला जाईल.

**तक्रारींचा निपटारा**

तक्रार केल्यानंतर एक वर्षाच्या आत त्याबद्दल निकाल दिला जाईल. तक्रारींचा निपटारा होतो की नाही हे पाहण्यासाठी जनतक्रारनिवारण अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाईल. दरवर्षी अशा किती तक्रारी आल्या व त्यांच्यावर काय कार्यवाही झाली याचा गोषवारा मुख्य दक्षता आयुक्तांच्या अधिकारात प्रसिद्ध केला जाईल. यासाठी वेगवेगळ्या स्तरावर मुख्य दक्षता आयुक्त इतर आयुक्तांची नियुक्ती करतील. तक्रारीनंतर एक महिन्याच्या आत तक्रार योग्य की अयोग्य याचा निर्णय लोकपाल देतील. भ्रष्टाचार निवारणासाठी व तक्रारकर्त्यांना उत्तेजन देण्यासाठी प्रोत्साहन योजना राबविली जाईल.

**लोकपालांविरुद्धच्या तक्रारी**

लोकपालांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांविरुद्ध तक्रार आल्यास लोकपाल स्वतः भ्रष्टाचार निवारण कायद्यांतर्गत त्यांच्यावर कार्यवाही करू शकतील. अशावेळी तीन सदस्यांची समिती त्या कर्मचाऱ्याची चौकशी करून दोषी आढळल्यास त्याच्यावर कार्यवाही करील.

**लोकपालांचे संरक्षण**

लोकपालांच्या निर्णयाविरुद्ध इतर कुठल्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही.

**लोकपालांची चौकशीची मर्यादा**

अगोदरच ज्या गोष्टी न्यायप्रविष्ट आहेत अशा बाबी, तसेच लोकसभेच्या सभापतींकडे ज्या प्रकरणाची चौकशी चालू असेल अशा बाबींची त्यांना चौकशी करता येणार नाही.

**ज्ञानेश्वर शेलार**
औरंगाबाद.
मो. ९२२६७९७०१८

■■

# काळ्याकुट्ट इतिहासाची ‘आयपीएल’


दत्ता जोशी
media.care.abd@gmail.com




क्रिकेटच्या मैदानावर टीम

झहीर खान कोणत्या संघाकडून खेळतो? गौतम गंभीर कोणत्या संघात आहे? लसिथ मलिंगा कोणाकडून आहे? या आणि अशा अनेक प्रश्नांची उत्तरे मागील वर्षी वेगळी होती. मागच्या २ एप्रिलपर्यंत ती आणखीच वेगळी होती आणि ८ एप्रिलपासून ही उत्तरे पुन्हा बदलली. ‘आयपीएल’ नावाच्या गारुडाचा हा परिणाम होता. या गारुड्याच्या पुंगीची लय क्रिकेट खेळणाऱ्या सर्व देशांच्या क्रिकेटवीरांना मोहिनी घालणारी ठरली, ती इतकी की आपल्या देशाच्या एकाही खेळाडूची या संघांमध्ये निवड न झाल्याबद्दल पाकिस्तानी क्रिकेटपटूंनी जाहीर निषेध व्यक्त केला ! काय आहे हा प्रकार? चार वर्षांपूर्वी या प्रकाराची ‘क्रेझ’ किती होती आणि आज परिस्थिती काय आहे? या प्रकाराला सामान्य भारतीयाने कशा प्रकारे प्रतिसाद दिला आहे? सर्वात महत्वाचे म्हणजे या सर्व प्रकाराला पार्श्वभूमी कोणती आहे? एखाद्या व्यक्तीचा पराकोटीचा अट्टाहास कसा असू शकतो... एखाद्या महाशक्तीमान व्यक्तीने ठरविले तर एखादी चळवळ उध्वस्त कशी करता येते आणि तशीच चळवळ आपल्या नेतृत्वाखाली सुरू करण्याचा अट्टाहास ही व्यक्ती कशी प्रत्यक्षात उतरवू शकते... हा सारा इतिहास रंजक आणि काळाकुट्ट आहे.

साधारण २००६ मध्ये झी टीव्हीचे सर्वेसर्वा सुभाषकुमार गोयल यांच्या कल्पनेतून ‘इंडियन क्रिकेट लीग’ची स्थापना झाली. आंतरराष्ट्रीय पातळीवर नुकताच झालेला ‘ट्वेंटी ट्वेंटी’ क्रिकेटचा उदय या लीगच्या पथ्यावर पडला. गोयल हे भारतातील ‘मिडिया टायकून’ आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर रुपर्ट मर्डोक यांचे जे स्थान तेच भारतात गोयल यांचे. झी टीव्ही या पहिल्या भारतीय हिंदी चॅनेलचे ते निर्माते आणि त्यानंतर त्यांनी ‘झी टीव्ही’चा विस्तार अनेक भाषांमध्ये आणि क्षेत्रांमध्ये केला. ‘झी स्पोर्टस्’ ही त्यांची क्रीडा वाहिनी भारतातील पहिली भारतीय क्रीडा वाहिनी ठरली. आपल्या कारभाराचा विस्तार करण्यासाठी त्यांनी देशातील नामवंत क्रीडापटूंच्या सहकार्याने ‘आयसीएल’ला (इंडियन क्रिकेट लीग) जन्म दिला. वास्तविक देशातील तरुण रक्ताला वाव देणारा हा एक उत्तम पर्याय होता. ‘बीसीसीआय’च्या आंतरराष्ट्रीय संघात संधी न मिळालेल्या क्रिकेटपटूंना आपले क्रिकेट नैपुण्य दाखविण्यासाठी आणि त्याच वेळी चांगला पैसा कमावण्यासाठी आयसीएल हा चांगला पर्याय सापडला. देशातील उदयोन्मुख क्रिकेटपटूंबरोबरच गोयल यांनी काही परदेशी खेळाडूंनाही करारबद्ध केले. या कामी १९८३च्या विश्वचषक विजेत्या संघाचा कप्तान कपिलदेव यांनी पुढाकार घेतला होता. पण प्रत्येक क्षेत्रात आपल्या पुढे कोणीही गेलेले न खपण्याची प्रवृत्ती असलेले क्रिकेटमंत्री शरद पवार यांना गोयल यांची कृती रुचली नाही. त्यांनी हा विरोध इतक्या वैयक्तिक पातळीवर नेला, की ‘आयसीएल’च्या सामन्यांना देशभरातील एकही प्रमुख मैदान उपलब्ध होऊ शकले नाही. पवार गटाच्या हातात असलेल्या सर्व मैदानांवर ‘आयसीएल’ला बंदी होती. पवारांच्या ताब्यात असलेल्या आणि प्रभावाखाली असलेल्या वृत्तपत्रांनी या स्पर्धेच्या बातम्या छापणेही टाळले. त्या काळात लालूप्रसाद यादव यांनी मात्र बिहारमध्ये ‘आयसीएल’ला स्टेडियम उपलब्ध करून दिले. पर्यायी स्टेडियमचा वापर करीत आणि आपल्या ताब्यात असलेल्या ‘झी स्पोर्टस्’वर सामने दाखवीत गोयल यांनी पहिली क्रीडा स्पर्धा साजरी केली. या वाहिनीला ‘बीसीसीआय’च्या सामन्यांच्या प्रसारणांचे हक्क मिळू नयेत, म्हणून शरद पवार यांनी जंग जंग पछाडले. त्यासाठी नियम वाकविण्यात आले, बदलण्यात आले.






**भारत हा क्रिकेटप्रधान देश आहे. या देशाचे क्रिकेटमंत्री त्यांना वेळ मिळेल तेव्हा कृषि खात्याकडे लक्ष देतात. क्रिकेटच्या व्यापातून वेळ काढणे कठिण आहे, म्हणून आपल्यावरील 'वर्क लोड' कमी करावा अशी कोडगेपणाची मागणीही त्यांनी पंतप्रधानांकडे केली होती. 'वर्ल्ड कप', 'आयपीएल' यांच्या माध्यमातून देशात उन्मादाच्या लाटा आणून मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्याची 'अफूची गोळी' क्रिकेट धर्माच्या माध्यमातून दिली जात आहे. हे नशापाणी किती काळ चालणार?**

**न मालकांचा धंदा!**

पण त्यानंतर मात्र शरद पवारांच्या कुटील कारवायांना वेग आला. 'आयसीएल'मध्ये सहभागी झालेल्या भारतीय क्रिकेटपटूंना 'बीसीसीआय'ची दारे बंद झाली, एवढेच नव्हे तर त्या स्पर्धेत खेळणाऱ्या परदेशातील खेळाडूंना त्या त्या देशांच्या संघातही स्थान मिळू नये, आणि ते मिळाले तर भारतीय संघ त्या संघाविरुद्ध खेळणार नाही, अशा धमक्या देण्यापर्यंत हे प्रकार वाढले. एकदा 'बीसीसीआय'ची दारे बंद झाली की त्या खेळाडूंची क्रिकेट कारकीर्दच संपुष्टात आली, कारण परदेशात संघ पाठवायचे, तर 'आयसीसी'ची (इंटरनशनल क्रिकेट काउन्सिल) मान्यता असणे आवश्यक आणि भारतात अशा मान्यता फक्त 'बीसीसीआय'लाच होती. अशी मान्यता मिळविण्याचा प्रयत्न 'आयसीएल'कडूनही झाला पण तो उधळून लावण्यात आला. गोयल यांच्यासमोरील सर्व मार्ग खुंटलेले होते. प्रसारणाचे हक्क नाहीत, करारबद्ध झालेल्या खेळाडूंचे भविष्य अंधःकारमय झालेले आणि मूळ कल्पना पवारांच्या 'बीसीसीआय'ने चोरलेली... या पार्श्वभूमीवर गोयल यांनी 'आयसीएल'चा पसारा गुंडाळला आणि सर्व खेळाडूंना त्यांचे ठरलेले मानधन चुकते करून करारातून मुक्त केले. पण या धुमश्चक्रीत अनेक खेळाडूंची कारकीर्द अंधःकारमय झाली. अनेकांची संधी हुकली. दस्तुरखुद्द कपिल देवलाही बराच काळ बहिष्काराचा सामना करावा लागला.



याच दरम्यान 'आयसीएल'च्या पर्यायी 'आयपीएल'ची घोषणा करण्यात आली होती. 'बीसीसीआय'चेच (बोर्ड ऑफ क्रिकेट कंट्रोल ऑफ इंडिया)अपत्य असल्याने या स्पर्धेचा 'तामझाम' काय पाहायचा? राजस्थानातील ललित मोदी नावाचे एक 'कर्तबगार' सहकारी शरद पवारांना मिळाले आणि या मोदींनी 'आयपीएल'ची जबाबदारी स्वीकारली. संघांच्या मालकांकडून मिळालेला प्रचंड पैसा, ताब्यात असलेली यंत्रणा आणि शरद पवार यांचा वरदहस्त यामुळे मोदी निरंकुश झाले. २००८ मध्ये मोठा गाजावाजा करीत 'आयपीएल'च्या पहिल्या सत्राचे उद्‌घाटन झाले आणि या स्पर्धेला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. 'बीसीसीआय'शी करारबद्ध असलेले खेळाडू 'आयसीएल'मध्ये सहभागी होऊ शकले नव्हते. पर्यायाने त्यांच्याकडे स्टार क्रिकेटपटू उपलब्ध नव्हते. परदेशातील ब्रायन लारासारखे काही क्रिकेटपटू त्यांच्याकडे होते पण तेवढी संख्या पुरेशी ठरली नाही. शिवाय 'झी परिवार' वगळता इतर सर्व न्यूज चॅनेलनीही त्यांच्यावर अघोषित बहिष्कार टाकलेला. त्यामुळे ते आयेजन काळवंडले होते. त्या पार्श्वभूमीवर 'आयपीएल'ची चमक उठावदार ठरली.

पहिल्या वर्षीचा प्रतिसाद 'बीसीसीआय'च्या तोंडाला पाणी आणणारा होता. देशभरातून दूरचित्रवाणीवर मिळालेला अभूतपूर्व प्रतिसाद आणि स्टेडियमवरही झालेली प्रचंड गर्दी यामुळे आयोजकांचा आत्मविश्वास वाढला. दुसऱ्या सत्राच्या वेळी मात्र कसोटीची घडी आली. २००९ मध्ये भारतात सार्वत्रिक निवडणुका होऊ घातलेल्या होत्या. निवडणुकांचे वेळापत्रक आणि सामन्यांचे दिवस साधारणपणे एकाच कालावधीत येत होते. तेव्हाचे केंद्रीय गृहमंत्री पी. चिदंबरम यांनी या सामन्यांदरम्यान सुरक्षा व्यवस्था पुरविण्यास नकार दिला, तेव्हा पर्यायी सुरक्षा व्यवस्था उभारण्याची तयारी आयोजकांनी दाखविली आणि जेव्हा सामनेच घेण्यास परवानगी नाकारण्यात आली आणि वेळापत्रक पुढे ढकलण्यास सुचविण्यात आले तेव्हा आयोजकांनी आपल्या मुजोरीचा कळस गाठला.



# ‘चिअर गर्ल्स’... हा काय प्रकार आहे?

क्रिकेट संस्कृतीला ‘आयपीएल’ने कोणते योगद-ान दिले? प्रचंड पैसा ओतण्यात आला आणि अर्धनागड्या बायका नाचविण्यात आल्या...! ‘चिअर गर्ल्स’ हा काय प्रकार आहे? हे प्रोत्साहन कुणासाठी? या बायकांचा नाच पाहून क्रिकेटपटूंना अधिक फटकेबाजीचे प्रोत्साहन मिळते की टीव्हीवर सामने पाहणाऱ्या आंबटशौकीनांना? याला ‘बीसी-सीआय’, ललित मोदी, शशांक मनोहर आणि अगदी शरद पवार यांनीही विरोध का केला नाही? इथे दोन उदाहरणे मला आवर्जुन मांडावीशी वाटतात. भारताने दोन वर्षांपूर्वी श्रीलंकेत आपल्या दौऱ्यादरम्यान एकमेव ‘टी ट्वेंटी’ सामना खेळला होता. या सामन्यात श्रीलंकेनेही ‘चिअर लिडर्स’ वापरले. पण हा प्रकार खूपच अभिनव वाटला. श्रीलंकेतील लोकपरंपरा सादर करणाऱ्या ग्रुपना त्यांनी निमंत्रित केले होते आणि त्या वेषभूषेत त्यांनी आपली नृत्ये व वादन सादर केले. चौथ्या ‘आयपीएल’मध्ये सहभागी झालेल्या ‘पुणे वॉरियर्स इंडिया’चे मालक ‘सहारा ग्रुप’ने साधारण मार्च अखेरीस

‘आम्ही ठरविलेल्या वेळीच हे सामने होतील’, असे सरकारलाही ठणकावून सांगत ही स्पर्धा थेट दक्षिण अफ्रिकेत भरविण्यात आली. सामन्यांच्या वेळा भारतीय प्रेक्षकांना सोयीच्या होतील अशा ठरविण्यात आल्या आणि क्रिकेटच्या इतिहासात पहिल्यांदाच एका देशातील अंतर्गत स्पर्धा दुसऱ्या देशात स्थलांतरीत करण्यात आली.

ही मुजोरी कुठून आली? देशातील सार्वत्रिक निवडणुका आणि अंतर्गत सुरक्षाव्यवस्था या पेक्षा ही स्पर्धा महत्वाची होती का? ‘बीसीसीआय’ आणि साहजिकच शरद पवार यांच्या दृष्टीकोनातून याचे उत्तर ‘ठाम होय’ असेच आहे. भलेही या स्थलांतराचे श्रेय आणि जबाबदारी ललित मोदी यांच्याकडे ढकलण्यात येते तरीही त्यांच्या मागे कोण होते? शरद पवार आणि पी. चिदंबरम यांच्यातील कुरघोडीचे राजकारण देशाने पाहिलेले होते. या पार्श्वभूमीवर थेट केंद्रीय गृहमंत्र्यांना, पर्यायाने देशालाच आव्हान देण्याची ही प्रवृत्ती शरद पवारांच्या पाठिंब्याशिवाय जन्मणे शक्य तरी आहे काय?

तुलनेत कमी प्रेक्षक असलेल्या, बांधकामे चालू असलेल्या द. अफ्रिकेतील मैदानांवर या स्पर्धा रंगल्या आणि क्रिकेटप्रेमी भारतीयांनी या स्पर्धांचाही आनंद घेतला. निवडणुकीच्या धामधुमीत सर्वांचीच घटकाभर करमणूक झाली. पण पहिल्या ‘आयपीएल’च्या तुलनेत या वेळी देशभरातील क्रीडाप्रेमी या वेळी कमी प्रमाणात सहभागी झाले. २०१० मधील तिसरी ‘आयपीएल’ परत भारतात आली. पण एव्हाना अति क्रिकेटचा परिणाम जाणवू लागला होता. मैदानावर क्रीडाप्रेमींनी जोरदार प्रतिसाद दिला पण टीव्हीवरील टीआरपी मात्र कमी झाल्याचे लक्षात येऊ लागले. याच काळात ललित मोदी यांच्या भ्रष्टाचाराच्या सुरस कथा समोर येऊ लागल्या होत्या. ‘आयपीएल -३’ संपल्याबरोबर त्यांची हकालपट्टी होणार हे निश्चित होते. तरीही मोदींनी आपली बाजू भक्कमपणे लावून धरली. अंतिम सामन्यासाठी तर ते स्वतःच्या परिवारासोबत हेलिकॉप्टरने आले ! त्याच रात्री त्यांची उचलबांगडी झाली आणि चिरायू अमीन ‘आयपीएल’चे गव्हर्नर झाले.

हा साराच घटनाक्रम काळाकुट्ट आणि क्रिकेटच्या आत्म्याला काळीमा फासणारा आहे. या देशातील क्रिकेटरसिक क्रिकेटपटूंवर जिवापाड प्रेम करतो. त्याच्यासाठी नवस बोलतो. सचिनसारख्या खेळाडूंना तर देव मानतो. त्यांच्या भावना इथे मातीमोल ठरल्या. ‘आयपीएल’ने क्रिकेट जगतात पैशाचा माज आणला. आंतरराष्ट्रीय सामन्यात देशाचे प्रतिनिधीत्व करण्यापेक्षा ‘आयपीएल’च्या बोलीत जास्तीत जास्त पैसा मिळविण्यावर खेळाडूंनी लक्ष केंद्रित केले. तिसऱ्या सत्रानंतर दोन संघ वाढविण्याचा निर्णय ‘बीसीसीआय’ने घेतला आणि या संघांच्या विक्रीतून त्यांना झालेली कमाई पाहून सर्वांचेच डोळे पांढरे झाले. हा सारा काय प्रकार आहे? हा पैसा येतो कुठून? जातो कुठे? तिसऱ्या सत्रापर्यंत ‘चेन्नई सुपर किंग्ज’, ‘डेक्कन चार्जर्स’, ‘दिल्ली डेअरडेव्हिल्स’, ‘किंग्ज इलेव्हन पंजाब’, ‘कोलकोता नाईट रायडर्स’, ‘मुंबई इंडियन्स’, ‘राजस्थान रॉयल्स’ आणि ‘रॉयल चॅलेंजर्स बेंगलोर’ हे आठ संघ ‘आयपीएल’च्या मैदानात होते. या वर्षीच्या चौथ्या सत्रासाठी ‘कोची टस्कर्स केरला’ आणि ‘पुणे वॉरियर्स इंडिया’ या दोन संघांची त्यात भर पडली. या दोन संघांच्या मालकांनी ‘बीसीसीआय’ला मालामाल केले. हा फायदा मिळवून देणाऱ्या ललित मोदींना मात्र खड्यासारखे दूर करण्यात आले. अशा प्रकरणांची आपल्या देशातील पार्श्वभूमी पाहता त्यांच्या जिवाला धोका असू शकतो. त्यामुळेच त्यांनी परदेशात आश्रय घेणे सोयीस्कर मानले.



सर्व दैनिकांत अर्धे पान जाहिरात दिली होती. दुर्दैवाने विश्वचषकाच्या धामधुमीत त्याकडे कोणीही लक्ष दिले नाही. त्यांनी या जाहिरातीत केलेले आवाहन हृद्य होते. आपल्या देशातील लोककला आणि लोककलावंतांना 'चीअर लीडर्स' म्हणून आपल्या सामन्यांमध्ये सहभागी करीत असल्याची माहिती त्यांनी यात दिली होती आणि इतरही सर्व संघांनी याच प्रकारे अर्धनागड्या बायका न नाचवता लोककलांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन केले होते. त्याला कोणीही प्रतिसाद दिल्याचे दिसत नाही. पुण्याचा संघ खेळत असलेले सामने चालू असताना ही नृत्ये आवर्जुन पाहा... आपल्या मनातील सहारा ग्रुपबद्दलची आत्मीयता नक्कीच वाढेल. या ग्रुपने नेहेमीच देशभावनेला प्रोत्साहन दिले आहे. महिला क्रिकेटला, हॉकीला प्रायोजक मिळत नसताना याच ग्रुपने ऐनवेळी पुढाकार घेत मदत केली. 'आयपीएल'च्या मैदानातही त्यांनी आपले वेगळे अस्तित्व दाखविले आहे...

■

पवारांच्या राजकारणाचे एक खास वैशिष्ट्य आहे. राजकारण असो की आयपीएल - कोणाला केव्हा बरोबर ठेवायचे आणि केव्हा दूर करायचे हे बरोबर कळते. मग ते मोदी असोत, कलमाडी असोत, दालमिया असोत की पद्मसिंह पाटील. केव्हा काय बोलायचे हे ही त्यांना बरोबर कळते. 'लवासा सिटी'च्या वादात ते योग्य वेळी तोंड उघडतात आणि परस्पर 'क्लीन चीट'ही देऊन टाकतात. स्वतः केंद्र सरकारचा एक अविभाज्य भाग असतात आणि सरकारमधील भ्रष्टाचारावर बिनधास्त टीकास्त्र सोडतात... पण ते सरकार सोडत नाहीत !

मोदी असोत की शशांक मनोहर की चिरायू अमीन... या पैकी एकाला तरी स्वतःचे मत असू शकते? 'आयपील'च्या चार वर्षांच्या वाटचालीत असंख्य वेळा अतिशय धाडसी निर्णय घेतले गेले. हे निर्णय घेण्याची आणि त्यांच्या अंमलबजावणीची कुवत या तिघांत किंवा त्यांच्या सहकाऱ्यांत खरेच आहे? शरद पवार नावाची व्यक्ती पाठीशी नसेल, तर त्यांची ही हिम्मत झाली असती का? या प्रश्नाचे उत्तर नक्कीच नकारार्थी आहे. 'आयपीएल'च्या चौथ्या सत्रात ५१ दिवसांत ७४ सामने होत आहेत. देशभर जागोजागी होर्डिंग्ज झळकलेली आहेत... 'आयपीएल सुरू - देश बंद' ! खरेच ही स्थिती आहे? काही प्रमाणात आयपीएलच्या पहिल्या सत्रात ही स्थिती होती. मैदानाबाहेरच्या कारणांमुळे कुप्रसिद्ध झालेल्या क्रिकेटला भारतात विश्वचषक जिंकण्याच्या चमत्कारामुळे काहीशी संजीवनी मिळाली, पण या सामन्यांकडे पाहण्याची समाजाची नजर आता स्वच्छ राहिली नाही. आर्थिक मुजोरीतून प्रीती झिंटा युवराज सिंगला खडे बोल सुनावू शकते, विजय मल्ल्या अनिल कुंबळेला दूर सारू शकतो, शाहरुख खान सारखा 'विदूषक' सुनील गावस्कर यांना 'अक्कल' शिकवू शकतो... क्रिकेटच्या सभ्यतेत अशा गोष्टींना जागा मिळते? थोडक्यात, 'आयपीएल' ही त्यात सहभागी झालेल्या सर्वांची सोय आहे. 'बीसीसीआय'ला बक्कळ पैसा मिळतो, क्रिकेटपटूंना ग्लॅमर मिळते, संघमालकांना चिक्कार प्रसिद्धी मिळते... पण क्रिकेट रसिकांना निखळ आनंद मिळतो का? हा संशोधनाचा विषय आहे.



**दत्ता जोशी**
मो. ९२२५३०९०१०

■■

# जैतापूर प्रकल्प : एक विचारमंथन

### भाग दुसरा

**ग्रामस्थांचा या प्रकल्पास संपूर्ण विरोध आहे. सरकार मात्र धडाक्याने पुढे जात आहे. सरकारने ग्रामस्थांना विस्थापनासाठी जमिनीची किंमत व इतर सवलती जाहीर केलेल्या आहेत. पण ग्रामस्थांना हा प्रकल्पच नको असल्याने ग्रामस्थ आपल्या जमिनी विकण्यास तयार नाही. आपण नक्की परिस्थिती समाजावून घेऊ.**



**विश्वास प्र. पिटके**

### अरिवा EPR तंत्रज्ञानाचा खरा अर्थ

जगभरात नामुष्की झाल्यावर अरिवाने भारताशी हात मिळवणी केली आहे. खरे तर Nuclear Power Corporation of India Ltd. (NPCIL) ही भारत सरकारची स्वतःची संस्था PHWR तंत्रज्ञान देत असूनही आज अरिवा बरोबर हा करार अस्तित्वात आला आहे व आपण प्रायोगिक तत्त्वावर व कोठेही अजूनपर्यंत सिध्द न झालेले धोकेदायक तंत्रज्ञान अरिवाकडून घेणार आहोत. या प्रकल्पाची वरवर किंमत आजच जरी रू. २१ कोटी प्रती MW (म्हणजेच १६५० MW ला एकूण रु. ३४६५० कोटी व संपूर्ण ९९०० MW ला एकूण रु. २०७९०० कोटी) सांगितली जात असली तरी ती प्रचंड वाढणार आहे. हा प्रकल्प बांधण्याचा कालावधीपण हळूहळू वाढत जाणार आहे. त्यामुळे या प्रकल्पातून येणारी वीज रू.९/KWh पेक्षा कमी खर्चाची नसणार आहे. आपण याच फ्रान्स सरकारकडून LWR तंत्रज्ञान का घेत नाही. याचे उत्तर भारत सरकार आणि NPCIL देऊ शकत नाही. प्रकल्पाचा एकूण खर्च नक्की ठरविलेला नाही असे खुद्द NPCIL चे म्हणणे आहे. तरीही करारावर दोन्ही देशांच्या सह्या झालेल्या आहेत. एकंदरीत, कारभार अजब आहे.

### स्वतंत्र व स्वायत्त अणुऊर्जा नियामक मंडळ अनिवार्य

परदेशात सामान्य जनतेचे हित जपण्यासाठी अणुऊर्जा नियामक मंडळ असते. असे मंडळ नव्या येणाऱ्या प्रत्येक अणुप्रकल्पांची काटेकोर चौकशी व छाननी करूनच प्रकल्प उभारणीस मान्यता देते. हे नियामक मंडळ संपूर्णपणे स्वतंत्र व स्वायत्त असते व स्वतःच्या सरकारलासुध्दा जुमानीत नाही. ते सरकारच्या ताटाखालचे मांजर नसते. या मंडळात त्या क्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञ असल्यामुळे त्यांना फसवले जाऊच शकत नाही. परिणामी जनतेचे हित आपोआपच साधले जाते व त्या जनतेला जैतापूरच्या जनतेसारखे रस्त्यावर यावे लागत नाही. भारतात असे, अणुशास्त्रज्ञ व तंत्रज्ञांना आव्हान देणारे नियामक मंडळ नाही. आज दुर्दैवाने भारतीय अणुक्षेत्र हे फक्त सरकारच्याच ताब्यात असल्यामुळे सरकार देत असणारी माहिती मुकाट्याने मान्य करण्यावाचून गत्यंतर नाही. दुर्दैवाने या क्षेत्रातील संस्था तथाकथीत 'गोपनियतेच्या' नावाखाली कसलीही माहिती देत नाही. यावर उपाय म्हणजे भारतात अणुक्षेत्रात एक स्वतंत्र व स्वायत्त नियामक मंडळ (Regulatory Board) स्थापन केले पाहिजे. आज भारतात असणारे Atomic Energy Regulatory Board (AERB) हे






संपूर्णपणे भारत सरकारच्या धोरणांवर चालते.

आज प्रत्येक राज्यात विद्युत नियामक मंडळे आहेत व ही मंडळे त्या त्या राज्यातील वीजनिर्मितीचा रास्त खर्च नक्की किती आहे हे ठरवून त्याप्रमाणेच ठराविक किमतीत वीज उपलब्ध करून देतात. त्यामुळे परत एन्रॉनसारखी घोडचूक होणार नाही याची खबरदारी घेतली गेली आहे. असे अणुउर्जेबाबत का होत नाही? या सर्व पार्श्वभूमीवरून आता आपण प्रत्यक्ष 'ग्राऊंड झीरो' म्हणजेच जैतापूरकडे वळू.

## जैतापूर

ग्रामस्थांचा या प्रकल्पास संपूर्ण विरोध आहे. सरकार मात्र धडाक्याने पुढे जात आहे. सरकारने ग्रामस्थांना विस्थापनासाठी जमिनीची किंमत व इतर सवलती जाहीर केलेल्या आहेत. पण ग्रामस्थांना हा प्रकल्पच नको असल्याने ग्रामस्थ आपल्या जमिनी विकण्यास तयार नाही. आपण नक्की परिस्थिती समजावून घेऊ.

१. जैतापूर प्रकल्पातून दरवर्षी ३०० टन असा अण्विक किरणोत्सारी कचरा निर्माण होणार आहे. तो साठविण्याची व सुरक्षित ठेवण्याची कसलीही व्यवस्था सरकारने केलेली नाही व केलेली असल्यास नक्की कशी ते ठामपणे सांगितलेले नाही. असा कचरा स्टेनलेस स्टीलच्या डब्यात पुढील १०० वर्षे साठविण्याची व्यवस्था करणार असे सरकारचे म्हणणे आहे. पुढे काय ते देव जाणे.

२. १६५० MW एवढी प्रचंड क्षमता, क्लिष्ट असा अणुभट्टीचा आराखडा, सुरक्षिततेच्या दृष्टीने अनुत्तरित प्रश्न, भट्टीत असणारी भरपूर प्रमाणात निर्माण झालेली न्यूट्रॉनची संख्या या सर्व गोष्टींमुळे अपघात जरी झाला नाही तरी किरणोत्सार हा भरपूर असणार आहे. ग्रामस्थांना हीच भीती आहे. NPCIL च्या म्हणण्यानुसार पृथ्वीवर नैसर्गिक किरणोत्सारातच प्रत्येक मनुष्य दरवर्षी २४०० Micro Sievert इतक्या प्रमाणात न्हाऊन निघतोच. Atomic Energy Regulatory Board (AERB) नुसार कोणत्याही व कितीही मोठया अणुप्रकल्पाच्या कुंम्पणाबाहेर जास्तीत जास्त १००० Micro Sievert एवढाच किरणोत्सार हवा. NPCIL च्या म्हणण्यानुसार आजपर्यंत कार्यास असणाऱ्या प्रकल्पात तो फक्त नगण्य असा २ ते ३६ Micro Sievert इतकाच आहे. हे स्वतंत्रपणे पडताळून कोण सांगणार?

३. AERB भारतीय सरकारचे स्वत:चे नियामक मंडळ आहे. ते स्वतंत्र व स्वायत्त नाही. Department of Atomic Energy (DAE) च्या छत्राखाली AERB चा कारभार चालतो. Nuclear Power Carporation of India Ltd. (NPCIL) पण DAE च्या छत्राखाली काम करते. अणु प्रकल्पांचे आयोजन, आरेखन व उभारणी तसेच ते चालविण्याचे काम NPCIL करते व त्यांनी केलेल काम योग्य आहे का नाही हे AERB ठरविते. AERB मध्ये NPCIL मधून निवृत्त झालेले तज्ज्ञच असतात. जेव्हा जेव्हा अणुप्रकल्पांच्या तपासणीची वेळ येते त्यावेळेस DAE च्या लोकांचीच मदत घेऊन माहिती गोळा केली जाते. साहजिकच AERB हे केवळ नाममात्र नियामक मंडळ आहे. आज प्रगत देशात संपूर्णपणे स्वायत्त अशी नियामक मंडळे आहेत. भारतात आता असे नियामक मंडळ जैतापूरच्या योगाने निर्माण झाले पाहिजे.

४. जैतापूरजवळील विभाग हा भूकंपप्रवण असून तो zone IV या दर्जाचा आहे असे खुद्द Siesmic Survey of India (भारतीय भूकंप मापन संस्था) सांगते. याचा अर्थ असा की तेथे ७ रिश्टरचा भूकंप होऊ शकतो व इमारती व बांधकाम कोसळू शकते. नेमकी हीच गोष्ट अणु ऊर्जा प्रकल्पास घातक आहे. NPCIL च्या दृष्टीने मात्र हा भाग Zone III मध्ये येतो व असा धोका नाही. खुद्द एका सुप्रसिध्द मराठी दैनिकाने डॉ. अनिल काकोडकर यांचा दाखला देऊन जैतापूर हे झोन २ मध्ये येते असे बातमीत लिहिले आहे. नक्की खरे कोणाचे? हा मुद्दा फार महत्त्वाचा आहे.१० ते १२ मार्च २०११ला झालेल्या जपानमधील भूकंप व त्यानंतर आलेल्या त्सुनामीमुळे तेथील अणुभट्ट्यांचे किती नुकसान झालेले आहे हे आपण वर्तमानपत्रातून वाचतच आहोत. रशियाने तर जपानी अणुभट्ट्या या सदोष आहेत असे जाहीर केले आहे. परत एकदा वाचकांच्या निदर्शनास मी हे आणून देऊ इच्छितो की, अरिवाचे EPR तंत्रज्ञान हे ज्या मूळ वेस्टिंग हाऊस कंपनीचे आहे तीच जपानच्या तोशिबा कंपनीच्या मालकीची आहे.

५. DAE ने National Environmental Engineering Reseach Institute (NEERI) या नागपूर स्थित सरकारी संस्थेस प्रकल्पामुळे पर्यावरणावर काय काय परिणाम होऊ शकतात, यासाठी अहवाल तयार करण्याचे काम दिले. खरे तर अणु ऊर्जा हा विषय NEERI च्या अखत्यारीत अजिबात येत नाही. त्यांचे काम प्रदुषणाचा अभ्यास करणे हे आहे. त्यामुळे NEERI ने वन्यजीवनावरील परिणामाच्या अभ्यासासाठी चक्क कोकण कृषी विद्यापीठ, दापोली (KKV) यांची नेमणूक केली. NEERI ने सादर केलेल्या अहवालानुसार जैतापूर जवळील जागा ही ओसाड आहे व तेथे फारशी जीवसृष्टी नाही. KKV ने तर माडबन येथे एकही विहीर नाही असा हास्यास्पद निष्कर्ष काढला आहे. ज्यावेळेस Bombay Natural History Society (BNHS) या वन्यजीवन व वनस्पतींचा अभ्यास असणाऱ्या संस्थेने तेथे जाऊन अहवाल सादर केला, त्यात त्यानी नमूद केले की जैतापूर परिसरातील सर्व जमीन ही सुपीक व शेती योग्य आहे. प्रकल्पाच्या आजूबाजूस भरपूर समृध्द जीवसृष्टी आहे. सुमारे १० कि.मी.च्या त्रिज्येत ४०७ हेक्टर एवढी खारफुटीची (Mangroves) जंगले आढळली. BNHS

ला प्रकल्पाच्या ठिकाणी व आजूबाजूस १००० प्रकारच्या वनस्पतींच्या प्रजाती सापडल्या. NEERI ला याच्या निम्म्यानेसुद्धा वनस्पतींच्या प्रजाती मिळाल्या नाहीत. शेवटी BNHS चा अहवाल नाईलाजाने विचारात घेऊन; पण NEERI चा अहवाल समोर ठेवून पर्यावरण मंत्रालयाने घाईघाईने प्रकल्पास हिरवा कंदील दिला व सुमारे ३५ सुधारणा सुचवल्या. BNHS चे या क्षेत्रातील नैपुण्य वादातीत आहे. NEERI ला यातील काहीही ज्ञान नाही. तरीही NEERI च का? हे म्हणजे कपडे शिवण्यासाठी शिंप्याला न बोलविता न्हाव्याला पाचारण केल्यासारखे झाले. कदाचित दोघांचेही काम 'कटिंग करणे' हेच असल्यामुळे समजूतीचा घोटाळा झाला असावा.

६. खुद्द Tata Institute of Social Science (TISS) ने पण अहवाल दिला की सरकार कसलीही पारदर्शिता न ठेवता मनुष्य प्राण्यांवर या प्रकल्पाचा काय परिणाम होईल ते जाहीर करीत नाही.

७. रत्नागिरी जिल्ह्यात १५२३३ हेक्टरमध्ये आंब्याची लागवड होते. त्यावर होणारे परिणाम कोणीच सांगत नाही. प्रकल्पातून दररोज ५२०० कोटी लिटर गरम पाणी समुद्रात सोडले जाणार आहे. या पाण्यामुळे समुद्रातील १.५ ते २.५ किमी पर्यंतचे पाणी आहे त्यापेक्षा ५०°C इतके गरम होऊ शकते. BNHS नुसार आहे त्या तापमानापेक्षा ०.५०°C पाण्याची तापमानवाढसुद्धा समुद्रातील जीवसृष्टी नष्ट करते. आज येथे पकडलेले मासे व समुद्री प्राणी युरोपात पाठविले जातात. तेथे मासेमारी नक्की कोणत्या वेळी केली, किती पाण्यात केली व कोठे केली याचे काटेकोर प्रमाणपत्र द्यावे लागते. प्रकल्पाच्या आजूबाजूस पकडलेले मासे हे निर्यातीस अयोग्य होण्याची भीती आहे व त्यायोगे १५००० कुटुंबियांची रोजी रोटी जाणार आहे. याचे धडधडीत उदाहरण म्हणजे सध्याचे तारापूर येथील प्रकल्प. तेथील आधी असणारी ३ मच्छिमार केंद्रे बंद झालेली आहे. पूर्वीचा समृध्द कोळी व शेतकरी वर्ग दरिद्री झालेला आहे. रत्नागिरी व प्रकल्पालगतचा कोळी/शेतकरी मात्र आज दररोज ३०० ते ४०० रुपये मिळवतो ते घालविण्याची त्याची इच्छा नाही. असे असतानादेखील खुद्द डॉ. अनिल काकोडकर हयांच्या भाषणाचा दाखला देऊन वर्तमानपत्रातून असे सांगितले जाते की असे पाणी समुद्रात सोडल्यानंतर साधारणतः १०°C पर्यंत त्याचे तापमान खाली उतरते. याचा अर्थ काय समजावा?

८. कोकण बचाव समिती व जनहित सेवा समिती या प्रकल्पाच्या विरोधात कार्य करीत आहेत. प्रकल्पाच्या गावातील ५ ही ग्रामपंचायतींनी एकमुखाने हा प्रकल्प अजिबात न होऊ देण्याचा ठराव मंजूर केलेला आहे.

९. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रांनी प्रकल्पग्रस्तांना तारापूर येथील प्रकल्पातील सुरक्षा व्यवस्था दाखविण्याची तयारी दर्शवली आहे. पण गळ्यात मात्र फ्रेंचांचे EPR तंत्रज्ञान मारले जाणार आहे. हे म्हणजे 'माझ्या घरची व्यवस्थित चालणारी सायकल बघा व समोरच्या नवशिक्याने बनवलेले विमान विकत घ्या,' असे सांगणे आहे. खरे तर सर्व प्रकल्पग्रस्तांना फिनलँड, फ्रान्स व इंग्लंड ला नेऊन अरिवाचे काम दाखविले पाहिजे.

१०. प्रकल्पग्रस्तांना सरकारने देऊ केलेले पुनर्वसनाचे आमिष नको आहे. त्यांना दुसरा 'अरबी समुद्र' व किनारा भेट म्हणून मिळाला तरच प्रकल्प होणे शक्य आहे. कारण हाच अरबी समुद्र त्यांची आई आहे. हे सर्व जाणून घेतल्यावर असे वाटते की भारत अणुऊर्जा प्रकल्पावर भर देऊन नक्की साध्य काय करणार आहे?

१. आजमितीस भारताची एकूण ऊर्जा स्थापित क्षमता १,७०,४६९ MW इतकी आहे. देशाचा वार्षिक ८% विकासाचा दर धरूनदेखील आपली २०३२ मधील ऊर्जेची गरज ८,००,००० MW इतकी असणार आहे. आपण ६४,००० MW आण्विक ऊर्जा निर्मितीचे उद्दीष्ट २०३२ पर्यंत ठेवले आहे. म्हणजे आपल्या गरजेच्या जेमतेम ८ टक्केच. मग आपण फक्त या ८% ऊर्जेसाठी अख्खा देश धोक्यात का आणत आहोत? या उलट आजच अपारंपरिक ऊर्जेचा सहभाग १०% इतका आहे.

२. भारतात सौरऊर्जा ४,००,००० MW, पवन ऊर्जा १,००,००० MW, बायोगॅस व बायोमास ऊर्जा २,५०,००० MW इतकी आहे. त्याकडे आपण लक्ष का देत नाही?

३. साठ वर्षापूर्वी डॉ. भाभांचेच सहकारी व गणितज्ज्ञ, डॉ. धर्मानंद डी. कोसंबी यांनी खणखणीत विधान केले होते की भारताने अणुशक्तीवर ऊर्जेसाठी तरी प्रचंड खर्च न करता सौरऊर्जेवर लक्ष केंद्रित करावे. भविष्यात फक्त सौरऊर्जाच यशस्वी होईल; पण त्याकाळी डॉ. भाभांच्या एकंदर जागतिक व्यक्तिमत्त्वामुळे या देशी विचारवंताचे कोणी ऐकले नाही. आज मात्र जगभर आता सौरऊर्जेवरच भर दिला जात आहे. खुद्द अमेरिकेत सौर ऊर्जेवर प्रचंड भर दिला जात आहे.




४. अणुऊर्जा ही पर्यावरणपूरक अजिबात नाही. फारतर त्यामुळे $CO_2$ नाहीसा होईल; पण किरणोत्सार नावाचा राक्षस जन्माला येईल. युरेनियमच्या खाणी खणण्यापासून ते अणुकचरा दफन करण्यापर्यंतच्या प्रत्येक टप्प्यात हा धोका असतोच. समजा आज जगभर जेवढी अणुऊर्जा निर्माण होते त्याच्या चौपट अणुऊर्जा जरी आपण इ.स. २०५० पर्यंत निर्माण केली तरी हरित वायूचे प्रमाण फार फार तर फक्त ४% कमी होईल. म्हणजे आपण मिळवले काय?

५. आपल्या देशात वीज वाहून नेताना होणारी तूट (T&D Losses) व विजेची चोरी ही जवळपास एकूण वीज निर्मितीच्या ३० ते



४० टक्के आहे. प्रगत देशात अशी वीजची चोरी होत नाही. प्रगत देशात वीज वहनातील तूटसुध्दा (T&D Losses) जेमतेम ४ ते ७ टक्के असते. यामध्ये होणारी आपली नुसती विजेची चोरी जरी भरून काढली तरी आहे त्या विद्युत क्षमतेच्या २५ ते ३० टक्के वीज भारतात आपोआपच निर्माण होईल. यावर कोणाचेही लक्ष नाही.

६. ऊर्जा बचतीच्या (energy conservation) मार्गानेसुध्दा भारतात अजून कमीत कमी २५ ते ३० टक्के ऊर्जा आपोआप वाढेल. तीसुध्दा अणुऊर्जेपेक्षा जास्त असेल.

हे जाणून घेतल्यावर असे वाटते की खालील उपाय तातडीने योजले पाहिजेत.

१. सर्व प्रथम संपूर्ण स्वतंत्र व स्वायत्त अशा नियामक मंडळाची भारतात स्थापना केली पाहिजे. त्यायोगे जनहित जपले जाईल.

२. युरेनिअमच्या बाबतीत भारताने स्वयंपूर्ण झालेच पाहिजे. ज्यायोगे मग्रुर बडे देश आपली मनमानी करू शकणार नाहीत.

३. अणुतंत्रज्ञान अणुऊर्जानिर्मिती कडे संपूर्णपणे न वळवता अणू पाणबुड्या विकसित करणे, अण्वस्त्रे बनविणे यापुरते मर्यादित ठेवावे. याच जोडीला माफक प्रमाणात व सावकाश व सर्वतोपरी सुरक्षित तंत्रज्ञान विकसित करीत अणुप्रकल्प बांधावेत. अमेरीकेने आपला शेवटचा अणुप्रकल्प (Watts Bar-1 reactor) सावकाशपणे २४ वर्षे घेत टाकला.

४. फास्ट ब्रीडर रिॲक्टर (FBR) च्या साहाय्याने भारतातील थोरिअमच्या वापरावर भर देऊन भारतातील ऊर्जा निर्मितीचा प्रश्न सोडवण्याची तयारी करावी.

५. अपारंपरिक ऊर्जा स्रोतांवर भरपूर भर द्यावा व प्रथम त्यांचाच वापर करावा.

६. अणुप्रकल्प कोठे ना कोठे तरी टाकला जाणारच. त्यामुळे प्रश्न फक्त जैतापूर पुरता मर्यादित नाही. साहजिकच जनतेस न दडपता भारतीय बनावटीचे तंत्रज्ञानच प्रसारित करावे.

७. फ्रान्सच्या अरिवाच्या EPR तंत्रज्ञानाची कास सोडावी व ते रद्द करावेत. निदान एकदम ६ प्रकल्पाचे हे प्रकल्पांचे कंत्राट तरी करू नये व फारतर प्रायोगिक तत्वावर एखादा प्रकल्प बांधण्याची बोलणी करावीत. येथे हे नमुद करावेसे वाटते की अणुऊर्जेच्या सुरुवातीच्या काळात भारतीय शास्त्रज्ञांच्या समोर विचित्र परिस्थिती आलेली होती. अमेरिकेचे फक्त समृध्द युरेनियमवरच चालणारे अणुतंत्रज्ञान आणावे का कॅनडाचे (Canadium Duterium Uranium - CANDU) अशुध्द युरेनियमवर चालणारे तंत्रज्ञान भारतात आणावे असा प्रश्न होता. आपल्याकडे अशुध्द युरेनियम (Yellow Cake) च असल्यामुळे अमेरिकेवर इंधनासाठी अवलंबून न रहाता भारतीय शास्त्रज्ञांनी CANDU तंत्रज्ञानच तारापूरला आणले. त्यावेळी अमेरीकेचे तंत्रज्ञान हे खात्रीशीर होते. पण CANDU तंत्रज्ञान हे अजून प्रायोगिक अवस्थेत होते. तरीही भारतीय शास्त्रज्ञांनी ते यशस्वीपणे आत्मसात केले. मात्र या वेळेस परिस्थिती तेवढी सोपी नाही. खुद्द तारापूरचा प्रकल्पसुध्दा अपघात मुक्त नाही. तेव्हाची जोखीम व आजच्या EPR तंत्रज्ञानातील जोखीम यात जमीन अस्मानाचा फरक आहे.

८. भारताने अण्विक कचरा व निर्धोकीकरण याक्षेत्रात संशोधन हाती घ्यावे. यातून जर खरोखरीच चांगले निष्पन्न झाले तर भारतच जगाला हे तंत्रज्ञान पुरवू शकेल.

कदाचित असेही असू शकेल की सरकारकडे वरील प्रत्येक बाबींसाठी संपूर्ण स्पष्टीकरण असेल व आज जे निर्णय सरकार घेत आहे तेच योग्य असतीलही. असे असेल तर जनतेला व्यवस्थित विश्वासात न घेता निर्णय का घेतले जातात? त्यामुळेच जनतेने जाब विचारण्याची आज खरी गरज आहे. भारतीय संस्कृतीत एखाद्या गोष्टीचे कौतुक झाले की त्या गोष्टीचे 'प्रस्थ' वाढते. व्यक्तीमत्व असेल तर त्यांचे 'देव्हारे माजतात'. त्यानंतर मग अशा प्रस्थांनी काहीही केले तरीपण लोक त्यांचे मुल्यमापन न करता 'यांना नावे कशी ठेवणार?' अशा विचाराने गप्प बसतात. काळानुरूप अशा प्रस्थांचा दर्जा जरी घसरला तरी आपण त्यांचे आंधळेपणाने कौतुकच करतो. डोळसपणे त्यांच्यावर टिका करून त्यांचे कठोर मूल्यमापन करण्याऱ्याची टर उडविली जाते. अशा पध्दतीने 'Holy Cow' जन्माला येते. कारण प्रत्येकवेळी कठोर मूल्यमापन होत नाही. याचाच परिणाम म्हणजे आज अणुउर्जा क्षेत्रातील सर्व संस्था, ISRO, IIT (आणि अजून असे बरेच काही) यांचे अकारण होणारे वारेमाप कौतुक. आज भारतीय अणुक्षेत्रातील संस्थांच्या बाबतीत हेच झालेले आहे. अजूनही १९९८ च्या पोखरण अणुचाचण्यातील हायड्रोजन बाँबची चाचणी खरोखरीच यशस्वी झाली, की नाही यामध्ये खुद्द आपल्या अणुशास्त्रज्ञांमध्येच वाद आहे. गेल्या २१ वर्षांमध्ये भारत क्रायोजेनिक इंजिन निर्माण करू शकलेला नाही. भारतातील एकही शास्त्रज्ञ अजून तरी नोबेल पुरस्कार मिळवू शकलेला नाही. अणुऊर्जासुध्दा अशीच Holy Cow झालेली आहे. प्रत्यक्षात अणुऊर्जा हा बाटलीतील राक्षस आहे व तो विचार न करता बाटलीतून बाहेर न काढण्याची काळजी घेणे गरजेचे आहे. या राक्षसाचा वापर गरजेपुरताच व्हावा असे वाटते.

*(मासिक महाराष्ट्राचे उद्योगविश्व, मार्च २०११ मधून साभार)*

**विश्वास प्र. पिटके**
मो. ९०११०९२७८१, ९८५०९९५९६८
vishwas.pitke@gmail.com

■■



# अण्णा हजारे
# आँसू असली, रूमाल नकली

**मुझे अण्णा की ईमानदारी पर कोई शक नहीं है, उन्होंने अपने गाँव में बेहद अच्छा काम भी करके बताया है किंतु न्यायशास्त्र, अर्थशाश्त्र और लोकतंत्र के स्वाभाविक सिंद्धातों के प्रति उनके ज्ञान के स्तर और उनकी प्रतिबद्धता को लेकर मेरे गहरे संदेह है. वे महात्मा गांधी की तरह विदेशों में जाकर वहाँ की स्थिति का तुलनात्मक अध्ययन नहीं कर पाए और ना ही इस दौर के विश्व वंदनीय महान विचारकों का उनको सानिध्य मिला है. उनके नयी व्यवस्था के बारे में क्या विचार है, यह भी किसी को मालूम नहीं है. नतीजतन वे परिष्कृत नहीं बल्कि बेहद आक्रामक लगते है.**



**अ‍ॅड. दिनेश शर्मा**

इस समय सारा देश सतयुग की वापसी की खुशी का जश्न मना रहा है. कुछ ही दिनों में जंगल के सभी शेर, बाघ और चीते शाकाहारी हो जायेंगे, इस बात की घोषणा हर नुक्कड़ और पानठेले पर हो रही है. बेचारी गरीब बकरियाँ, हिरण, सांभर और जंगल के छोटे मोटे जानवर, जिनका कि आज तक जंगल के कानूनों के अनुरूप शिकार होता रहा है, एक नये जंगल सुधार कानून की आशा में बेधड़क बाहर आकर घूमने की योजना बना रहे है. सारा देश अण्णा हजारे के सामने सरकार के झुकने को देश की दूसरी आजादी मान कर झूम रहा है. नेताओं के प्रति जन सम्मान इतना नीचे गिर चुका है कि अण्णा के आंदोलन ने एक राष्ट्रीय ज्वार को जन्म दे दिया है.

ईलेक्ट्रानिक मिडीया ने अण्णा अण्णा के आंदोलन को एक महान भारतीय राष्ट्रीय आंदोलन के रूप में प्रस्तुत करने में कोई कसर नहीं रखी. अण्णा को दूसरा महात्मा गांधी बताया जा रहा है. सरकार के मुखिया का चेहरा तो पहले ही अपने भ्रष्ट सहयोगियों की करतूतों से झुका हुआ था ही, शेष बची कसर देश के गैरजिम्मेदार विपक्षी दल भाजपा की करतूतों ने पूरी कर दी. अण्णा और साख गमा चुके नेताओं के इस युद्ध में स्वाभाविक रूप से जनमत अण्णा के पक्ष में रहने ही वाला था. लोग सत्तापक्ष के ही नहीं विपक्ष के नेताओं के अपमान पर भी तालियाँ पीट रहे थे. जिसतरह सलीम जावेद लिखित सिनेमा में फिल्म का नायक जितनी क्रूरता से खलनायक को मारता पीटता है, उतना ही सामने वाले बेंच पर बैठे लोगों की सिटीयों और चीख पुकार से सिनेमा हॉल भर उठता था, कुछ यही हाल उन चार दिनों में सारे देश का हो चुका था. लोग सड़कों पर फटाके फोड़ रहे थे, मोमबत्ती मार्च निकाल रहे थे, एक दिवसीय उपोषण पर बैठकर अण्णा को साथ दे रहे थे और नेताओं को कोस रहे थे. अण्णा की इस जीत ने निश्चित रूप से देश की जनता के मन में छिपे आक्रोश को अभिव्यक्ति दी है.

किंतु क्या अण्णा ने भ्रष्टाचार के स्रोत को पकड़ने की वास्तव में कोई कोशीश की है? क्या अण्णा के पास समस्या का ईलाज है या वे भी हमें भविष्य में उतना ही निराश करेंगे जितना कभी जयप्रकाश नारायण के आंदोलन ने किया था? क्या अण्णा भ्रष्टाचार के इस फोड़े को काटकर फेंकने का माद्दा रखते है या बस देश की चेतना को हर स्तर पर ग्रस चुके इस नासूर की ऊपर ऊपर से मरहम पट्टी ही करना चाहते है और आने वाली नस्लों के लिये इससे भी बड़े आंदोलन की जरूरत को जिंदा रखना चाहते है? और सबसे महत्वपूर्ण बात, क्या अण्णा दूसरे गांधी हो सकते है?

दोस्तो! मैं अपनी पूरी ईमानदारी और विवेक बुद्धि के साथ, ईश्वर की शपथ लेकर यह कहना चाहता हूँ कि उपरोक्त चारों प्रश्नों में से किसी का भी उत्तर अण्णा के पक्ष में नहीं जाता. सबसे महान निराशा तो यह है कि उनके द्वारा बताये गये बीमारी के ईलाज, बीमारी से ज्यादा खतरनाक है. वे समाज के हर उत्पादक व्यक्ति के पीछे पहरेदार लगा देंगे. उनके विचारों का भारत कल यदि बन भी गया तो उसमें पत्रकारों, इंस्पेक्टरों, पहरेदारों या जासूसों की ही चाँदी रहेगी. समाज में काम करने को उत्सुक प्रत्येक व्यक्ति को पहले तो भ्रष्ट अफसरों, बाबूओं को रिश्वत खिलाकर अपने काम कराने होंगे और बाद में उस हो चुके काम की जाँच में उपरोक्त तत्वों को भी खुश करते रहना होगा. चोरों को पहले चोरी करने देना और फिर उनको पकड़ने में राष्ट्र की समूची उर्जा को झोँक देना, एक मात्र उद्योग बचा रह जाएगा. समाज की प्रतिभा और सारी उत्पादकता तमाम किस्म के पहरेदारों के लायसेंस लेते लेते समूल नष्ट हो जाएगी. देश में लोकतंत्र अपनी अंतिम साँसे गिनेगा और एक अभिजात्य सामंतवाद फिर से लौट

आयेगा जो बगैर किसी के प्रति उत्तरदायी रहे वास्तविक सत्ता का उपभोग करेगा.

मुझे अण्णा की ईमानदारी पर कोई शक नहीं है, उन्होंने अपने गाँव में बेहद अच्छा काम भी करके बताया है किंतु न्यायशास्त्र, अर्थशाश्त्र और लोकतंत्र के स्वाभाविक सिंद्धातों के प्रति उनके ज्ञान के स्तर और उनकी प्रतिबद्धता को लेकर मेरे गहरे संदेह है. वे महात्मा गांधी की तरह विदेशों में जाकर वहाँ की स्थिति का तुलनात्मक अध्ययन नहीं कर पाए और ना ही इस दौर के विश्व वंदनीय महान विचारकों का उनको सानिध्य मिला है. उनके नयी व्यवस्था के बारे में क्या विचार है, यह भी किसी को मालूम नहीं है. नतीजतन वे परिष्कृत नहीं बल्कि बेहद आक्रामक लगते है. महात्मा का प्रत्येक अनशन दूसरों को आत्म चिंतन के लिये मजबूर करने वाला था, जीवन के किसी न किसी उच्च से उच्चतर स्तर को छूने की प्रेरणा देने वाला था, वह किसी भी प्रतिद्विंदी को उसकी अपनी ईच्छा के विरूद्ध झुकाने के लिये नहीं था. महात्मा यह मानते थे कि हर अच्छे आदमी में कुछ बुराईयाँ होती है और प्रत्येक बुरा कहा जाने वाला व्यक्ति उच्च आदर्श के लिये प्रेरीत किये जाने पर बलिदान के लिये तैयार हो सकता है. नतीजतन उनके विरोधी उनकी बात को समझते थे और उनकी शख्सियत की तहे दिल से इज्जत करते थे. इसी महानता के बलपर उस महान फकीर ने प्रत्यक्ष सत्ता से दूर रहते हुए भी समाज के हर अंग में नये भारतीय नेतृत्व को जन्म देने का सामर्थ्य पैदा कर लिया था.

दूसरी ओर अण्णा का प्रत्येक अनशन कुछ चुने हुए नेताओ के विरूद्ध ही रहा है और वे स्वयं ही जाँच एजेंसी की भूमिका निभाते रहे है. अगर वे किसी को भ्रष्ट मान लेते है तो बात समाप्त, उस नेता को इस्तीफा देना ही पड़ेगा, देश की किसी भी जाँच एजेंसी का कोई भी निष्कर्ष उसे बचा नहीं सकेगा. इसतरह अपने अनशन का उपयोग उन्होने किसी महान आदर्श को पाने के लिये नहीं बल्कि अपने व्यक्तिगत प्रभाव और अंहकार को बढ़ाने के लिये ही किया है. देश के दुर्भाग्य से नेताओं की नैतिक शक्ति इतनी रसातल पर पहुँच चुकी थी कि किसी ने भी उनकी गैरसंवैधानिक सत्ता पर प्रश्नचिन्ह खड़े नहीं किये और एक के बाद एक कई नेता उनकी आक्रामक माँगों के सामने झुकते चले गये और अण्णा भ्रष्टाचार के विरूद्ध एक राष्ट्रीय प्रतीक की तरह उभरे. यह सच है कि हमारे अन्य संवैधानिक अंग भी इस बीच में भ्रष्टाचार से जर्जर हो चुके है. किंतु अण्णा नें उस जर्जरता का कोई कारण न खोजते हुए, स्वयं को कमजोर चरित्र के इन नेताओं का दुश्मन घोषित किया और देश की मूल संरचना में आयी खराबियों की चर्चा करने से बच गये. आज हर कोई उनके इस जश्न में नाच रहा है. कोई भी हमारी लोकतांत्रिक संस्थाओं में जड जमा चुके भ्रष्टाचार के कारणों की चर्चा नहीं कर रहा है. और इसीकारण इस भय के लिये पर्याप्त जगह है कि कल यह तथाकथित जीत भी जयप्रकाश नारायण की जीत वाले हश्र पर ही पहुँचेगी.

**अण्णा की जीत के मायने क्या है?**

अब थोड़ा गौर करके देख ले कि अण्णा जीत गये अर्थात जंतर मंतर पर घटा क्या है? वास्तव में अण्णा और सरकार जन लोकपाल बिल के ड्राफ्ट को लेकर आमने सामने थे. सरकार तो अपने हर बार के अंदाज में इस कानून को इतना ढीलाढाला बनाने पर तुली हुयी थी कि कोई मंत्री अपने जीवनकाल मे तो अपने गलत कामों की शायद ही कोई सजा पाता. किंतु अण्णा के या देश के गैर सरकारी संघठनों के जो सुझाव थे, वे भी कम हास्यास्पद नहीं थे.

अण्णा लोकपाल की नियुक्ति के लिये जनता और सरकार के नुमांइदों के एक समूह, जिसे कि कॅालेजियम कहा जाता है, की माँग कर रहे है. इस कॉलेजियम में नोबेल पुरस्कार प्राप्त भारतीय, समाज सेवक, साहित्यकार, अर्थशास्त्री, सर्वोच्च न्यायालय के सेवानिवृत न्यायाधीश, विरोधी पक्ष के नेता और सरकार के नुमाईंदे रहें, ऐसा सुझाव दिया गया.

अब थोड़ी देर के लिये नोबेल पुरस्कार प्राप्त भारतीयों के मसले पर गौर किया जाए. यह पुरस्कार एक विदेशी गैरसरकारी संस्था द्वारा जीवन के किसी न किसी क्षेत्र में विशिष्ट काम कर चुके व्यक्तियों को दिया जाता है. यदि पुरस्कार को ही नियुक्ति का एक मात्र पैमाना मान लिया जाए, तो इसका सीधा मतलब यह होगा कि हम भारतीय अपने आपको नियन्त्रिंत और सुधारित रखने के लिये किसी विदेशी पुरस्कार प्राप्त व्यक्ति की प्रतिक्षा करते रहेंगे. मान लो ऐसा कोई पुरस्कार किसी भारतीय को एक दो दशक तक मिला ही नहीं तो हम क्या बगैर सुधरे हुए ही बैठे रहेंगे? उससे भी बड़ा सवाल तो यह है कि यदि ऐसा व्यक्ति प्रशासनिक और राजनीतिक सुधारों का कखग भी नहीं जानता हो, तब क्या होगा? पिछले पाँच दशको में भारत में रहने वाले किसी भी भारतीय को यह पुरस्कार नहीं मिला है. तब क्या हम इस देश से दूर रहनेवाले अनिवासी भारतीयों से नियंत्रित होंगे? इस बात की क्या सुरक्षा है कि ऐसे व्यक्ति उनके निवासी देशों के हितों का विचार नहीं करेंगे? कल यदि कोई विदेशी शक्ति हमारे देश की सार्वभौमिकता को तोड़ना चाहे तो उसके लिये सर्वशक्तिसंपन्न लोकपाल पद का दुरूपयोग करना कितना आसान होगा?

रहा सवाल कलाकारों या साहित्यकारों का. तो इस सलाह पर एक ही उदाहरण पर्याप्त है. सरकार ने भारत कोकीला लता मंगेशकर और मशहूर चित्रकार मकबूल फिदा हुसैन को राज्यसभा में मनोनीत किया था. दोनो ने शायद ही कभी कोई प्रश्न पूछा हो या कभी वहाँ पर अपनी हाजरी लगाई हो. हम भी क्यों उनसे यह उम्मीद करें कि वे अपनी नैसर्गिक प्रतिभा का घर आंगन छोड़कर बिहार और ऊत्तरप्रदेश के बाहुबलियों के बीच बैठें या करोड़ो रूपयों के गबन कर चुके नेताओं के साथ किसी राष्ट्रीय मसले पर कोई सार्थक वार्तालाप करके उनका दिल दिमाग बदल डालें. किसी व्यक्ति के अच्छे कलाकार होने का उसके अच्छे प्रशासक होने से क्या संबंध है? क्या अर्थशास्त्र और प्रशासनीक योग्यता इतना सामान्य क्षेत्र है कि कोई भी कलाकार, समाज सुधारक या साहित्यीक, बगैर उस क्षेत्र की योग्यता हासील किये, उसमें महत्वपूर्ण भूमिका निभा लेगा?

अब शेष रहा मुद्दा सर्वोच्च न्यायालय के सेवानिवृत न्यायाधीशों का. अण्णा हजारे द्वारा सुझाए गये इसी कॉलेजियम के उपाध्यक्ष श्री शांति भूषण ने कभी कहा था कि देश की सर्वोच्च न्यायालय के आधे से अधिक न्यायमूतियों की ईमानदारी और अपने पद के प्रति ली गई प्रतिबद्धता की शपथ संदेह के घेरे में है. देश की सर्वोच्च न्यायिक संस्था के पास संविधान प्रदत्त असीमित शक्तियाँ पहले से मौजूद रही है. वह तो स्वयं, जब चाहे, किसी भी मुद्दे को अपनी इच्छा से उठाकर देश

की सरकार को जवाबदेह बना सकती है. ऐसे में जो न्यायमूर्ति सेवारत रहते कुछ भी नहीं कर पाये, वे अपनी पसंद का लोकपाल नियुक्त करके कौनसा तीर मार लेंगे?

इसतरह इधर उधर से जमा किये गये भानुमति के कुनबे जैसे लोग किसी महान भारतीय उद्देश्य को पूरा कैसे कर सकते है? सर्वशक्तिमान लोकपाल भ्रष्ट निकल गया तो देश का क्या होगा? आप कह सकते है कि फिर उसे हटाकर यह देश नये लोकपाल की नियुक्ति का खेल खेलेगा. जिस देश में राष्ट्रपति के पद पर ऐसे व्यक्ति पहुँच चुके हो, जिनका देश के सार्वजनिक जीवन में कभी कोई योगदान न रहा हो, जहाँ राज्यपाल अस्थिरता फैलाने के लिये ही नियुक्त किये जाते रहे हो, जहाँ देश की सर्वोच्च न्यायिक पीठ पर कीचड़ उछल चुके हो, उस देश में लोकपाल का चरित्र निष्कंलक रहेगा और वह आजीवन दूध का धुला ही रहेगा, इस बात का कोई कैसे दावा कर सकता है? सत्ता भ्रष्ट करती है और संपूर्ण सत्ता संपूर्ण रूप से भ्रष्ट करती है, यह एक युग सत्य की तरह माना जा चुका सिद्धांत है. हम प्रधानमंत्री, मंत्री, राज्यपााल और राष्ट्रपतियों से ज्यादा अधिकार जिस व्यक्ति के हाथों में सौंप रहे हो, सर्वोच्च न्यायालय के न्यायाधीशों से ज्यादा ताकत जिसको बहाल कर रहे हो, वह व्यक्ति देश की समस्त संवैधानिक सत्ता का केंद्र बनकर मनमानी नहीं करेगा, इस बात की जिम्मेदारी कौन लेगा?

**अण्णा के पिछले आंदोलन के परिणाम:**

अण्णा के पिछले आंदोलनों के कारण बने कानूनो से समाज को कितना फायदा या नुकसान हुआ है, जरा इस पर भी नज़र फिरा लें..

अण्णा ने समूचे महाराष्ट्र के गाँव गाँव में अपनी भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन समीति की शाखाएँ खोली है. इस समीति पर किसी की भी नियुक्ति अण्णा हजारे या उनके द्वारा चुने गये कॉलेजियम द्वारा नहीं हुई है. कोई भी व्यक्ति अपने गाँव, कस्बे या मुहल्ले में यह समीति खोल सकता है और अपने ईलाके का स्वयंघोषित अध्यक्ष बन सकता है. इस समीति के पदाधिकारी क्या काम करते है, कैसे अपना जीवन यापन करते है, कौनसी शैक्षणिक या नैतिक पात्रता रखते है, इस बात का कोई रिकार्ड स्वयं अण्णा भी नहीं बता सकते. इन समीतियों की कितनी बैठके होती है, कौन कौन से विषय उसमें उठाये गये है और वे किस अंजाम पर पहुँचे है, इसका भी कोई लेखा जोखा नहीं मिलता है. बस, वह समीति जिस किसी अधिकारी, रॉशन की दुकान, मिट्टी तेल या कूक्रींग गैस बेचने वालों के खिलाफ आवाज उठा दें, समझ लो कि उनकी शामत आ गई. नगर परिषद की सीमा में होने वाले बांधकाम, स्कूल कॉलेज की नियुक्तियों, जिल्हा परिषद के शिक्षकों के निवास से कार्य स्थल तक होने वाले अप डाऊन जैसे हर विषय पर, इसके पदाधिकारी प्रिंटेड लेटरहैड पर ज्ञापन निकालकर पत्रकारों को भेजते रहते है. वे इनके आधार पर समाचार बना बनाकर समाचार पत्रों के कॉलम भरते रहते है. छोटी छोटी गल्तियों का बाजार सजाया जाता है. आप समाचार पत्रों में भीतर के पन्नों की हेड लाईने पढ़ लिजीए. आपके ख्याल में आ जाएगा कि दूसरों की इज्जत से खेलना आज कितना बढ़ा व्यापार बन चुका है. पहले यह व्यापाार केवल पत्रकार और पोलिसवाले ही करते थे. अब अण्णा के एनजीओ इस कारोबार का नैतृत्व कर रहे हैं. वे समाज को निर्भय होकर जीने का मंत्र नहीं सिखा रहे बल्कि उन्होंने अपना भी आतंक समाज के पुराने भयों के साथ जोड़ दिया है. आप किसी सरकारी अधिकारी या इंस्पेक्टर को एक बार रिश्वत देकर शांति का सपना देख सकते है, किंतु भ्रष्टाचार निमूलन समीति का एक कार्यकर्ता यदि आप को छोड़ता है तो दूसरा चूसने को आ जाता है. भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन समीति के कितने ही कार्यकर्ता दूसरों के भ्रष्टाचार की पोल खोलने को एक नया व्यापार बना चुके है.

मैं जिस विद्यालय में बचपन में पढ़ता था उसके मौजूदा प्राचार्य श्री श्याम देशपांडे से मेरी मुलकात एक कार्यक्रम के दौरान हुई. उन्होंने मुझे बताया कि एक व्यक्ति सूचना अधिकार के नाम पर उनसे हर रोज कुछ न कुछ जानकारी माँगते रहता है. कभी वह बाहर गाँव से अप डाऊन करने वाले शिक्षकों की सूची माँगता है तो कभी विद्याालय में हुए बाँधकाम का खर्च बताने को कहता है. हर रोज सुबह अपने कार्यालय में पहुँचते ही कोई न कोई पत्र उनके सामने रख दिया जाता है. ऐसा ही अन्य महाविद्याालय के प्राचार्यो के साथ भी हर रोज हो रहा है. उन सभी लोगों के लिये अपने रोजमर्रा के काम करना मुश्किल होता चला जा रहा है. किसी भी संस्था के मुख्य कार्यकारी पद पर मौजूद व्यक्ति को कभी जातियवादी पक्षपातों के कारण परेशान किया जाता है तो कभी उस संस्था से अपेक्षित आर्थिक या अन्य सहयोग नहीं मिलने का बदला लिया जाता है. ऐसे लगता है मानो सारा समाज दूसरों की गल्तियाँ ढूँढने के एकमात्र उद्योग में लगा है. इसके नतीजे इतने भयानक है कि कोई भी व्यक्ति जवाबदेही से लिप्त मुख्य पद पर काम करने को तैयार ही नहीं है. लोग अपने शांत और गरीमापूर्ण जीवन के लिये ऐसी नियुक्तियाँ अस्वीकार कर रहे है. अण्णा के आंदोलन ने भारतीय सामाजिक व्यवस्था के अनेक स्तरों पर मौजूद भ्रष्टाचार को दूर तो किया ही नहीं है, बल्कि उन्होंने दलालों और लुटेरों की एक ऐसी नस्ल को जन्म दे दिया है, जिस पर किसी कानून का कोई नियत्रंण नहीं है. उनके बोतल से बाहर निकला यह जिन्न समाज में प्रत्येक व्यक्ति के आत्मसम्मान, मानसिक शांति और स्थैर्य तथा भयमुक्त जीवन की अपेक्षाओं को ग्रहण लगा चुका है.

**अण्णा और स्वतंत्रता :**

अण्णा के किसी भी आंदोलन में समाज को ज्यादा आजादी मिलें, सरकार या प्रशासन का मनुष्य के सामाजिक, आर्थिक और पारिवारिक जीवन में कम से कम हस्तक्षेप हो, अथवा लायसेंस, कोटा, परवाने और इंस्पेक्टर मुक्त भारत बने, ये माँगें नहीं उठती, बल्कि उनके प्रत्येक आंदोलन का सूर नये नये सख्त कानून और बेलगाम अधिकारप्राप्त पदों की रचना है. अण्णा ज्यादा स्वंतत्रता की बात नहीं करते बल्कि नयी किस्म की गुलामियों को समाज पर थोपना चाहते है. मौजूदा व्यवस्था ज्यादा सख्त नहीं है, यह उनकी परंपरागत शिकायत है. इसलिये वे और उनके कार्यकर्ता नैतिकता के ठेकेदार बनकर समाज को सुधारने के अपने स्वयंघोषित पवित्र उद्देश्यों की ओर प्रयाण कर चुके है. वे समाज को मुक्त नहीं, नियंत्रित करना चाहते है.

उनको इस बात से कोई मतलब नहीं है कि इस व्यवस्था में काम करना कितना मुश्किल है. समाजवादी समाज रचना के नशे में हमारे देश में पहले ही इतने कानून है और इतने इंस्पेक्टर है कि हमारे यहाँ अपना व्यापार शुरू करके जीवनयापन करना मानो राष्ट्रविरोधी कृत्य माना जाता है. हमारे युवा ऐसे जटील और रूग्ण वातावरण में अपने जीवन

की आधारशीला रखने जा रहे है. उनकी गल्तियों का शोषण करने वाली नयी नस्ल को जन्म देने से कोई भी समाज बच नहीं सकेगा बल्कि लोग यह देश ही छोड़कर भाग जाएँगे और उन्हें जहाँ ज्यादा आजादी हासिल होगी वहाँ जाकर कोई काम धंदा करना शुरू कर देंगे. या फिर चारो ओर से निराश होकर अपनी जीवन लीला ही समाप्त कर लेंगे.

अण्णा हजारे जैसों के युक्तिवाद हम यदि मान लें तो समाज में सबसे सुरक्षित व्यापाार केवल और केवल दूसरो पर चौबीस घंटों नजर रखने का ही बचेगा. एक पूरी तरह से अनुत्पादक समाज आपस में लड़ मिटेगा. समाज को बचाने का मतलब ही उसकी प्रतिभा और उद्यमशीलता को प्रेरीत करना होता है. ऐसा कोई भी व्यक्ति, जो आर्थिक उत्पन्न का कोई भी काम नहीं करता हो, अपना और अपने परिवार का पेट भरने का उद्योग नहीं करता हो उसे समाज में किसी भी स्तर पर कोई सम्मान नहीं मिलना चाहिये. समाज को यदि कोई कानून चाहिये तो वह बस यही कि कोई भी गैरसंवैधानिक सत्ता केंद्र लोगों के नैतिक या व्यवहारिक जीवन के रास्ते में रूकावटें न डाल सकें, किसी भी तथाकथित प्रवित्र उद्देश्य का नारा देकर उनका शोषण न कर सकें.

**शक्ति का स्रोत क्या हो?**

लोकतंत्र में नेताओ को शक्ति बैलेट बाक्स से मिलती है, अर्थात अंतिम रूप से नेताओं की किस्मत का फैसला जनता ही तय करती है. इसी जादू के बल पर कभी इंदिरा गांधी को जनता ने ठुकरा दिया था तो कभी लालू यादव जैसों के अभेद्य दुर्ग ध्वस्त कर दिये गये थे. इसी रहस्यमयी शक्ति के बलपर जनता नरेंद्र मोदी जैसो को देश के लगभग सभी गैरसरकारी संघठनों द्वारा मानवता का दुश्मन घोषित कर ठुकरा दिये जाने के बावजूद गुजरात का भाग्यविधाता बना देती है और नितिशकुमार जैसे शालीन व्यक्ति को आधुनिक बिहार के निर्माण का जिम्मा सौंपती है. लोकतंत्र दुनिया की सबसे महान शासन पद्धति नहीं है किंतु हर हाल में अभी तक उससे श्रेष्ठ पद्धति का जन्म होना शेष है. पत्रकार, जासूस या पहरेदार दूसरों के गुनाह पकड़ते है तब तक ठीक है, किंतु वे हमारे नेताओं से अच्छे नेता साबित हो सकते है, इसकी गॅरंटी तो भगवान भी नहीं दे सकता है.

अण्णा जिस सर्वशक्ति संपन्न कॉलेजियम की बात कर रहे है और हर भ्रष्टाचारी को फाँसी पर लटकाने की बात कर रहे है, वैसे ही कॉलेजियम ने और ऐसी ही सजाओं ने सोव्हियत रूस को सात दशको तक अपनी गिरफ्त में जकड़ रखा था. जब तक यह देश जागता तब तक नेस्तनाबूद हो चुका था. देश के ज्यादातर प्रतिभाशाली लोग या तो मारे जा चुके थे या देश छोड़कर भाग चुके थे. अमीर घरों की महिलाएँ वेश्यावृति के लिये मजबूर थी और देश की अर्थव्यस्था बरबाद हो चुकी थी. ऐसे ही कॉलेजियम ने चीन को बरबाद किया और पोल पोट के नैतृत्व में कंबोडिया को रक्तरंजित क्रांति में झोंककर देश के बीस लाख लोगों की जाने ले ली थी. यदि कॉलेजियम द्वारा नियुक्त लोकपाल सत्ता के सभी अंगों पर शासन करने लगेगा तो मुख्य शक्ति जनता के हाथ से निकल कर कुछ गिने चुने अभिजात्य किस्म के नैतिकतावादियों के हाथ में चली जायेगी. नेता भ्रष्ट हो सकते है अपराजेय नहीं होते. दुनिया को मुख्य खतरा या तबाही की आशंका सदा अपराजेय लोगों से रही है. देश के सर्वोच्च न्यायालय के ऐसे ही एक अपराजेय न्यायाधीश ने अपने पुत्र के बांधकाम व्यवसाय को सहारा देने के लिए कभी दिल्ली की अवैध कॉलानियों पर बुल डोजर चलवा दिये थे. अण्णा हजारे के ही कॉलेजियम के एक सहयोगी प्रंशात भूषण ने इस मामले को उठाकर देश को बता दिया था कि देश की सबसे मजबूत समझी जाने वाली ईमारत की नींव कितनी खोखली है.

**निदान क्या है?**

आज जरूरत हमारे लोकतंत्र को और भी मजबूत करने की है. हमारी चुनाव पद्धतियों में बदलाव करके शासन में ज्यादा से ज्यादा लोगों की भागीदारी सुरक्षित करना वक्त की माँग है. जन पर तंत्र का शासन न होकर तंत्र पर जन का दबाव हो ऐसी प्रणाली की ओर बढ़ना भविष्य के लिये नितांत आवश्यक है. हमारा मौजूदा लोकतंत्र आनुपातिक मतदान को मान्यता नहीं देता बल्कि सभी उम्मीदवारों में से एक वोट ज्यादा पाने वाले को प्रतिनिधी बनने का अवसर देता है. यह चुनाव पद्धति बहुमत को सत्ता से वंचित रखती है और सर्वसमावेशक नहीं है. हमें गंभीरता से आनुपातिक मतदान प्रणाली की ओर कदम बढ़ाने चाहिये.

हमने आजाद भारत को ब्रिटीशकालीन कानूनों से जकड़ कर रखा है. ये सभी कानून हमारे स्वांतत्रय समर के शहीदों का अपमान कदते है. हमने अब तो भी इन सभी मौजूदा कानूनों की समिक्षा करना चाहिये. व्यक्ति की गरिमा और आजादी से खिलवाड़ करने वाले सभी कानूनो का समूल उच्चाटन, आज राष्ट्रीय प्राथमिकता सूची में अग्रक्रम पर होना चाहिये. अमेरिका में हुई साफ्टवेअर क्रांति ने हमारे युवाओं की एक पूरी नस्ल को नब्बे के दशक में रोजगार देकर बचा लिया था. हरबार आपको बचाने का ठेका पश्चिम वाले नहीं लेंगे. वहाँ भी राज ठाकरे जैसी स्थानीय मानसिकता वाले नेता पनप रहे है.

लोगों को ज्यादा से ज्यादा मुक्त किये बगैर एक सौ इक्कीस करोड़ भारतीयों का पेट भरना मुश्किल बनने वाला है. हमें नये किस्म के दलाल नहीं बल्कि नयी सोच के उद्यमी चाहिये. आनेवाली सदी में वे ही देश का नैतृत्व करेंगे.

अण्णा के आँसू असली हो सकते है, किंतु जिस रूमाल से वे देश के आँसू पोछने निकले है, वह हमारे मुँह पर कालीख पोतने वाला है. यह महान देश जितनी जल्दी इस सच्चाई को समझ लेगा उतना ही ज्यादा सम्मानजनक भविष्य की ओर बढ़ता चला जायेगा.

**- ॲड. दिनेश शर्मा**
पुलगाँव, जि. वर्धा महाराष्ट्र.
मो. ९३२६८४१९२४
dgsharma07@gmail.com

■■

# अण्णा, सेवाग्रामला या! दारूने आंघोळ करू...



गंगाधर मुटे

आदरणीय अण्णा,

आपण जनलोकपाल विधेयकाच्या मागणीसाठी केलेले उपोषण खूप गाजले. चार दिवस सलगपणे विविध वृत्तवाहिन्यांवर अण्णा आणि त्यांचे उपोषण हा एकच विषय गाजत होता. वृत्तपत्राचे रकानेच्या रकाने भरून आले. इंटरनेटवरही या विषयाची खूप चर्चा झाली. जगाच्या कानाकोपऱ्यातून पाठिंबा जाहीर करण्यात आला. फ़ेसबूकवरून वेगवेगळ्या तऱ्हेने समर्थन व्यक्त केले गेले. सार्वजनिक संकेतस्थळावर घमासान चर्चा झडल्यात. अनेकांनी आपापल्या ब्लॉगवरून या आंदोलनाची दखल घेतली. शेतकरी संघटनेच्या औरंगाबादला झालेल्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत या भ्रष्टाचारमुक्ती अभियानाला सक्रीय पाठिंबा देण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला आणि सेवाग्राम येथील बापू कुटीसमोर सर्व कार्यकर्त्यांच्या समवेत लाक्षणिक उपोषण करून जनलोकपाल विधेयकाला समर्थन देण्याचे भाग्य आम्हालाही लाभले.

या विधेयकाच्या समर्थनार्थ संपूर्ण देशातला आमआदमी लढण्यासाठी मैदानात उतरला असला तरी त्यातील किती लोकांना जनलोकपाल विधेयक कितपत कळले हे सांगणे कठीण आहे; पण भ्रष्टाचारावर इलाज व्हायलाच हवा. काहीच न करण्यापेक्षा, काहीतरी करणे कधीही चांगले एवढाच विचार करून आणि प्रथमच भ्रष्टाचाराच्या विरोधात आपला रोष व्यक्त करण्याची संधी उपलब्ध झाल्यामुळे देशभरातली एवढी आमजनता रस्त्यावर उतरायला तयार झाली असणार, हे उघड आहे.

भ्रष्टाचाराचा महाभयंकर राक्षस आटोक्यात येण्याऐवजी वणव्यासारखा पसरून दिवसेंदिवस अधिक उग्र रूप धारण करत आहे. त्यात आमजनता होरपळून निघत आहे. जगणे मुश्किल, मरणे मुश्किल अशा दुहेरी कैचीत आम जनता सापडली आहे. या सर्व प्रकारात राजसत्ताच एकतर स्वत: लिप्त आहे किंवा खुर्ची वाचविण्याच्या मोहापायी हतबल होऊन डोळेझाक करत आहे, भ्रष्टाचाऱ्यांना पाठीशी घालत आहे, हे आता जनतेला कळायला लागले आहे. त्यामुळे त्यांना संताप व्यक्त करण्यासाठी लढायला एक भक्कम आधार हवा होता; तो त्यांना तुमच्यात दिसला म्हणून आम आदमी नेहमीच्या कोंडलेल्या भिंती ओलांडून बाहेर पडला. त्यासाठी अण्णा तुमचे लक्ष-लक्ष अभिनंदन आणि कोटी-कोटी धन्यवाद!

**अभियान नव्हे जनचळवळ**

भ्रष्टाचार मुक्ती अभियान आता नुसते अभियान राहिले नसून एक जनचळवळ होऊ पाहत आहे. योग्य मुहूर्तावर, योग्यस्थळी या चळवळीची मुहूर्तमेढही रोवली गेली आहे; पण ही चळवळ पुढे न्यायची तर यापुढची वाटचाल नुसती सात्त्विक अथवा भावनिक असून भागणार नाही तर त्यासाठी तर्कसंगतीची जोड लागेल, अभ्यासपूर्ण वास्तवाचे भान लागेल. करावयाच्या उपाययोजनांची नेमकी जाण लागेल. त्यासाठी तुम्हाला या लढाईसाठी त्या तोडीचे सवंगडीही शोधावे लागेल. कारण चित्रविचित्र विचारधारा जोपासणारे अनेक विचारवंत एकत्र येणे सोपे असते पण उद्दीष्ट साध्य होईपर्यंत एकत्र टिकणे महाकठीण असते. त्यांच्यात आपसातच फार लवकर पोळा फुटायला लागतो, हा पूर्वानुभव आहे.

अण्णा, जेव्हा तुम्हाला नगर जिल्ह्यातसुद्धा पुरेशी प्रसिद्धी मिळाली नव्हती तेव्हापासून तुम्हाला मी ओळखतो. तुमच्या कार्यशैलीवर मी तसा बारकाईने लक्ष ठेवून आहे. या देशातल्या सबंध गरिबीवर मात करता येईल असा काही कार्यक्रम तुम्ही हाती घ्याल, अशा आशाळभूत नजरेने मी तुमच्याकडे सदैव पाहत आलोय; पण माझी निराशाच झाली हे मी नाकारण्याचे काहीच कारण नाही. तुमच्या कार्याचे मोल कमी आहे असे मला म्हणावयाचे नाही आणि जेव्हा देशभरातून तुमच्या कार्याचा गौरव होत असताना माझ्यासारख्या एका फाटक्या माणसाने एक वेगळाच सूर काढणे हेही शोभादायक नाही; पण तुम्ही दाखवलेल्या मार्गाचे अनुकरण करून या देशातल्या लक्षावधी खेड्यांमधल्या एकाही माणसाला दुसरा अण्णा बनून आपल्या गावाचे राळेगण सिद्धी करता आलेले नाही. अगदी मलासुद्धा तुमचा कित्ता गिरवून माझ्या गावाचे रुपांतर राळेगण सिद्धीसारख्या गावामध्ये करता आलेले नाही.

**एवढे अण्णा कुठून आणायचे?**

अण्णा, एकेकाळी क्रिकेटमध्ये भारतात वेगवान गोलंदाज ही दुर्मिळ गोष्ट होती, पण कपिलदेव आले आणि मग त्यांचे अनुकरण करून मोठ्या प्रमाणावर वेगवान गोलंदाज तयार व्हायला लागलेत.

ज्याला भारतरत्न म्हणून गौरविण्यात केंद्रसरकारने चालढकल चालविली त्या सचिन तेंडुलकरने तर फलंदाजीची व्याख्याच बदलून टाकली आणि सचिनचे अनुकरण करून गावागावात चेंडू सीमापार तडकवणारे फलंदाज तयार झालेत.

सर्व रोगावर रामबाण इलाज म्हणून प्राणायाम आणि योगाभ्यासाचे धडे स्वामी रामदेवबाबांनी दिले आणि अल्पकाळातच जनतेने अनुकरण केले आणि देशभरात हजारो रामदेवबाबा तयार झालेत.

शेतकऱ्यांचे मरण हेच सरकारचे धोरण असून शेतमालास रास्त भाव मिळत नाही म्हणून शेतकरी कर्जबाजारी झाला त्यासाठी भीक नको घेऊ घामाचे दाम असा मंत्र शरद जोशींनी दिला आणि पिढ्यान्‌पिढ्या हतबलपणे जगणारा शेतकरी खडबडून जागा झाला.

शरद जोशींचे अनुकरण करूनच गावागावात लढवय्ये शेतकरी तयार झालेत.

याउलट संपूर्ण देशातील खेड्यांची राळेगण सिद्धी करायचे म्हटले तर त्यासाठी काही सरकारी ठोस योजना बनत नाही कारण कदाचित ती अव्यवहार्य असेल. मग सरकारी तिजोरीतून गंगाजळी आपापल्या गावापर्यंत खेचून आणायची तर प्रत्येक गावात एकेक अण्णा हजारे जन्मावा लागेल आणि अशी कल्पना करणेसुद्धा अशास्त्रीय आणि अव्यवहार्य आहे.

अण्णा, आपला देश हा नेहमीच चमत्कारिक व्यक्तिमत्त्वाच्या मागे धावणारा आणि व्यक्तीपूजक राहिला आहे. त्यामुळे एखाद्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची आणि त्याच्या कार्याची व्यावहारिक पातळीवर चर्चा करणे एकतर मूर्खपणाचे मानले जाते किंवा निषिद्धतरी मानले जाते. त्यामुळे बाबा आमटे, अभय बंग, अण्णा हजारे किंवा सिंधुताई सपकाळ ही व्यक्तिमत्त्वे उत्तुंग असली तरी यांच्या कार्यामुळे एकंदरीतच समाज रचनेवर, संस्कृतीच्या उत्क्रांतीवर, प्रशासकीय यंत्रणेवर आणि नियोजनकर्त्या निगरगट्ट राज्यकर्त्यांच्या धोरणांवर काहीही प्रभाव पडत नाही, हे सत्य असूनही कोणी स्वीकारायला तयार होत नाही.

**पान ३० पाहा**

# सोडा लोकपाल करा प्रतिपाल

**लाच द्यावी लाच घ्यावी ।**
**करून घ्यावे काम ।।**
**आपुल्या घरच्या सुखासाठी हो ।**
**गोळा करावा दाम ।।**
**रामानेही स्वतः म्हणावे ।**
**हे राम, हे राम, हे राम ।।**
**अमंगलाचे पाहुनी मंगल ।**
**जना फुटावा घाम ।।**

खरं खरं करायला लावणारे खर नामक संवत्सर आता सूरू झाले आहे. संवत्सराच्या आरंभीचा हा काळ किती सुंदर उजाडला आहे, ते एकदा आठवा! गेले संवत्सर संपले ते संपूर्ण भारतवर्षाला क्रिकेटमध्ये जिंकलो याचा आनंद देऊन. 'अन्न, वस्त्र, निवारा यापेक्षाही क्रिकेटचा डाव खरा' हे आम्ही मागे बोलून ठेवलेले ब्रह्मवाक्य साऱ्या उपाशीजनांनी ढेकरा देऊन खरे केले तर अभिजनांनी कूस बदलून सट्टा बाजाराचे कौतूक केले. वर्षाअखेरीस लोडशेडिंगसुद्धा कमी होते, कारण स्वर्गलोकात वरुण राजालाच साक्षात कोणीतरी योग्य तो वशिला लावून प्रथा परंपरांचे पालन करून भरपूर दक्षिणा गेल्याच ज्येष्ठात दिलेली होती, त्यामुळे त्यांनी सबसिडी म्हणून भरपूर वृष्टी केल्याने विद्युतदेवतेलासुद्धा अवसान आले होते. याच वर्षात जी काही कसण्यायोग्य भूमी उरली आहे तिनेही आपला अंतिम काळ जवळ आला आहे हे जाणून घेतल्याने सारवासारव म्हणून रब्बीला आहे तेवढा गहू पिकवून दिला होता. हे सगळे आनंदी आनंद गडे चालू होते आणि अचानक कुठले कोण ते अण्णा नामक लघुनायक उठले आणि जनकल्याण झालेच पाहिजे ही बोंब मारत थेट दिल्लीला जाऊन उपोषणाला बसले. अण्णांचा हा फास्टरूपी फंडा आवडला तो फक्त तरुणवर्गाला. या अण्णांची आणि तरुणवयीन मुला-मुलींची मानसिकता सारखीच आहे. तरुणांच्या या वयात निरनिराळी स्वप्ने येतात आणि त्या स्वप्नांतूनच चांगल्या भविष्याची कल्पना ते करतात म्हणे, तर अण्णा मात्र उत्तर प्रौढ अवस्थेतही चांगले काही घडेल पुढे ही स्वप्नमालिका पाहत वेडाचार करीत राहतात. हे सगळे आहे आणि म्हणूनच अण्णा आपले गेले आणि थेट सलग चार दिवस उपोषण करत बसले. या उपोषणामागे त्या अण्णाला कोणी उचकवले होते ते माहिती नाही; परंतु व्यवस्था बदलू असे आश्वासन मात्र त्यांना मिळाले. अशक्य ते काय म्हणजे ते आश्वासन आहे. या आश्वासनाची लेखी हमी जेव्हा या लघुनायकाला दिसली त्यातून जर काही घडले तर काय घडेल याचा अंदाज आम्ही घेताना आम्हाला आधी त्या प्रस्तावित जनलोकपाल या शब्दाचा अर्थ शोधावा लागला. तेव्हा असे सापडले, की लोकपाल हे नाम अशा व्यक्तीला बहाल केले जाते जो देवतारूप असतो आणि जनकल्याणासाठी ज्याची अवतारकृती असते. हे लोकपाल म्हणजे दिक्पाल म्हणजेच दिशापालक अर्थात अष्ट दिशांचे स्वामी. या लोकपालांत कुबेर, इंद्र, शिव, वरूण अशा साऱ्या देवता असायच्या. आता म्हणूनच या लोकपालांचे अवतार कोण हे आधी शोधणे गरजेचे आहे, असे एक संस्कृतीअभ्यासक म्हणून आमचे ठाम मत आहे. आमचे हे ठाम मत दयासिंधू अण्णामहाराजांना कळाले तर बरेच आहे आणि नाही कळाले तरी आम्हाला हे माहिती आहे, की हे विधेयक जेव्हा जनसामान्यांना वाचायला मिळेल तेव्हा ते हेची फळ मम तपाला या आनंददायी दुःखवचनाला कुरवाळत विकासाचा रेटरेस पुन्हा पुन्हा पाहत बसतील. खरे पाहिले तर जीवन जगण्याच्या नियमीत पद्धतीत कळीकाळातील एकच श्लोक जगण्याची समृद्धी देत असतो. तो श्लोक असा :

**लाचेचे धन एक तृप्त जीवन ।**
**काम होईल हे नक्की मान ।।**
**लाचेच्या धनात चमत्कार सारा ।**
**सारेच खुलती रोजचा खरारा ।।**

किती छान दैनंदिन उपदेश आहे हा या सोप्या उपदेशाऐवजी अण्णासाहेबांनी नितीमान राष्ट्र घडविण्याचा जो संकल्प विनाकारण सोडला आहे तो फार चुकीचा आहे असे साऱ्या एकांतप्रिय महानायकांचे अंतिम मत आहे. संपूर्ण देशाला नियंत्रणात ठेवणारा लोकपालरूपी देवावतार आताच कसा काय प्रगट होऊ शकेल याचा कोणी विचार केला आहे काय? देवावतार होण्यासाठी अतिशय अराजक माजणे गरजेचे आहे, अनाचार फोफावणे गरजेचे आहे, पतिव्रतेने व्याभिचार केला पाहिजे, तृतीयपंथीयांनी पुरुषार्थ शिकविला पाहिजे असे आधी घडावे लागते. हे आणखी सुरू झाले नसून आता आता कुठे जराजर्जर वृद्धाने कोवळ्या बालकांवर अनाचार करणे सुरू झालो आहे. गोंधळाच्या परिस्थितीचा पहिलाच टप्पा चालू असताना एकदम भ्रष्टाचाराचा संपूर्ण विकास झाला ही बोंब मारणे चुकीचे आहे असे आमचे मत आहे. आमच्या मताला पुष्टी देण्यासाठी म्हणून काल परवाच एका कोट्यधीश मात्र दारिद्र्यरेषेखाली असलेल्या निराधार योजनेच्या एका लाभार्थ्याने आपला मासिक पगार डोनेशन म्हणून देऊ केला आहे. अशी संवेदनशील व्यक्तीमत्त्वे समाजात आजही वावरत आहेत, जे सदाचारी आहेत. या अशा आणि इतर चांगल्या सद्वर्तनी मंडळींना अण्णासाहेब सरसकट भ्रष्टाचारी मानतात आणि अशी तरतूद मागतात, की भ्रष्टाचाराशी संबंधित कुठल्याही प्रकरणाचा तपास एका वर्षाच्या आत पूर्ण करून संबंधित आरोपीला दोन वर्षांसाठी कारागृहात पाठवावे. ही किती चुकीची मागणी आहे याची अण्णासाहेबांना कल्पना आहे काय? अहो अण्णा एकतर कोणताही लोकसेवक



**शे.भ.प.** (शेती भक्त परायण)
**-'थंडा' महाराज देगलूरकर**

भ्रष्टाचार करतच नाही. तो अगदी निती-नियमाने आणि कायद्याने जगत असतो, असे कायद्याने जगत असताना त्याला त्याच्या पदसामर्थ्यामुळे जे पदवैभव प्राप्त होते त्यातूनच पदलाभ होत असतात. या पदलाभाला तुम्ही भ्रष्टाचार म्हणता ते चुकीचे आहे, कारण संपूर्ण जगात अशी कोणतीही लोकसेवा नाही ज्यातून सेवावैभव प्राप्त होत नाही. खरे तर अण्णासाहेबांनी केंद्रात रक्षकाची सेवा केली आहे. त्यांनी निष्ठेने सेवा केली नसावी. अन्यथा त्यांनाही सीमेवरील सेवाकाळातील 'बाईट सिस्टीम'चे अनुषंगिक फायदे कळाले असते. हे निरिक्षण जरी मान्य नसले तरी एखाद्याने भ्रष्टाचार केला असे गृहीत धरले आणि त्याला शिक्षा द्यायची असे ठरवले तर त्या आधीची चौकशी एका वर्षात पूर्ण कशी होऊ शकते याचा अण्णामहाराजांनी विचार केला आहे काय? मूळात एखाद्याच्या संपूर्ण सेवाकाळात पैस खायचे पद फक्त काही वर्षांसाठी मिळते तर ते पैसे एकट्याला कोणी खाऊ देत नाही. आता तर खंडणीचा अधिकार असलेले कार्यकर्तेही यात वाटा मागत आहेत. या पदावर जायला एखाद्याला आधी बदलीपूर्व काळात धनपेरणी करावी लागते. ही पेरणी योग्य त्या मूल्यवान बियाणांनी झाली, की मग कोठे इवली इवली रोपं डौलू लागतात. हे पिक भरघोस येते ते तीन वर्षांसाठी. या त्रैवार्षिक सुगीतूनच पुढे आयुष्यभर जे काही गोळा होत जाते. त्याची चौकशी किमान २५ वर्षे केली पाहिजे या उदात्त कल्पनेला अण्णांनी मान्य करणे हे सहस्रमूल्यी आवाहन करावे वाटते, कारण,

**जो तो चोरटेपणी खातोच पैसे**
**कळू देतो फक्त एकदोघासे**
**बेनामी प्रॉपर्टी ठेवतो गावोगावी**

**ही मालमत्ता कशी मोजावी?**

हा एक यक्षप्रश्नही या मागे आहे. तर सरकारी तिजोरीला जो फटका एखाद्यामुळे बसला तर तो दोषी व्यक्तीकडून वसूल करावा असे अण्णांचे मागणे आहे हे कळाल्याने आम्हाला अतिशय हर्ष झाला. या हर्षामागचे कारण हे आहे, की या पृथ्वीवर वळवळणाऱ्या जीवजंतूंपैकी बुद्धी असलेला जीव म्हणजे मानवजात आहे. या मानवजातीत चतूर असलेली जमात म्हणजे लोकसेवक आहे. या लोकसेवकांची लोकांवर एवढी धूर्त निष्ठा आहे, की ही मंडळी सरकारी तिजोरीला कधीही फटका बसू देत नाही. ही फटका देते ती फक्त वार्षिक उद्दीष्टातील काल्पनिक आकड्याला. या काल्पनिक आकड्यामागे एक वृथा कल्पना आहे. या कल्पनेला विकास असे म्हणतात. या कल्पनेचा जो अंतरात्मा आहे तो सारखा सुचवित असतो,

**स्वविकासाशिवाय काहीही खरे नाही ।**
**गाव सुधारणे हेही बरे नाही ।।**
**घ्यायची आहे बायकोसाठी एखादी उंची गाडी ।**
**तिच्या हौसेनंतर कदाचित रूसेल तीही 'माडी' ।।**
**सावधपणे खाऊन घे, मिळतील तेवढे पैसे ।**
**लक्ष येतील अण्णा, बिघडवतील काय अन् कैसे ।।**
**विकास करवून घे तू आपला एकट्याने ।**
**कारण हाच नाही येणे मात्र आहे ते खर्चणे ।।**

**- शे.भ.प. 'थंडा' महाराज देगलूरकर**
**मु. पो.** thandamaharaj@gmail.com

■■

---

**पान २८ वरून पुढे**

**जनलोकपाल विधेयक**

अण्णा, जनलोकपाल विधेयक यायलाच हवे. त्यासाठी तुमच्या समर्थनार्थ मी माझ्यापरीने यथाशक्ती प्रयत्न करणारच आहे. पण या विधेयकामुळे काही क्रांतीकारी बदल वगैरे घडून येतील, या भ्रमात मी नाही. मानवाधिकार आयोगाचा फायदा कसाबला झाला; पण या देशातल्या कष्टकरी जनतेला वेठबिगारापेक्षाही लाजीरवाणे जीवन जगावे लागते, शेतकऱ्यांना आयुष्य संपायच्या आतच आपली जीवनयात्रा संपवावी लागते. देवाने दिलेल्या आयुष्यभर जगण्याच्या त्याच्या अधिकाराचे रक्षण करण्यास मानवाधिकार आयोग कुचकामी ठरला आहे. माहितीच्या अधिकाराचा उपयोग या देशातल्या सव्वाशेकोटीपैकी फक्त मूठभर लोकांनाच झाला. त्यामुळे तुम्ही ज्या मार्गाने वाटचाल करताहात त्यामुळे आमजनतेचे फार काही भले होईल असे मला वाटत नाही.

अण्णा, तुम्ही ३-४ दिवस दिल्लीला उपोषण केले आणि आम जनतेच्या नजरेत हिरो झालात. कदाचित हिच आम जनता तुम्हाला एक दिवस महात्मा म्हणून गौरवायला मागेपुढे पाहणार नाही. तुमच्या समर्थनार्थ मैदानात उतरायला लागलीच आहे. त्यामुळे मूठभर लोकांच्या नव्हे या आमजनतेच्या आयुष्यात सुखाचे आणि सन्मानाचे काही क्षण निर्माण होण्यासाठी तसे थेट प्रयत्न करणे ही आता तुमची जबाबदारी आहे. त्यासाठी नुसती सात्त्विक अथवा भावनिक आंदोलने करून भागणार नाही तर त्यासाठी तर्कसंगतीची जोड लागेल, अभ्यासपूर्ण वास्तवाचे भान लागेल. करावयाच्या उपाययोजनांची नेमकी जाण लागेल. त्यानुरूपच पुढील वाटचाल करावी लागेल.

अण्णा, तुमचा कायद्यावर प्रचंड विश्वास आहे ही चांगली गोष्ट आहे. पण कायद्याने सगळे प्रश्न सुटत नाहीत, हेही लक्षात घ्यायला हवे. कायदा करून उपयोगाचा नाही त्याची अंमलबजावणी व्हायला हवी. दुर्दैवाने कायद्याची नीट अंमलबजावणी होत नाही, नाही तर आहे तेच कायदे खूप आहेत. त्यामुळे प्रत्येक समस्येचे निराकरण करण्यासाठी पुन्हा नवा कायदा किंवा विधेयक हे काही रामबाण औषध ठरू शकत नाही.

याउपरही तुम्हाला कायदा आणि विधेयके आणली म्हणजे प्रश्न चुटकीसरसी सुटतात, असे वाटत असेल तर मग या वर्धेला. हा जिल्हा महात्मा गांधीजींच्या पावन स्पर्शाने पवित्र झाल्यामुळे फार पूर्वीपासून येथे संपूर्ण जिल्हाभर कायदेशीर दारूबंदी आहे; पण याच जिल्ह्यात पावला पावलावर हवी तेवढी दारू, अगदी ज्या पाहिजे त्या ब्रँडमध्ये उपलब्ध आहे आणि गावठीही मुबलक उपलब्ध आहे.

नाही खरे वाटत? मग या सेवाग्रामला बापू कुटीसमोर. येताना एकटेच नका येऊ, हजारो कार्यकर्त्यांसह या आणि येथे दारूनेच आंघोळ करा. हजारो लोकांना आंघोळ करायला पुरून उरेल एवढी दारू एकटे सेवाग्राम हे गावच पुरवेल, याची मला खात्री आहे.

कायद्याच्या राज्याचा विजय असो!

**गंगाधर मुटे**
आर्वी छोटी - ४४२३०७, तह. हिंगणघाट, जि. वर्धा.
gangadharmute@gmail.com
मो. ९७३०५८२००४

■■

# शेतकरी संघटनेतर्फे घटनेच्या प्रतिकात्मक प्रतीचे दहन



भारतीय राज्य घटनेतील बदल नव्या शेतकऱ्यांच्या हिताविरोधी आहेत, त्यातून शेतकऱ्यांवर अन्याय झालेला आहे, असा आरोप करीत शेतकरी संघटनेतर्फे भारतीय घटनेच्या परिशिष्ट ९ च्या प्रतिकात्मक प्रतिचे दहन करण्यात आले. यावेळी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रवि देवांग यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते. शेतकरी संघटनेतर्फे सकाळी ११ वाजेच्या सुमारास परिशिष्ट ९ च्या प्रतीचे दहन करण्यात आले. शेतकऱ्यांना कुठलाही लाभ मिळत नाही. याचे हेच कारण असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान पोलिसांनी या आंदोलन प्रकरणी २१ शेतकऱ्यांना प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून अटक करून त्यांची सुटका केली. घटनेतील पहिल्या दुरुस्ती (१९५२) अन्वये परिशिष्ट (९) नुसार शेतकऱ्यांना मालमत्ता संपादन करण्याचा मूलभूत अधिकार नाकारला आहे. मालमत्तेच्या व्यवहारांवर राज्यसत्तेचे नियंत्रण आले. शेतकरी नाममात्र मालक ठरला. घटनेतील दुरुस्ती (१९५५) अन्वये जीवनावश्यक वस्तू कायदा लादून शेतकऱ्यांच्या नैसर्गिक बाजारपेठांमध्ये हस्तक्षेप करून, मालाचा भाव ठरविण्याचे स्वातंत्र्य शेतकऱ्यांना नाकारले आहे. त्यामुळे शेतकरी कायम कर्जबाजारी झाला. औद्योगिक विकास नियंत्रण कायद्याने (१९५१) लायसन्स-परमिट-कोटा राज्य आले. त्यामुळे उद्योजकतेच्या स्वातंत्र्यावर घाला येऊन नोकरशाही व पुढारी यांचा भ्रष्टाचार बोकाळला व अण्णा हजारेंना उगाच आंदोलन करावे लागले. वाहतूक नियंत्रण कायदा (१९३९) व फेररचना (१९८८) द्वारे प्रवासी वाहतुकीवर नियंत्रण आले. त्यामुळे पोलिसांना हप्ता वसुलीस रान मोकळे झाले. ही घटनाच भ्रष्टाचाराची जननी आहे. नाफेड व कृषी उत्पन्न बाजार समिती कायद्यांमुळे लायसन्सधारक व्यापारी व मार्केट कमिटीचे पुढारी यांनी अब्जावधी रुपये कमावले. शेतकऱ्यांना गरीब, कर्जबाजारी व आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. जे निर्णय शेतकरी, उद्योजक, व्यापारी यांनी घ्यायचे ते दिल्लीतील पुढारी व नोकरशहा घेऊ लागलेत. घटनादुरुस्ती (१९७६) अन्वये उदारमतवादी घटना समाजवादी करण्यात आली. हा बदल देशात आणीबाणी लागू असताना केला. तो मोकळ्या वातावरणात केला नाही. भारतीय खाद्यान्न महामंडळ कायदा (१९६२) अन्वये घटनेने शेतीमालाच्या किमती पाडण्याचा कायदेशीर आधार देऊन गरिबी निर्माण करण्याचा कारखाना गेली साठ वर्षे अखंडपणे सुरू आहे. तेही या घटनेमुळेच. ही घटना खून केलेल्या खुन्यासही तुरुंगात व्यक्तिस्वातंत्र्याची जपणूक करीत आत्मसन्मान देते, मात्र शेतकरी, उद्योजक यांना गुन्हेगार ठरविते. या देशाला युगप्रवर्तक दिशा देणाऱ्या ऐतिहासिक आंदोलनाला देशभक्त नागरिकांनी आशिर्वाद द्यावा, अशी विनंती करतो, असे देवांग यांनी म्हटले आहे. घटनेच्या परिशिष्टातील नऊ प्रमुख कारणांमुळे आज दि. १४ एप्रिल बाबासाहेब आंबेडकर स्मृतीदिनी ही अन्यायकारक घटना नवमनुस्मृतीरुपी घटना प्रतीकरुपाने जाळून टाकत आहे. असे त्यांनी पत्रकात म्हटले आहे. याप्रसंगी रवी देवांग यांच्यासोबत बळीराज्य संघटनेचे धुळे विभाग अध्यक्ष शांतूभाई पटेल, जळगाव व नाशिकचे अध्यक्ष कडूअप्पा पाटील, जगन्नाथ राजपूत गणेशपूर, ता. साक्री, मनोहर रामचंद्र पाटील कलमाडी, ता. शिंदखेडा, भटू तात्या अकलाडे देगाव, ता. साक्री, प्रकाश सिताराम पाटील तालुकाध्यक्ष धुळे, आत्माराम बळीराम पाटील कापडणे ता. धुळे, जयवंत यशवंत पाटील कापडणे ता. धुळे, माधव गंगाराम भदाणे उबर्टी ता. साक्री, भास्कर निंबा काकुस्ते शेनपूर ता. साक्री, शांताराम चिंधू गांगुर्डे देगाव ता. साक्री, दत्ताजीराव माधवराव बेडसे छडवेल कोर्डे ता.साक्री, धवळू पुंडलिक गांगुर्डे, श्रीराम गंगाराम ठाकरे, सजन कोंडाजी बहीरम, नारायण देवचंद देसले सर्व रा. देगाव ता. साक्री, पोपटराव शिवराम देवरे धमनार ता. साक्री, भिका खुशाल जाधव शेवाळी ता. साक्री, शिवाजी कृष्णा पाटील कापडणे ता. धुळे, गुलाबसिंग रघुवंशी सार्वे ता. शिंदखेडा आदी उपस्थित होते.

## देवांग यांच्यासह तिघांविरुद्ध राष्ट्राच्या अवमानाचा गुन्हा

घटनेच्या ९ व्या परिशिष्टाच्या प्रतिकात्मक प्रतीचे दहन करण्याप्रकरणी शेतकरी संघटनेचे राज्य अध्यक्ष रवि देवांग यांच्यासह तिघांविरुध्द राष्ट्रीय अवमानाचा गुन्हा दाखल करण्यात येऊन अटक करण्यात आली. त्यांना न्यायालयात हजर केले असता, दि.२९ एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडी ठोठावण्यात आली आहे.

■■

# स्वतंत्र भारत पक्षाच्या वतीने प्रसिद्धी पत्रक

घटनेतील परिशिष्ट ९ काढून टाकावे अशी मागणी केंद्र सरकारकडे करीत असताना प्रतिकात्मक आंदोलन म्हणून शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रवि देवांग यांनी परिशिष्ट ९च्या प्रतिकात्मक प्रतिचे दहन केले. यात घटनेचा व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान करण्याचा शेतकरी संघटनेच्या अध्यक्षाचा व कार्यकर्त्यांचा हेतू नव्हता. कारण रवि देवांग हे स्वतः धुळे येथे विपश्यना केंद्र चालवतात आणि ते स्वतः बौद्ध उपासक आहेत. काही विरोधकांनी गैरसमजातून रवि देवांग यांना मारहाण केली आणि त्यांच्या कार्यालयाची मोडतोड केली. या घटनेचा आम्ही निषेध करतो. व दोषींवर कारवाई करण्याची मागणी करतो.

**स्थळ : नागपूर दि. १५ एप्रिल २०११**

स्वाक्षरित,

**ॲड. वामनराव चटप, सौ. सरोजताई काशीकर,**
**राम नेवले, जगदिश नाना बोंडे, पांडुरंग भालशंकर**
**सम्राट डोंगरदिवे, विजय विल्हेकर**

# औरंगाबाद येथे शेतकरी संघटना आणि स्वभाप कार्यकारिणीची बैठक

**औरंगाबाद** : शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्षाची कार्यकारिणी बैठक औरंगाबाद येथे 'शेतकरी संघटक'च्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आली होती. चांदवडच्या ऐतिहासिक महिला अधिवेशनाला २५ वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने पुन्हा महिला अधिवेशन घ्यावे, शेतकऱ्यांची कर्जमुक्ती आणि वीजबिलाचा प्रश्न, माधवराव खंडेराव मोरे यांचा अमृतमहोत्सव आदी विषयांवर चर्चा झाली. ज्येष्ठ कार्यकर्ते ॲड. अनंत उमरीकर यांनी कर्जमुक्ती आंदोलनाचा विषय आपल्या प्रास्ताविकात मांडला. जयसिंगपूर येथील अजित नरदे यांनी आपले विचार मांडले. त्यांनी संघटनेच्या राजकीय भूमिकांचा आढावा घेऊन पुढे काय करावे यासंबंधी आपले विचार मांडले. गोविंद जोशी, शिवानंद दरेकर यांनी कर्जमुक्तीसाठी आंदोलन कसे करता येईल याविषयी आपले मत स्पष्ट केले.

संघटनेच्या मुशीत तयार झालेला कार्यकर्ता चळवळीसाठी- आंदोलनांसाठी तयार झालेला आहे. राजकीय पक्षाला ज्या तडजोडी कराव्या लागतात त्याची सवय त्याला नाही म्हणून स्वतंत्र भारत पक्षाची राजकीय भूमिका त्याला पटकन पचत नाही, हा मुद्दा मांडत सुरेशचंद्र म्हात्रे यांनी संघटना आणि पक्ष यांतला फरक स्पष्ट केला. लातूरचे बाबूराव हाडोळे, कैलास तवार, प्रकाश पाटील, नामदेवराव जाधव, देविप्रसाद ढोबळे, डॉ. अप्पासाहेब कदम, सौ. शैलाताई देशपांडे, अनिल घनवट, यांनी आपले विचार याप्रसंगी मांडले. सरोजताई काशीकर तसेच अध्यक्ष रवि देवांग यांनीही एकूण परिस्थितीचा आढावा घेत विवेचन केले. स्वतंत्र भारत पक्षाचे अध्यक्ष वामनराव चटप यांनी राजकीय भूमिका स्पष्ट करत पुढील वाटचालीची दिशा सांगितली.

# शेतकरी संघटक स्थिर निधी



श्री. प्रकाश भेरजे



श्री. इंदरचंद मांगीलाल बैद

| | |
|---|---|
| श्री. प्रकाश भेरजे | रु. १००० |
| श्री. इंदरचंद मांगीलाल बैद | रु. २००० |
| ॲड. शरद सावजी | रु. १००० |
| मा. भास्करभाऊ बोरावके | रु. १००० |
| मा. गोविंदभाऊ जोशी | रु. १००० |
| श्री. काशिनाथ दत्तू पाटील | रु. १००० |
| यापूर्वी जमा निधी | रु. ४१,००० |
| स्थिर निधी एकूण रक्कम = | रु. ४८,००० |

सर्व देणगीदारांचे मनःपूर्वक आभार.
स्थिर निधीसाठी जास्तीत जास्त साहाय्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.
**-कार्यकारी संपादक**